# माझी गजल निराळी

गंगाधर मुटे ‘अभय‘

**माझी गजल निराळी (गजलसंग्रह)**
**गंगाधर मुटे**

रचनास्वत्व
© **गंगाधर मुटे**
आर्वी (छोटी) ४४२ ३०७
ता. हिंगणघाट - जि. वर्धा
**भ्रमणध्वनी** : ०९७३०५८२००४
**ईमेल**
gangadharmute@gmail.com
angarmala2016@gmail.com
**संकेतस्थळ**
www.baliraja.com

**प्रकाशक**
नीता नितीन हिरवे
।। संवेदना प्रकाशन ।।
बी / १८, 'सुखकर्ता',
मोरया गोसावी गणपतीजवळ,
चिंचवड गाव, पुणे - ४११ ०३३
**दूरध्वनी** : ०२० २७६१४६२५
**भ्रमणध्वनी** : ०९७६५५५९३२२
**ईमेल**
sanvedanaprakashan95@gmail.com

**प्रथमावृत्ती**
विजयादशमी २०१३
(शब्दांजली प्रकाशन, पुणे)
**द्वितीय आवृत्ती**
२९ जून २०१४
(शब्दांजली प्रकाशन, पुणे)
**तृतीय आवृत्ती**
२५ फेब्रुवारी २०१७
(संवेदना प्रकाशन, पुणे)

**मुखपृष्ठ**
खलील खान

**अक्षरजुळणी**
क्रिएशनल डेटा केयर
कळवा - ठाणे ४००६०५
संपर्क : ८४५२८८३७४८

**मुद्रीतशोधन**
नयना जनार्दन म्हात्रे

**मुद्रक**
प्रतिमा ऑफसेट, पुणे

**मूल्य : रू. २००**

तमाम कष्टकऱ्यांना...

**वृत्तात चालण्याचे ... शब्दास ज्ञान झाले**
**कविते तुझ्या लयीने जगणे सुरात आले**

- गंगाधर मुटे ‘अभय‘

★★★

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ०१) **जाणिवांची संपृक्त अभिव्यक्ती** | ...डॉ. किशोर सानप | ...*नऊ* |
| ०२) **दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने** | ...राज जैन | ...*तेवीस* |
| ०३) **परिभाषा बदलणारा संग्रह** | ...राज पठाण | ...*चोवीस* |
| ०४) **जगणे सुरात आले** | ...सुधाकर कदम | ...*एकतीस* |
| ०५) **परीक्षकांची परीक्षा** | ...श्याम पवार | ...*चौतीस* |
| ०६) **मेरीटचे गुण घेणारा संग्रह** | ...तुळशीराम बोबडे | ...*एकोणचाळीस* |
| ०७) **शेतकऱ्याला अभय** | ...विजय शंकरराव चव्हाण | ...*त्रेचाळीस* |
| ०८) **परिघाबाहेरची गजल** | ...किमंतु ओंबळे | ...*पन्नास* |
| ०९) **समकालीन गजलेत वेगळंपण** | ...अनंत नांदूरकर | ...*बावन्न* |
| १०) **मनाला थेट भिडणारी गजल** | ...तुषार देसले | ...*चोपन्न* |
| ११) **यशाची हॉट्रीक** | ...जनार्दन केशव म्हात्रे | ...*अठ्ठावन्न* |


★★★

## मान्यवरांच्या शुभेच्छा


| | | |
|---|---|---|
| प्रमोद देव | डॉ. विकास आमटे | डॉ. भारती आमटे |
| डॉ. मधुकर वाकोडे | प्रमोद गुळवेलकर | डॉ. अभय बंग |
| प्रदीप निफाडकर | स्वामी निश्चलानंद | ...*चोपन्न ते सत्तावन्न* |


★★★

## भूमिका


गंगाधर मुटे ...*बासष्ट*


★★★

# काव्यानुक्रम


| क्र. | शिर्षक |
|---|---|
| १. | लेखणीने लढअईस सज्ज व्हावे |
| २. | मढे मोजण्याला |
| ३. | दुपट्टा घसरणे वगैरे वगैरे |
| ४. | शब्दबेवडा |
| ५. | जगणे सुरात आले |
| ६. | वरूणदेवाने जात दावू नये |
| ७. | पाहून घे महात्म्या |
| ८. | एक केवळ बाप तो |
| ९. | वैश्विक खाज नाही |
| १०. | नाटक वाटू नये |
| ११. | अध्यात्मिक गजल |
| १२. | कळली तर कळवा |
| १३. | अमेठीची शेती |
| १४. | अस्थी कृषीवलांच्या |
| १५. | मरणे कठीण झाले |
| १६. | आडदांड पाऊस |
| १७. | प्राक्तन फिदाच झाले |
| १८. | कुठे लुप्त झाले फुले भीम बापू |
| १९. | अन्नधान्य स्वस्त आहे |
| २०. | पुढे माणसांचे यशू बुद्ध होते |
| २१. | रक्त आटते जनतेचे |
| २२. | आत्महत्या बळीच्या |
| २३. | भांडार हुंदक्यांचे |
| २४. | टिकले तुफान काही |
| २५. | रंग आणखी मळतो आहे |
| २६. | नव्या यमांची नवीन भाषा |
| २७. | शस्त्र घ्यायला हवे |
| २८. | नाटकी बोलतात |
| २९. | स्वातंत्र्य का ग्रासले |
| ३०. | गहाणात सातबारा |
| ३१. | ते शिंकले तरीही |
| ३२. | त्यांचाच जीव घे तू |
| ३३. | अस्तित्व दान केले |
| ३४. | हुलकडूबी नाव |
| ३५. | माझ्या ललाटरेषा |
| ३६. | बत्तीस तारखेला |
| ३७. | मरण्यात अर्थ नाही |
| ३८. | सोकावलेल्या अंधाराला |
| ३९. | भारी पडली जात |
| ४०. | पाकनिष्ठ कांदा |

| क्र. | शिर्षक |
| --- | --- |
| ४१. | गाव ब्रम्हांड माझे |
| ४२. | वादळाची जात अण्णा |
| ४३. | कापला रेशमाच्या सुताने गळा |
| ४४. | तरी हुंदक्याना गिळावे किती |
| ४५. | काळजाची खुळी आस तू |
| ४६. | स्वप्नरंजन फार झाले |
| ४७. | सुप्तनाते |
| ४८. | स्मशानात जागा हवी तेवढी |
| ४९. | हात घसरतो आहे |
| ५०. | तुला कधी फुटणार मिशा |
| ५१. | सुडाग्नीच्या वाटेवर |
| ५२. | घट अमृताचा |
| ५३. | कान पिळलेच नाही |
| ५४. | सत्ते तुझ्या चवीने |
| ५५. | कान पकडू नये |
| ५६. | पांढरा किडा |
| ५७. | अय्याशखोर |
| ५८. | ती स्वप्नसुंदरी |
| ५९. | एकदातरी |
| ६०. | आभास मीलनाचा |
| ६१. | हे खेळ संचिताचे |
| ६२. | घुटमळते मन अधांतरी |
| ६३. | नेते नरमले |
| ६४. | वाघास दात नाही |
| ६५. | हिमालयाची निधडी छाती |

| क्र. | शिर्षक |
| --- | --- |
| ६६. | कसे अंकुरावे अता ते बियाणे |
| ६७. | कुटिलतेचा जन्म |
| ६८. | अंगार चित्तवेधी |
| ६९. | गोचिडांची मौजमस्ती |
| ७०. | रूप सज्जनाचे |
| ७१. | भक्तीविभोर |
| ७२. | मुकी असेल वाचा |
| ७३. | कविता म्हणू प्रियेला |
| ७४. | कुंडलीने घात केला |
| ७५. | पुढे चला रे |
| ७६. | चंद्रवदना |
| ७७. | हे रान निर्भय अता |
| ७८. | हिशोबाची माय मेली |
| ७९. | क्षण एक पुरे जगण्यास |
| ८०. | शेत लाचार झाले |
| ८१. | चीन विश्वासपात्र नाही |
| ८२. | शेरनीच्या जबड्यात ससा |
| ८३. | राखेमध्ये लोळतो मी |
| ८४. | लगान एकदा तरी |
| ८५. | उद्दामपणाचा कळस |
| ८६. | पराक्रमी असा मी |
| ८७. | टुकार घोडे |
| ८८. | खुळ्या स्मृतींना जपण्यासाठी |
| ८९. | प्रकाशात शिरयासाठी |
| ९०. | जिंकावया जगाला |

**घे हा अभय पुरावा त्यांच्या परिश्रमाचा**
**ती माणसेच होती... जी कोहिनूर झाली**

- गंगाधर मुटे 'अभय'

★★★

## तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने...
## शेतिनिष्ठ जीवन जाणिवांची संपृक्त अभिव्यक्ती

माझी गजल निराळी या मराठी गजल कवितेत शेतकऱ्याच्या दु:खाचे वास्तव मांडूनही कवी गंगाधर मुटे अभय यांच्या तिसऱ्या आवृत्तीचे स्वागत करण्यासाठी मराठी गजल-काव्य रसिक उत्सुक आहेत. पहिली आवृत्ती सन् २०१३, दुसरी आवृत्ती २०१४ आणि सन् २०१७ मध्ये गडचिरोलीच्या तिसऱ्या अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलनात तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन होत आहे. तीन-चार वर्षांतच तिसऱ्या संग्रहाचे प्रकाशन ही खरेतर मराठी काव्यजगतासाठी आनंद आणि समाधानाचीच बाब मानायला हवी. मराठीतील दिग्गज कवींची पाचशे काव्यसंग्रहाची एक आवृत्ती संपायला कवीला आपली हयात घालवावी लागते. एकूणच मराठी कवी आणि कवितेच्या उदासिनतेला टाळून, शेतकऱ्याविषयी काव्यसृजनाचा कळवळा असलेल्या, कवी गंगाधर मुटे यांच्या गजलसंग्रहाच्या लोकप्रियतेचं मूळ कारण त्यांच्या गजलनिर्मितीच्या अनुभूतिनिष्ठ दमदार आशयमूल्यांच्या मूळांशी दडलेले आहे.

संस्कृती शेतकऱ्याच्या दु:खाविषयी समाजाला आस्था आणि सहानुभूती आहे. कवीच्या सृजनशीलतेवरही रसिकांचा विश्वास आहे. कवीची अस्सलता आणि अंत:करणातील सृजनाच्या प्रेरणा प्रामाणिक असल्याचेच ते द्योतकही आहे. कवीच्या वाट्याला जी रसिक मान्यता मिळाली आहे, त्यातून शेतकऱ्याच्या भोगवट्याविषयी, दु:खाविषयी केवळ कळवळा नाही; तर खोलवरची दु:ख जाणीव समाजाला व्हावी, शेतकऱ्याच्या दु:खाचे पडसाद नतद्रष्ट शोषण व्यवस्थेत उमटावे, शेतकऱ्याच्या जीवनात सुरू असलेले मृत्यूचे तांडव थांबावे, शेतकऱ्याचे कल्याणकारी बळीराज्य यावे, स्वाभिमानाने शेतकऱ्याना जगता यावे; एकूणच कृषिवलांच्या कृषिक्षेत्रांत क्रांती व्हावी; हीच कवीचीही रसिकांकडून-सांस्कृतिक जगताकडून अपेक्षा आहे.

कवी गंगाधर मुटे *अभय* या टोपणनावाने रसिकांच्या राज्यात निर्भयपणे वावरतो. तो खुद्द शेतकरी आहे. बी. एस्सी.(गणित) पदवी घेतल्यावरही त्याने शेतीत राबून, शेतकऱ्याचे दु:ख अनुभवता यावे म्हणून, वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील एका लहानशा खेडेगावात- आर्वी (छोटी) या राहत्या गावी मुक्त कृषी पत्रकारिता-काव्यलेखन करीतच; शेतीविषयक संशोधन, बिजोत्पादन आणि विपणण आदी कालोचित नवे नवे प्रयोग शेतीत करीत-करीत,

शेती आणि शेतकऱ्याच्या विकासाचे व्रत हाती घेतले आहे. शेतकरी संघटनेत सक्रिय कार्यकर्ता म्हणून तो अनेक वर्षांपासून आजतागायत शेतकऱ्याच्या क्षीण आवाजाला आंदोलनाची-साहित्य संस्कृतीची कृषिभाषा प्रदान करून, त्याने सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मौलिक आणि विधायक कामगिरी बजाऊन, भरीव असे कृतिशील संघर्षरूप योगदान दिलेले आहे.

गंगाधरच्या सामाजिक आणि सांस्कृतिक योगदानाला तीन भक्कम आयाम प्राप्त झाल्याचे दिसते. एक, तो शेतकरी संघटनेत प्रारंभापासून कृतिशील आंदोलनात सहभागी झाल्यामुळे, शेतकऱ्याच्या कृतिशील आंदोलनाच्या एका थोर परंपरेचा तो पाईक आहे. दोन, शेतीच्या सृजन सोहळ्यात सामील होतानाच, तो काव्य-गजल-ललित लेखनादीच्याही सृजनाशी तादात्म्य पावत गेला आहे. अस्सल सृष्टीचा तारणहारा-पालनहारा-कृपावंत-मायबाप असलेल्या सृष्टीच्या हिरव्या मळ्यात रमलेला आणि जीवन कृतार्थ करून घेणाऱ्या सृजन सोहळ्याचाही तो कर्ता आणि कार्यकर्ता कवी आहे. तीन, शेतकरी साहित्याची स्वतंत्र ज्ञानशाखा विकसित करून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वात कळवळ्याने शेतकरी साहित्याची चळवळ रुजवून, खुद्द शेतकरी साहित्याचे सृजन करून; शेतकरी साहित्य चळवळीला तात्विक आणि कृतिशीलतेचा सृजनशील मजबूत पाया उपलब्ध करून दिला आहे. खरेतर तो शेतकरी साहित्याची उपासना, भक्ती करून, वारकऱ्यांसारखीच भूमीदेवाची शेती करून, जगाचे पालनपोषण करण्यासाठी किमान कृषिवलांच्या जगाने तरी सजग, कृतिशील-संघर्षशील राहावे, हा निर्वाणीचा संदेश जगाला देण्यासाठीच, त्याने अखिल भारतीय स्तरावर शेतकरी साहित्य संमेलनाचे भव्य-दिव्य आयोजन करून, आजवर एकूण दोन आणि आता सन् २०१७ मध्ये गडचिरोलीला तिसरे अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजनही केले आहे.

गंगाधरचा उत्साह, हुरूप, जिद्द, चिकाटी, चिवटपणा अस्सल शेतीत राबराब राबणाऱ्या जातिवंत-कुलवंत हाडाच्या शेतकऱ्यानाही लाजवणारा आहे. याचसाठी केला होता अट्टाहास, शेवटचा दिस गोड व्हावा... शेतकऱ्याचे संत असलेल्या संत तुकोबांच्या अभंगातील आशयाला कृतिशीलतेचे परिमाण देण्यासाठी, सतत शेतकऱ्याच्या भल्यासाठी, अत्यंत निग्रहाने सामाजिक संघर्षाची भूमिका घेऊन, सांस्कृतिक क्षेत्रांत, शेतकरी साहित्याला शेतकऱ्याच्या जीवन जाणिवांचा साक्षात्कारी स्पर्श देणारा, हा खरेतर अस्सल शेतकरी कुळाचाच कुलवंत काव्याविष्कार आहे. आजपर्यंत *गंगाधरचे रानमेवा (२०१०), नागपूरी तडका (२०१३), माझी गजल निराळी(२०१३) असे तीन काव्यसंग्रह आणि वांगे अमर रहे (२०१२)* याच नावाचा एक ललित लेखसंग्रह, अशी ही ग्रंथसंपदा त्याच्या शेतिनिष्ठ जीवन जाणिवांच्या अस्सल अभिव्यक्तीशी

इमान राखण्याचेच उदाहरण आहे. मुक्त पत्रकारिता-सदर लेखन-*वांगे अमर रहे!* सारखे केवळ शेतकऱ्याच्या जीवनदायीनी हिरव्या शैलीच्या सृजनाचाच लळा असलेला हा शेतकरी-कवी-लेखक-पत्रकार-कार्यकर्ता *वाङ्मयशेती* सुजलाम-सुफलाम करणाराही आहे.

गंगाधर शेतकरी-लेखककवी-कार्यकर्ता असूनही उच्चविविभूषित आहे. नोकरी न करता शेती आणि शेतकऱ्याच्या दु:खांवर मलमपट्टी करून, शेतकऱ्याना दु:खमुक्त करण्याचा विडा त्यानं स्वीकारलेला आहे. तो शेतकऱ्याच्या आवाजाला जागतिक स्तरावर जगाला जाणवून देण्यासाठीही नेट-कनेक्ट टेक्नोसॅव्ही आहे. सोशल मिडियात-फेसबुकवर आणि आंतरजालातही शरद जोशी, बळीराजा, गंगाधर मुटे, ब्लाग्जपॉट-संकेतस्थळांची निर्मिती करून ई-लेखनातूनही बळीराजाच्याच दु:खांना वाचा फोडणारे लेखन करून, जगातच शेतकऱ्याचा आवाज बुलंद करण्याचेही महत्कार्य इमानेइतबारे तो करीत आहे.

विविध वाहिन्यांनीही *ब्लॉग माझा* या जागतिक पातळीवरील स्पर्धेत सन् २०१० आणि २०१२ मध्ये सलग दोनदा पुरस्कार देऊन सन्मानीत केले आहे. आजवर गंगाधरच्या कृतिशील लेखनाला-उपक्रमशीलतेला मान्यवर संस्था-वाहिन्यांनी-प्रकाशकांनी पुरस्कृत करूनही सन्मानीत केले आहे. आजच्या घडीला तरी गंगाधर मुटे हा शेतकरी साहित्य चळवळीचा आणि शेतकरी साहित्याची अनुभवनिष्ठ वाङ्:मयशेती करणारा सांस्कृतिक आकाशातील स्वयंप्रकाशित तारा आहे. शेतकरी साहित्य या नवज्ञानशाखेचाही तोच एकमेव जनकही आहे.

मराठी अभिजात अभिजन साहित्य आणि ग्रामीण साहित्यातून आजवर शेतकरी जीवनाचे जे काही चित्रण करण्यात आले; ते असत्य, आभासी वास्तव निर्माण करणारे, विनोदी स्वरूपाचे असून, शहरातून लेखक ग्रामीण जीवनाचे कपोलकल्पित चित्रण करतो, याविषयीचे तीव्र असमाधानही कवीने-*सूडाग्नीच्या वाटेवर*... या कवितेतून, *माझी गजल ऐकण्यास गर्दी लोटली होती, काही जागीच नव्हती, बाकी झोपली होती... डावी उपाशी नव्हती, उजवी जेवली होती...विरोधक प्रसन्न नव्हते, सत्ता कोपली होती...सलवार विझली नव्हती, पगडी पेटली होती...संधी दवडली नव्हती, अभये वेचली होती*... या जातीचे परम व्यंग करीत-आजच्या वर्तमान साहित्य, भाषा, संस्कृतीचे सृजन-वास्तव कवीने औपरोधिक शैलीची रचना करून नेमकेपणाने व्यक्त केले आहे.

*माझी गजल निराळी,* असं म्हणतान असतानाच कवीने आपली *भूमिका* गजलरचनेतूनच सांस्कृतिक जगासमोर स्पष्ट केली आहे.

*घामाची कत्तल जेथे, होते सांज सकाळी*
*तुतारी फुंकते तेथे, माझी गजल निराळी*

*शब्दांची गुळणी नोहे, नव्हेच शब्द धुराडा*
*निद्रिस्थी जागवण्याला, गातो शेर भुपाळी*

*युगानुयुगे ते बोलले, ऐकत आलो आम्ही*
*आता माझ्या मतल्याची ऐकवण्याची पाळी*

*गजल माझी बंड आणि अन्यायाला दंडही*
*शेतकऱ्याच्या मुक्तिसाठी आयुधांची थाळी*

*पोशिंद्याच्या रक्षणाचा अभय घेतो मक्ता*
*ओतप्रोत भरतो आहे शेरास्त्रांनी हाळी*

आधुनिक कवी केशवसुतांनी सामाजिक अन्यायाविरुद्ध बंड-विद्रोह म्हणून सर्वहारांच्या कल्याणाची जाग समाजाला यावी म्हणून, त्यांच्या नव्या शिपायाने तुतारी फुंकून शोषक समाजाला हादरे दिले. ग्लोबल व्हिलेजच्या काळात देशात सर्वत्र शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढल्या, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची कुटुंबेच्या कुटुंबे उद्‌ध्वस्त झाली. सृष्टीचा तारणहाराच जेव्हा मृत्युपंथाचा गळफास लावून दु:खमुक्तीचा अघोरी मार्ग स्वीकारण्यास बाध्य होतो, तेव्हा समाजही मृत्यूच्या चक्रव्यूहात शेवटचेच आचके देऊ लागल्याची, सृष्टीच्या महाविनाशाची ती गंभीर चाहूल असते. गंगाधरने ती जाणीव तीव्रपणे अनुभवून, वर्तमान जगालाही त्याची जाणीव करून दिली आहे.

घामाची कत्तल करणाऱ्या व्यवस्थेच्या विरुद्ध बंडखोरी करीत, त्याने घामाचे निर्माल्य मानणाऱ्या व्यवस्थेला वठणीवर आणण्यासाठी गजलरूपी तुतारी फुंकली आहे. शब्दांची गुळणी करणाऱ्या सांस्कृतिक विश्वाचाही त्याने धिार केला आहे. लढवैय्या आशयाची निर्मिती करून, युगानुयुगे शेतकऱ्याच्या दु:खांना साहित्यातूनही आभासी वास्तवाच्या हुलकावण्या देणाऱ्या लेखकांच्या सांस्कृतिक विश्वाविरुद्धही तो सजग झालेला आहे. आता तुम्ही लिहू नका तर आम्हीच साक्षात आमचं दु:ख आमच्या भाषेत मांडू, असा गगनभेदी हादराही त्याने सांस्कृतिक विश्वाला दिला आहे. आता शेतकऱ्याचाच मतला ऐकण्याची वेळ असल्याचीही जाणीव करून दिली आहे.

अर्थातच गजल काव्यातून शेतिनिष्ठ जीवन जाणिवांची संपृक्त अभिव्यक्ती करणाऱ्या प्रतिमासृष्टीनेही कवी अभयची कविता संपृक्त आणि समृद्ध झालेली आहे. गजलवृत्ताला पोषक आशय, भाषा, शैली अशा त्रिगुणात्मक रचना माध्यमातून कवी गंगाधरने बंड आणि विद्रोहाची संयत रचना गजलेसारख्या तरल काव्यवृत्तातून केल्याचेही दिसते. कवीच्या कवितेचा स्वभाव बंडखोरी-विद्रोहीरूपात व्यक्त होण्याचा नाही. तर कमालीची उदासिनता, थंडपणा कवीला अस्वस्थ, अंतर्मुख करतो. शेतकऱ्याच्या-वारकऱ्यांच्या एकेश्वरी विठ्ठलाच्या आत्मीय कळवळ्यापोटी-चीडसंतापजनक परिस्थिविषयीची मवाळ जाणीव होताच-कवी दुर्धर आजारग्रस्त समाजाच्या शरिराचे कठोर भाषाशस्त्राने सर्जन करतो. विठ्ठलाने अठ्ठावीस युगे आपल्या कास्तकारांच्या उजाड भक्तिमळ्यातले दु:ख; *सुंदर ते ध्यान, उभे वीटेवरी* कर कटावरी ठेवून उघड्या डोळ्यांनी पाहिले. परंतु वीटेवरून इंचभरही *तो हा विठ्ठल बरवा, तो हा माधव बरवा,* दिनांचा नाथ विठ्ठल हटला नाही. कृष्णासारखे पापयुगाचा संहार करण्यासाठीही त्याने हातातील महाखड्ग सोडल्याचं उदाहरण नाही. विठ्ठलानेही भक्तांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी नकारच दिल्यामुळे, दगडामातीत देव नसतो तर तो रंजल्यागांजल्यांत-त्यांच्या सेवेकऱ्यांतच विराजमान असतो, ही संत तुकोबांची मानुष-परिभाषा मात्र कवीने आपल्या काव्यसृजनातून सार्थ ठरवली आहे. अर्थातच समाजाला आजारग्रस्त मानसिकतेतून बाहेर काढण्यासाठी, त्याला यशस्वी सर्जनाची सर्जक भूमिका बजावावी लागली. तो त्यात तसूभरही हयगय करताना दिसत नाही...

*माझी गजल निराळी*...पहिल्या आवृत्तीत (२०१३) भूमिकेसह ७४ गजलांचा संग्रह आहे. दुसऱ्या आवृत्तीत (२०१४) भूमिका नाही तर एकूण ७६ गजला आहेत. पहिल्या आणि दुसऱ्याही आवृत्तीला गजलनवाज गायनसम्राट रा. भीमराव पांचाळे यांची जबरदस्त पाठराखण आहे. *गजल लेखन ही कुणा विशिष्ट वर्गाची मेदारी नाही. या विधानाला पुष्टी देणाऱ्या नावांमधील एक नाव आहे-गंगाधर मुटे*... हा सार्थ अभिप्राय आहे. दुसरे गजलगंधर्व-गजलगायक कवी सुधाकर कदम यांची, *कविते तुझ्या लयीने*...ही कवीच्या मर्मस्थलांची आस्वादक चिकित्सा करणारी प्रस्तावनाही अर्थपूर्ण आहे. आनंदऋतू ई-मॅगजीनचे संपादक रा. किमंतु ओंबळे यांचाही, *परिघाबाहेरची गजल*... हा सार्थ अभिप्राय आहे. सुप्रसिद्ध गजलकार प्रदीप निफाडकर तसेच अरुणाचल प्रदेशात वास्तव्यास असलेले स्वामी निश्चलानंद, मुंबईचे प्रमोद देव यांचाही सराहना करणारा अभिप्राय आहे. दुसऱ्या आवृत्तीत तर आंतरराष्ट्रीय किर्तीचे कोवळी पानगळकार समाजसेवी डॉ. अभय बंग, आनंदवन वरोराचे समाजसेवी डॉ. विकास आमटे, भारतीताई आमटे, लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. मधुकर वाकोडे, हैदराबादचे

बँक अधिकारी रा. प्रमोद गुळवेलकर, अंबाजोगाईचे रा. राज पठाण, पुण्याच्या महांगुळेचे रा. श्याम पवार, अकोल्याचे तुळशीराम बोबडे, लातूरचे रा. विजय शंकरराव चव्हाण अशा सर्वच क्षेत्रांतील जाणकारांच्या गजलचे निराळेपण अधोरेखित करणारे अर्थघन अभिप्रायही आहेत. तिसऱ्या आवृत्तीत (२०१७) पुन्हा *भूमिका* व्यक्त करणारी आणि *लेखणीने लढाईस सज्ज व्हावे !, मढे मोजण्याला, वरुणदेवाने फालतू त्याची जात दावू नये, पाहून घे महात्म्या, एक केवळ बाप तो, वैश्र्विक खाज नाही, नाटक वाटू नये, खट्याळ रसातली आध्यात्मिक गजल, कळली तर कळवा, खुळ्या स्मृतींना जपण्यासाठी, प्रकाशात फिरायासाठी, जिंकावया जगाला* अशा काही नवजाणिवांच्या नवीन गजलांचाही समावेश कवीने केलेला आहे.

शेतीमातीत रुजलेल्या-उगवलेल्या क्षेत्रीय भाषिक रूपांचा उपयोग करून, कृषिनिष्ठ कृषिवलांच्या साक्षात भाषाभिव्यक्तीच्या माध्यमाने कवीने गजल काव्याचे शेतमळे फुलवले आहेत. अर्थातच कवीच्या आशयाची जातकुळी संत तुकोबांच्या, *मढे झाकुनि करिती पेरणी, कुणबियांचे वाणी लवलाहे*...याच भूमीच्या कुशीत असलेल्या सृजनतळांत-जळांतच, कवी गंगाधर-अभयच्याही, कुणब्यांच्या जातिवंत दु:खांची यातना-कमळे उगवली आहेत. *आपुलिया पोटासाठी करी लोकांचिया गोष्टी, तुका म्हणे शिंदळीच्या व्यर्थ क्षमवीली वाचा*...हा कवी-अहंभाव गंगाधरच्या कवितेतून पुसटसाही जाणवत नाही. उलट, *नका दंतकथा येथे सांगो कोणी, कोरडे ते बोल मानी कोण, येथे पाहिजे जातीचे, येरागबाळाचे काम नोहे,* ह्याच अस्सल कविरुढीच्या पायवाटेवरून कवी गंगाधरचा *अभय* काव्यप्रवास दिसून येतो.कवी गंगाधरच्या जवळपास सर्वच गजल-हजल शेतकऱ्याच्या अस्सल कळवळ्यापोटीच प्रतिभा सामर्थ्यांचे हादरे देत, अणुबॉम्बसारख्या अणूरेणूया थोकडा कवी आकाशाएवढा, अशा महाकारुणिक आशयाभिव्यक्तीचीच अनुभवांकित उदाहरणे आहेत. गजलची कारगिरी न करता, गजलवृत्ताचे प्रातिभ सामर्थ्य पूर्ण अभयांकित ऊर्जेचा वापर करूनच कवीची कविता, शेतकऱ्याच्या दु:खमुक्तीचे ऊर्जास्त्रोत बनते. शब्दास्त्रांच्या तुफानणाऱ्याने समाजालाही आणि शेतकऱ्याना मृत्युपंथी नेणाऱ्या व्यवस्थेच्या भूगर्भात खोलवर हादरे देणारी आहे. व्यवस्थेच्या समूळ विनाशाची जबरदस्त ऊर्जा तिच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीत आहे.

पहिल्याच *अस्थी कृषीवलांच्या* या गजलेत कृषिवलांच्या अस्थिपंजर अवस्थेसाठी जबाबदार असलेल्या त्यांच्या मुलाबाळांसह एकूणच पिळवणूक व्यवस्थेचा धिार कवी प्रथमत: करतो. सृष्टीचे पालनकर्ते कर्तव्याचा पाया रचून जातात. व्यवस्थेत दु:खी, कष्टी, चिंतातूर जगण्याचेच दिवस कृषिवलांच्या आयुष्यात उगवतात. *माजून तर्र काही दिसतात कर्मचारी,*

*प्रत्येक कागदाला पैशात घोळणारे...* लालफितशाहीच्या चक्रव्यूहात कृषिवलांच्या अस्थीही उरत नाहीत. खेड्यातून शहरात सत्तास्थानी पोहोचून मायबापांच्या टाळूवरील लोणी खाणारी पांढऱ्या गेंड्यांची जमात, कृषिवलांच्या आयुष्याला उधळी लावते. शेतकऱ्याच्या प्रश्नांवर घमासान चर्चायुद्ध संसदेत चालते. होते तसेच आहे नुसते बोलणारे...कवी शेतकऱ्याच्या आत्महत्येचा प्रश्न लोक-संसदेत मांडतो, *अस्थी कृषीवलांच्या पुसतात संसदेला, करतात आत्महत्या का देश पोसणारे ?* कवीच्या ह्या प्रश्नाचे उत्तर त्याला आजपर्यंतही संसदेने दिलेले नाही. देणारही नाही. प्रश्न चर्चेत मुरवण्याचे-जिरवण्याचे-भिजत घोंगडे कुत्र्याच्या वाकड्या शेपटीसारखेच कितीही आरडाओरडा केला तरी डब्ल्यू. टी. च (वाकडे तोंड) राहणार. सरळ होणारच नाही. कुणालाच सृष्टीच्या पालनहार्याची चिंता नाही. जन्मनारे मायबाप हळूहळू नामशेष झाले की पृथ्वीचा प्रलय व्हायलाही वेळ लागणार नाही. शेतकरी जगला तर जग जगेल. शेतकरी मेला तर जगही जिवंत उरणार नाही. एवढं साधं सरळ तत्त्व का कळत नाही जगाला ? कवीलाही हेच कोडे कमालीचे अस्वस्थ करणारे आहे.

कवीनं सबंध गजल संग्रहातल्या कवितेत केवळ शेतकऱ्याच्या दुरावस्थेचे, दु:खाचेच खोलवर हादरे दिले आहेत. गजल रचनेला पोषक असलेल्या प्रेम, भावनांची बंदिशी आदींवर कवीने मुद्दामहून भाष्य टाळले आहे. ह्याचा अर्थ कवी भावनाशील-संवेदनशील नाही, असे नाहीच. कवी कमालीचा संवदेनशील आहे. परंतु शेतकऱ्याच्या मढ्यांचाही भ्रष्टाचार-राजकारण करणाऱ्या व्यवस्थेविषयी मात्र तो पराकोटीचा असंवेदनशील आहे. ही असंवेदनशीलता विखार पेरणाऱ्या त्याच्या कवितेतील जहाल भाषिक रूपांवरून प्रगटत गेली आहे. गजलसारख्या तरल भावनिक संवेदनशील हादऱ्यांतून खरी गजलची मर्मस्पशी, उत्तुंग अशी संवेदनशील ऊर्जा जाणवते. तितकीच उत्तुंगता-तरलता-भावनेलाच आवाहन देण्याची क्षमता कवीच्या गावखेड्यांच्या गावठी भाषेतून, कवीच्या गजलेतही आपसूकच आली आहे. हे असंवेदनशील वाटणारे हादरे अक्षरश: ज्वालामुखीसारखे भ्रष्ट व्यवस्थेला भस्मसात करण्यासाठीच आतूर असल्याचेही जाणवते. हेही कवी अभयच्या गजलेचे निराळेपण विशेषत्वाने मराठी गजलेच्या इतिहासात गजलेलाच निराळे, स्वतंत्र आयाम देणारे आहे. व्यवस्थेलाच भस्मसात करण्याची शब्दऊर्जा, दु:खाच्या-मृत्यूच्या जीवघेण्या विनाशाच्या चक्रव्यूहातून, अनुभूतीच्या अवकाशातून, कवीच्या प्रातिभ लीळेत शिरलेली आहे. कवीचे गजल-दु:ख स्वत: कवीने भोगलेले, अनुभवलेले असल्यामुळे अनुभवाचेच काफिले, रदीफ, मतला, यमके, शेर सर्वकाही तिळातिळाने अंत:करण तुटणाऱ्या कवीने, केवळ अनुभूतीचे निके फटकेच व्यवस्थेला हाणले आहेत. ह्या फटक्यांची जातकुळी संत तुकोबांच्या, ह्यांना न मोजताच *हाणाव्या पैजारा* याच पठडीतली आहे.

अमेठीची शेती- *वाह्यात कायांच्या लोच्यात कास्तकारी, सर्वत्र सत्य एकच तोट्यात कास्तकारी, पोसून राजबिंडे आलू समान नेते, उत्पादकास नेते खड्ड्यात कास्तकारी, डॉलर सुकाळ शेती बारामती-अमेठी, ती तांबड्या दिव्यांची अज्ञात कास्तकारी... मरणे कठीण झाले-जगणे कठीण झाले, मरणे कठीण झाले, पंचाग गावराणी पिकणे कठीण झाले, मातीत ओल नाही तगणे कठीण झाले, आयुष्य हे नव्याने रचणे कठीण झाले... अन्नधान्य स्वस्त झाले-अन्नदाता या युगाचा जाहला उद्ध्वस्त आहे, कागदावर आकडे अन माल सारा फस्त आहे, झोपली सद्भावना अन यादवी आश्वस्त आहे... ना झाकते कधी ती, वस्त्रात अंग सारे, मिळणार भाव कैसा, शेतीत कापसाला ?... भाजून पीक सारे, पाऊस तृप्त झाला, उद्ध्वस्त शेत आधी, मागून थेंब आला... पाखरेही एकी करतात जरासे पंख फुटल्यावर, पण तुला कधी मिशा फुटणार ? सांग माणूस म्हटल्यावर...गोचिडांची मौजमस्ती पण, अता ती गाय जगणार कशी ? ... मारली मी मिठी त्या क्षणी वाटले, शेरनीच्याच जबड्यात गेला ससा...*ही असहनीय स्थिती कवीला लिहिते करते.

गजल-हजल मधून कवीने हे तिसरे महायुद्ध काव्यास्त्रे परजून, शोषण-व्यवस्थेच्या विरोधात बंडाळी करून पुकारले आहे. कवीची सबंध संग्रहातील विद्रोही-बंडखोरीची भाषा अस्सल प्रतिभावंताच्या गर्भातून निपजल्यामुळे, तिच्यात महादेवाच्या शाब्दिक अणुऊर्जेचे जगाला वठवणीवर आणण्याचे प्रातिभ सामर्थ्यही ओतप्रोत काठोकाठ शिगोशीग तुडुंब ठसठसून ठासून भरलेले आहे. कवीचे इशारे वेळीच समजून, शोषक भांडवली समाजाने सुधरण्याचीही संधी उपलब्ध करून देताना, कवी म्हणतो, *निष्कारण वार केलास तू म्हणून फणा उचलला, पण; जा तुला मी अभय देतो, तू आता मागे हटल्यावर* कवीची जातकुळीच मुळात कुणब्याच्या वाणाची पिळदार, अभयदार, उदार असल्यामुळे तो, सृष्टीच्या पालनहाऱ्याचीच कर्तव्य भावना मनात बाळगून, क्षमाशील वृत्तीचा पोशिंदा आहे. जगातल्या सुष्टादुष्टांच्या पालनपोषणाची समत्वभावाने जोपासना करणाऱ्यांच्या भूतदयेचाही तो वारसदार आहे. सदैव अमृततुल्य मातृपान्हा अखंडपणे कृषिवलांच्या अंत:करणाच्या तळाशी समभावानेच पाझरत असतो. तोच वारसा कवी गंगाधरनेही *अभय* या टोपणनावाची जाणीवपूर्वक मांडणी करून, *अभय* ही निर्भयाचे प्रतीक असलेली नाममुद्रा वापरूनच, जगाला अभयदान देण्यासाठीच स्वीकारलेली आहे. चुकलेल्या बाळांना, *वैष्णव जन तो तेने कहिये जो पीर पराई जाने रे*, याच न्यायिक कारुण्यभावाने आपल्या कवितेतून, *तुका म्हणे* या नाममुद्रेसारखीच सख्यभावाने कवितेत वापरून, शेतकरी जगतासह सबंध जगात अभयपर्व प्रस्थापित करण्यासाठी, जगाच्या नतद्रष्ट मनोभूमीत रुजवली आहे.

*घमासान आधी महायुद्ध होते, पुढे माणसांचे यशू-बुद्ध होते. रक्त आटते जनतेचे देश सुंदर घडवायला, एकटा रावण पुरेसा राज्य धुळीत मिळवायला. जाणवू ना दिल्या वेदना ना कळा, कापला रेशमाच्या सुताने गळा...आंब्याला मानायचे कांदा, किती काळ असेच चालायचे ?...*अस्मानी-सुलतानी निदर्य व्यवस्था सृष्टीच्या विनाशाचे मनसूबे रचून, सृष्टीची रचना करणाऱ्या बळीदेवाचा बळीच घेत आहे. कवीने अस्मानी-सुलतानी व्यवस्थेच्या विरुद्ध युद्ध पुकारल्याची आकाशभेदी गर्जना कवीने गजलेतून केलेली आहे. शब्दास्त्रांचे अग्निलोळ शोषणव्यवस्थेच्या सैनिकदलावर हळूच सोडलेले आहेत. शेतकऱ्याना तर पत्ताही लागू न देता, रेशमाच्या सुताने त्यांचा गळा कापला जातो. हे अधोरेखित करताना, शेवटचे आचके देणाऱ्या शेतकऱ्याच्या मरणासन्न देहात प्राणांची फुंकर कवीने घातली आहे. शोषण व्यवस्थेचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी, जगात सृष्टीच्या निर्मात्यांचे जगणे, हेच आपलेही उाचे जगणे असल्याचे पटवून दिले आहे. एक मोठी परम पराक्रमी शूरवीरांची युद्ध छावणीच कवितेचे ब्रह्मास्त्र वापरून कवीने जगात उभी करण्यासाठी, कवितासृजनाचे सृजनशील-सर्जनशील माध्यम वापरले आहे.

*लोंढेच घोषणांचे दिल्लीवरून आले, येणार वित्त आहे बत्तीस तारखेला...*ही **बत्तीस तारीख** कधीच शेतकऱ्याच्या जीवनात येणार नाही. कल्याणकारी आश्र्वासनांची खैरात करणारा लबाडपंथी पॅकेज-दिवस जगातच कधीही उजाडलाच नाही. जगातल्या पांढर्या गेंड्यांचा हा सतत गाभण असलेला असृजनशील हेला आहे. *पटू संसदेचा, तरी दांडगाई, म्हणू का नये रे तुला रानहेला ?* कवीच्या भाषेत हा पांढर्या कातडीचा खुशालचेंडू गुबगुबीत संसदेतील *संसदपटू रानहेला*आहे. कवी विठ्ठल वाघांच्या कवितेतील, दिल्लीच्या कुरणात कायम गाभण असलेली असृजनशील *म्हैस*आहे. भांडवली-सत्ताधारी शोषण तंत्राचा खरेतर हाच गुप्त-सुप्त रानवट मुखवट्याच्या आड दडलेला जगातील सर्वहारांच्या मृत्युपंथी अंधकार युगाच्या आगमनाचा येऊ घातलेला अजेंडा आहे. जगाच्याच इतिहासात कधीही बत्तीस तारीख उजाडत नाही, तसेच आश्र्वासनांची पूर्ती झाली, शेतकऱ्याच्या गळ्यातून मृत्यूफास आनंदाने काढून फेकल्याचाही दिवस कधीही उजाडणार नाही ! हेच ग्लोबल जगाचे भयावह जीवघेणे वास्तव आहे. सृष्टी निर्मात्याच्या ललाटी कोरलेल्या दिवाळखोरीच्या ह्या रेघा कधीही पुसल्या जाणार नसल्याचेच मृत्युमय-सत्य कवीने जगाला बत्तीस तारखेच्या कवितेच्या निर्मितीतून सांगितले आहे. बत्तीस तारखेच्या महाविनाशाच्या संसूचक कल्पकतेत काव्यगत विश्र्वसत्य मांडणारा कवी अभय, बहुदा मराठी कवितेच्या इतिहासातील तरी पहिलाच कवी असावा. *सोकावलेल्या अंधाराला इशारा* देताना कवी म्हणतो, *आता थोडे बोलू दे मला, ऐकणे तूही शिकायला हवे; हे*

*आवश्यक नाही की तूच, दरवेळेस बरळला पाहिजे...*जगाच्या बरळण्याला दहशत निर्माण करण्याची गगनभेदी आकाशवाणीच जणू कवीने केली आहे. गजलेमुळे कवीचे *जगणे सुरात आले...*संतांचे अभंग, कबिराचे दोहे, ज्ञानेशांच्या ओव्या सर्वहारांच्या कल्याणासाठी, सृष्टीतील चराचरांत वास्तव्य करणाऱ्या जीवजंतूंचे जगणे सुकर करण्यासाठीच संतमहात्म्यांनी रचून, जगाच्या कल्याणाचे पसायदान मागण्यासाठीच निर्माण केल्याचेही स्मरण कवीला आहे. आताच्या कवितेत-मग अभंग, दोहे, ओवी, गजल, छंद-वृत्ते आदींमधून जी कविता प्रसवली गेली, तिने मात्र दु:खितांचे अश्रू पुसण्याचे महत्कार्य केलेले नाही. आजच्या कवितेवर टीपणी करताना कवी म्हणतो, *वृत्तात चालण्याचे शब्दास ज्ञान झाले, कविते तुझ्या लयीने जगणे सुरात आले...*जगण्याचे हे लयीचे सूर केवळ वर्तमानातल्या कवींनाच सापडले. कवी आजच्या काव्यजगताचा उपहास करताना म्हणतो, *कसला अभय कवी तू ? रचलेस हे मनोरे, जे ना तुला कळाले ! जे ना मला कळाले !...* हेच आजच्या काव्यजगताचे खोलवरचे कलहशील सृजन-वास्तव आहे. कवी मात्र या आभासी जगतातील काव्यवास्तवापासून सुरक्षित अंतरावर उभा राहून, आपल्या प्रातिभ-निर्मितीकडे एकमेव शेतकऱ्याच्या स्वाभिमानानं जगण्यासाठीचा अजेंडा समोर ठेवूनच बघतो आहे. नव्या यमाची नवीन भाषा त्याला कळलेली आहे.

*मला कळाली पुन्हा नव्याने, नव्या पिकांची नवीन भाषा*
*कठीण मातीत रुजणाऱ्या, नव्या बियांची नवीन भाषा*

*पुन्हा नव्याने नवीन फुटली, अबोलतेला नवीन वाचा*
*नवीन दृष्टी, नवे इरादे, निरक्षरांची नवीन भाषा*

*अता मुखातून शोषितांच्या, ज्वलंत हुंकार बोलताहे*
*नवीन शस्त्रे, नव्या मशाली, अहिंसकांची नवीन भाषा*

*कुणास बाहूत घेत मृत्यू, विभागतो देह चिंधड्यांनी*
*यमास थोडी दया न उरली, नव्या यमांची नवीन भाषा*

*श्रमास मातीत गाडण्याला, नव्या दमाचा विरोध आहे*
*नवीन शाई, नवे मनसुबे, अभय जनांची नवीन भाषा...*

कवीला यम ह्या अनादिअनंत काळापासून जगात मृत्यूचा फास आवळणाऱ्या यम ह्या पौराणिक मृत्यू कल्पनेसह वर्तमानातल्या ग्लोबल यमांची नवीन भाषा, नवीन शैली, नवीन मनसूबे पुरेपूर कळलेले आहेत. शोषणाच्या चरखातून चिपाडासारखे अस्थिपंजर मानवी देहाचे

फोलपट काढणाऱ्या, मृत्युशेष आत्महत्येचा मृत्युफास आवळणाऱ्या, नव्या जगातील नव्या यमांची जीवघेणी भाषा, ग्लोबल मृत्यूचे विकसित ग्लोबल तंत्रज्ञान मूळांपासूनच कळलेले आहे.

*श्वापदे पिसाळलीत शस्त्र घ्यायला हवे, झोपले असेल शेत जागवायला हवे...पेरले अभय अनेक बीज जाणतोस तू, हे प्रभो! निदान एक तरी अंकुरायला हवे... कोणीतरी यांची आता पडजीभ उपटली पाहिजे, नाटकी बोलतात साले, की गरीबी हटली पाहिजे...देच तुतारी फुंकून तू, इथेच, याच स्थळी, अशी की, क्रिया येथे आणि प्रतिक्रिया, दिल्लीत उमटली पाहिजे...*कवीचे हे कळवळ्याचे खोलवर विद्ध करणारे काव्यार्त त्याने नव्या जगाला कवितेतूनच सांगितलेले आहे. ते केवळ काव्यास्वादासाठी-काव्यानंदासाठी नाही; तर ग्लोबल काळात बोकाळलेल्या भांडवली विकृतीने नफाखोरीची लालसा भागवण्यासाठी सृष्टीच्या तारणहार्यालाच मृत्युपंथी नेण्याचे मनसूबे वेळीच समाजाच्या लक्षात आणून देण्यासाठी आहेत. विश्व कल्याणाच्या कळवळ्याने तळमळून बोलणाऱ्या महात्मा व्यवस्थेला, खोलवरचे हादरे देऊन, आता तरी जागे व्हा! आता शेतकऱ्यासाठी खोदलेल्या कबरीत पाय घसरून तुम्हीच पडण्याची पायवाट पर्यायाने तुम्हीच अधिक मोकळी करीत आहात! हीच गंभीर सूचना कवीने अत्यंत गंभीरपणे नव्या जगाच्या, नव्या यमांच्या, नव्या भाषेतच जगाला ठामपणे करून दिली आहे.

*लेखणीने लढाईस सज्ज व्हावे!* या कवितेत कवी म्हणतो, *अभ्यास चिंतनाला शास्त्रात घोळवावे, कसदार शब्दशेती फुलण्यास लेखणीने...*अबोलांच्या जीवांचे रक्षणास लढण्यासाठी, शेतीमातीचे मृत्युपंथी वास्तव चितारण्यासाठी तरी, भाकड-वृथा कथांच्या कक्षेपल्याड जाऊन, अभिजात सृजनाच्या लेखणीने तरी सृष्टीकर्त्याच्या कल्याणाची साहित्यातून शब्दपूजा बांधावी. *लटक्या-पुचाट शिरजोर वाणीची गच्ची धरावी!*चहूदिशांनी वादळ विराट रूप धारण करते, तेव्हाही लेखणीने दिवा तेवत ठेवण्यासाठी कवीला अभय द्यावे, अशी विनवणीही कवी प्रतिभावंतांना-कलावंतांना करतो. मढे मोजण्याला...शोषकांची जमात नेहमी सज्ज असते. *लपेटून फासामधी कायाला, ससे वाकुल्या दावती पारध्याला...*हेच आजचे सृष्टीच्या पालनहाऱ्याचे मृत्युपंथी वास्तव आहे. *करा की नका काम कोणी पुसेना, बिले चोख ठेवा लुटा आंधळ्याला...*हे वर्तमान शोषक व्यवस्थेचे जीवघेणे वास्तव आहे. अस्मानी-सुलतानी संकटांनी अनादी काळापासून शेतकरीच सर्वप्रथम लुटला जातो, कंगाल होतो, कर्जबाजारी होतो, दिवाळखोर होतो. शेवटी मृत्यूचा गळफास हाच त्याला दु:खऱ्यातनामुक्तीचा अनिवार्य पर्याय स्वीकारावा लागतो.

कवी म्हणतो, *इथे देवळाच्या चिखल भोवताली, स्मशाने चकाचक अभय तालुक्याला,* शहरात सुखोपभोगांचा लखलखाट तर तालुक्यातल्या आडगावातील स्मशानात शेतकऱ्याच्या

शवज्वाळा आकाशाला भिडलेल्या... *वरुणदेवाने फालतू त्याची जात दावू नये, गाभुळलेल्या शिवारास यंदा आग लावू नये*...असा वरुणदेवालाही सक्तीचा आदेश देऊन, फटकारण्यास कवी मागेपुढे पाहत नाही. महात्म्याला उद्देशून कवी म्हणतो, *पाहून घे महात्म्या, इथली शिवार राने, केला भकास भारत, शोषून इंडियाने...संपूर्ण सातबारा कोरा करू म्हणाले, भुललेत भाडखाऊ दिल्लीत पोचल्याने...वृद्धाश्रमात आई गोतावळ्यास झुरते, गायीस मात्र माता म्हणतात गौरवाने...मुर्दाड शासकांना सोयरसुतक नाही, हकनाक तूच मरशील गळफास घेतल्याने*...हेच सत्तेचे आणि पांढर्या कॉलरच्या सत्ताधाऱ्यांचे-लालफितशाहीतील शोषक अधिकाऱ्यांचे शोषण-वास्तव, महात्मा ज्योतीराव फुल्यांनी एकोणिसाव्या शतकातच *शेतकऱ्याचा असूड* मधून मांडल्याचेही आज स्मरण होते. शिक्षित-पांढरपेशा-सत्ताधारी अधिकारी वर्ग, खेडेगावातीलच कास्तकऱ्यांनी पोटाला चिमटे देऊन मुलं शिक्षित करून शहरात सत्ता सांभाळण्यास पाठवला, तोच बुर्ज्वा वर्ग-शेतकऱ्याचीच मुलं-आपल्याच गावखेड्यातल्या मायबापांच्या मढ्यांवर स्वार्थ-भ्रष्टाचाराच्या पोळ्या सेकून जगत आहेत...हे वास्तव आज जसेच्या तसेच वर्तमानाचे वास्तव म्हणून सर्वत्र शेतकऱ्याच्या, गावखेड्यातील शिवारांच्या भूमीत शेतकऱ्याचाच बळी घेत असल्याचे दिसत आहे... गावखेड्यातून शहरात सुखचैनीत स्थिरस्थावर झालेली नवीन पिढी, गाव सोडून गेली. गाव पांढरीच्या कुशीत आपल्या जन्मदात्यांना वेदना-दु:खाचे अखंड दान देऊन गेली. अनेक ग्रामीण कवींनी ह्या स्वार्थांधांवर कवितेतून कोरडे ओढले आहेत. परिणाम स्वरूप ग्रामीण कवी-लेखक मोठे झाले. गाव पांढरीची गढी केव्हाचीच भुईसपाट झाली. आता स्मशानातील राख सावडायलाही कवी-लेखक मुलांना उसंत मिळत नाही, इतके बदल ह्या ग्लोबल यंत्रमानव विसंवादी जगात सवयीचे झालेले आहेत. अंगवळणी पडले आहेत.

*वैश्विक खाज नाही* या अर्थघन कवितेत कवी म्हणतो, *शृंगारल्या मनाला वैश्विक खाज नाही, भोगत्व सोडले तर कसलाच माज नाही...खाणार काय घंटा ? सोने पितळ कि तांबे ?, शेतीमधे जर पिकले अनाज नाही...गावे बकाल आणिक शहरे सुजून आली, आम्हांस मात्र त्याची अजिबात लाज नाही...शालेय पुस्तकांनी मेंदू बधीर केला, बुद्धी भ्रमिष्टतेवर उरला इलाज नाही...* कवीने आपल्या कवितेतून पांढरपेशा-सत्ताधारी-शोषक व्यवस्थेच्या बुद्धिभेदांवर, दिशाभूल करणाऱ्या आश्वासनांवर-पॅकेजवर जळजळीत भाष्य केले आहे. कवीच्या भट्टीत अस्सल तेच टिकते. नल ते कितीही मोहमयी असले, तरी जळून खाक होते. हेच कवीच्या ज्वालाग्राही ऊर्जास्त्रोताचेही महात्म्य आहे. हेच गजलचेही निराळेपण आहे. हे विपरित जीवन अनादी काळापासून भोगत आलेल्या शेतकऱ्याच्या दु:खमुक्तीसाठी अस्सल गावरान-गावंढळ-कृषिवलांच्या जगण्याच्या भाषेलाच संस्कृतीच्या जागरणाचे माध्यम बनविणारा हा अभय कवी,

खरेच प्रतिभेच्या गर्भगाभ्यातला आत्मकल्लोळ-आत्मक्लेश आपल्या कवितेच्या रचनेतून अभिव्यक्त करतो, तेव्हा त्याची कविता ही कविता राहत नाही; तर क्रांतबिजांची समाज भूमीत मशागत करून, शेतकऱ्याच्या हिरव्या बोलीला शब्दरूपे देताना, जिवंत महाकारुण्याच्या निर्भय-निर्मळ जलवर्षावाने चिंब भिजवून, मरणाच्या हुडहुडीची अनुभूती देते. कवी अभयला जाणीव आहे की, ही आपली कविता पारंपरिक कवितेपेक्षा अनुभूतीच्या, दु:खमुक्तीच्या आसक्तीने समाजात पीडा निर्माण करणारी आहे. कवी गंगाधर-अभय गर्जना करतोय की, *माझी गजल निराळी*...हेच ते निराळेपण आहे. समाजात निराळेपणाचे तीव्र भान निर्माण करण्याचे प्रातिभ सामर्थ्य आहे...*माझी गजल निराळी,* हाच निराळेपणाचाही गजल-गाज गजलेच्या सांस्कृतिक अवकाशात निनादत आहे...

शेतकऱ्याच्या मुक्तीसाठी शब्दास्त्रांची-आयुधांची थाळीही कवीने सज्ज ठेवली आहे. पोशिंद्यांच्या रक्षणाचा अभयपूर्ण मक्ताही घेतल्याची सूचना, तो शेरास्त्रांची हाळी देऊनच समाजाला देतो. चेतनेची पेरणी आणि संघर्षाचे पिक घेणारा हा कवी कवितेच्या शेतीत अभय खते शिंपून, प्रतिभावंत कसदार माळी बनूनच कवितेची मशागत करतो. शेतकऱ्याची पिळवणूक-शोषण करणाऱ्या व्यवस्थेच्या माथ्यावर अर्थशिस्तीची वृत्तेही कोरतो. कवीच्या अभयशील सृजनशील प्रतिभेतून, त्याची गजल निराळी, सांस्कृतिक विश्वातील भूमीच्या तळठावातही ज्वालामुखीच्या उद्रेकाला वाट मोकळी करून देते. हे सर्व तो बळीराजाच्या दु:खमुक्तीच्या कळवळ्यातूनच करतो.

कवीची कविता किंवा गजल ही केवळ कविता राहात नाही तर समाजाच्या मरूभूमीत भुकंपाचे हादरे देणारे ते खरेतर शब्दास्त्रेच होत. शब्दास्त्रातून टणत्कार करणारी आयुधे होत. संत तुकोबा म्हणतातच की, *आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने, शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू*...**माझी गजल निराळी**तून हाच संत तुकोबाप्रणित शब्दास्त्रांचा झंझावात, समाजाच्या मनोभूमीत शेतकऱ्याच्या दु:खमुक्तीसाठी विधायक बिजांची संजीवन पेरणी करतो. कवी अभयच्या शब्दात अनुभूतीचे तेज आहे. जीवनाशयाच्या जिवंत अभिव्यक्तीचे प्रतिभा सामर्थ्य ओतप्रोत भरलेले आहे. कवीची कविता केवळ कविता म्हणून सृजनशील नाही, तर शेतकऱ्याच्या जीवनात आनंदी आनंद गडे... जिकडे तिकडे चोहीकडे...सृष्टीच्या चराचरात हिरवे सृजनमळे उगवण्याची जीवनदायी क्षमता असणाऱ्या सृष्टीच्या तारणहाऱ्यांच्या-पालनहाऱ्यांच्या जगण्याची तसेच त्याला सुखाने, आनंदाने, समाधानाने, स्वाभिमानाने जगवण्याची दिक्षा समाजाला देण्याचे खरेतर ते पावरस्टेशन आहे. पावरस्टेशन भस्मसात झाले तर जगात अंधराचे साम्राज्य

पसरते. पावरस्टेशनमधून ऊर्जा बाहेर पडण्याची जिवंत यंत्रणा सुरू राहत असेल तर जगाला अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचा मार्ग सुकर होतो. कवी अभयची कविता ही अशी गंगाधरची गंगावाहिणी-जीवनदायीनी-उत्तरवाहिणी आहे. गंगेच्या पाण्याने जगाचा भोवताल जसा सुखशांतीने नांदतो, तसाच कवी गंगाधरच्याही काव्यजलाने सांस्कृतिक आणि सामाजिक भोवताल-आनंदाने, सुखासमाधानाने नांदण्याची संभाव्यताच नव्हे तर आश्र्वासकताही त्याच्या काव्यसृजनात काठोकाठ भरलेली आहे.

तात्पर्य, शेतकरी साहित्य ज्ञानानुभवांकित शाखेत गजल काव्यप्रकाराची निर्मिती करून, कवी गंगाधरने शेतकरी साहित्याला संपृक्त आणि समृद्ध केले आहे. कवी गंगाधर मुटे यांच्या ह्या असाधारण प्रतिभा सामर्थ्य व्यक्त करणाऱ्या *माझी गजल निराळी*... या गजल संग्रहाच्या तिसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन, तिसऱ्या अखिल भारतीय शेतकरी साहित्य संमेलनाच्या सांस्कृतिक विचारपीठावरून होत असल्याबद्दलही खूप मोठे समाधान झाल्याचे मनोमन कृतार्थ-कृतज्ञ वाटते. कवी गंगाधर मुटेला आणि त्याच्या कवितेलाही उज्वल भविष्य असल्याचेही या निमित्ताने सांगावेसे वाटते. अशीच क्रांतशील भाषा आणि विचारांची अभिव्यक्ती पुढेही भविष्यात कवीच्या लेखणीतून होत राहावी, यासाठी हार्दिक शुभेच्छा. *जय जवान जय किसान जय कवी अभय*...

**- डॉ. किशोर सानप**

प्रमुख अतिथी,
अ. भा. तिसरे शेतकरी साहित्य संमेलन, गडचिरोली.
कमला नेहरू शाळेजवळ, रामनगर, वर्धा-४४२००१
दूरध्वनी-९३२६८८०५२३, ९४२२८९४२०५
email-dr.kishorsanap@gmail.com
web-www.kishorsanap.com

★★★

## दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

'गजल हा काव्यप्रकार ऐकायला जितका गोड आणि मनाला भुरळ घालणारा तितकाच तो लिहायला कठीण' असे साहित्यातील अनेक जाणकारांनी वेळोवेळी आपले मत व्यक्त केलेले आहे. गंगाधर मुटे यांची व माझी ओळख ही गेल्या काही वर्षातील. शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते आणि संकेतस्थळावरील लेखक एवढीच त्यांची माझी ओळख.पण त्यांचा 'रानमेवा' हा काव्यसंग्रह जेव्हा वाचला तेव्हा जाणवले की अरे हे तर उत्तम कवी देखील आहेत.

मागच्या वर्षी जेव्हा त्यांच्या काही गजला वाचल्या तेव्हा त्या आवडल्या व या सर्व गजलांचे एक देखणे पुस्तक प्रकाशित करावे असे ठरवले.

नोव्हेंबर २०१३ ला 'माझी गजल निराळी' या गजलसंग्रहाची पहिली आवृत्ती प्रकाशित झाली व मे २०१४ मध्ये पहिली आवृती हातोहात संपली देखील. रसिक वाचकांच्या हाती 'माझी गजल निराळी' या गजलसंग्रहाची ही दुसरी आवृत्ती देताना आम्हाला खूप आनंद होत आहे.

असाच स्नेह कायम रहावा ही श्री चरणी प्रार्थना!

आपलाच स्नेही

**राज जैन**

शब्दांजली प्रकाशन, पुणे

★★★

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना :
## गजलविश्वाची परिभाषा बदलणारा गजलसंग्रह

मागच्या विजयादशमीलाच 'माझी गजल निराळी' हा गंगाधर मुटेंचा गजलसंग्रह प्रकाशित झाला आणि लागलीच दुसरी आवृत्ती. 'वाह! हार्दिक शुभेच्छा गंगाधर मुटेजी !!' असेच उद्गार निघाले, जेव्हा ही बातमी ऐकली. या गजलसंग्रहाची प्रकाशनापूर्वीच अनेकांना प्रतीक्षा होती त्यापैकी मी सुद्धा एक होतो. शेतकऱ्याच्या वेदनांची कैफियत मांडण्यासाठी त्यांनी गजल हा काव्यप्रकार निवडावा हेच मुळी धाडसाचे काम आहे. हा गजलसंग्रह विषयाच्या अनुषंगाने अद्वितीय असाच आहे. 'शेतकऱ्याचा आसूड' या महात्मा फुलेंच्या पुस्तकानंतर शेतकऱ्याच्या जीवनाला समग्र स्पर्श करणारे लिखाण माझ्या वाचनात आले नव्हते. ही पोकळी गंगाधर मुटेंच्या समर्थ लेखणीने भरून काढली आहे.

मी तसा या प्रांतात नवखाच. दोनशेच्या आसपास गजला लिहिल्यानंतर मला अद्यापही हे उमगले नाही की नेमके मी कोणासाठी लिहीत आहे. परंतू गंगाधर मुटेंकडे मात्र याचे स्पष्ट उत्तर आहे. त्यांचे लेखन त्या तमाम कष्टकऱ्यांसाठी आहे. ज्यांच्याकडे या उद्दाम राज्यकर्त्यांनी युगानुयुगे जाणून बुजून दुर्लक्ष केले आहे.

असेच एकदा फेसबुकवर पडणाऱ्या शेकडो गजलांच्या पावसाचा आनंद लुटत आणि अधून मधून एखादा शेर लिहीत बसलो होतो. अनेक विषय होते - हृदय आणि त्याच्या विविध विकारांचा आशय असलेले, 'उमदा खयाल' वाले. तेवढ्यात मेसेज बॉक्स मध्ये प्रसिद्ध विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, लेखक, कवी, असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व लाभलेले माझे स्नेही, अमर हबीब यांचा मेसेज डोकावला. तो असा होता- 'काय हो, आपल्याला परिचित एखादा शायर आहे का, जो शेतकऱ्याच्या दयनीय स्थितीवर लिहितो ?' मला सुरुवातीला वाटले अमर हबीबजींना असे म्हणावयाचे आहे की 'काय हो, तुम्हाला काही उद्योगबिद्योग नाही का ? कसल्या गजला लिहिता ? जरा ज्वलंत सामाजिक विषयाचे भान ठेवून लिहीत चला.' परंतू त्यांना खरेच कुठेतरी याच विषयावर व्याख्यान द्यायचे होते. मी विचारात पडलो 'गजल आणि शेतकरी' ! बापरे याप्रसंगी वीज चमकल्यागत गंगाधर मुटे हे नांव माझ्या डोळ्यासमोर

आले आणि लागलीच मी गंगाधर मुटें हेच एकमेव व्यक्तिमत्त्व शेतकऱ्याची गाऱ्हाणी गजलेतून मांडते, हे बिनदिक्कतपणे सांगितले होते.

एकंदर काय तर हजारोंच्या घरात आज महाराष्ट्रात मराठी गजलकारांची संख्या गेली असूनही, कास्तकारांच्या मूक वेदनांना समाजासमोर मांडणारे गंगाधर मुटे हेच एकमेव नांव ! हा स्तंभ मला टाळताही आला असता परंतू मुद्दाम लिहितोय. गजलेचे अध्वर्यू सुरेश भट यांनी मराठी गजलेचे दालन येणाऱ्या पिढ्यांसाठी खुले केले हे अंतिम सत्य. सुरेश भटांनंतर सर्वार्थाने मराठी गजलेचा झेंडा अटकेपार रोवणारे दोन व्यक्तिमत्त्व मला ज्ञात आहेत, एक इलाही जमादार व दुसरे भीमराव पांचाळे ! याचा अर्थ असा मुळीच नाही की आम्ही निव्वळ सुमार लिहितो... !

काय आहे ही गजल ? फक्त दोन ओळींची पूर्ण कविता ? तरीही अभिव्यक्तीचे एक सशक्त माध्यम. आज माझ्यासारख्या पामराकडेही १ ९ ४ अक्षरगणवृत्तं आणि ४ ६ मात्रावृत्तांची यादी का यावी ? अर्थातच मराठी मातीत गजलेची पाळेमुळे आता अगदी खोलवर रुजू लागली आहेत. गंगाधर मुटेंच्या 'माझी गजल निराळी' या गजलसंग्रहाची पहिली आवृत्ती हातोहात संपणे हे त्याचेच द्योतक आहे !

काव्यलेखनाचा हा प्रपंच समाज घडवण्यासाठी केलेला पाहून आनंद होतो. शेतकऱ्याच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांच्या संघर्षाची मशाल सदैव तेवती ठेवण्याचे कठीण काम गंगाधर मुटेंजीनी लीलया पेलले आहे. ८० गजलांचा हा संग्रह गजलविश्वाची परिभाषा बदलणारा असा आहे.

**घामाची कत्तल जेथे, होते सांज सकाळी**
**तुतारी फुंकते तेथे, माझी गजल निराळी**

या मतल्याने त्यांनी आपली गजल सुरू करून पुस्तकाच्या अगदी सुरुवातीलाच आपली भूमिका स्पष्ट केली आहे. उठसूट गजलेचे वाटोळे करत सुटलेल्या बाजारबुणग्यांना खालील शेर बरेच काही सांगून जातो.

**शब्दांची गुळणी नोहे, नव्हेच शब्द धुराडा**
**निद्रिस्थी जागवण्याला, गातो शेर भुपाळी**

अस्मानी सुलतानीच्या फेऱ्यांत अडकलेला शेती व्यवसाय अधोरेखीत करताना ते म्हणतात,

**अडदांड बेत ओला शिजवून पावसाने**
**केला शिवार खच्ची भिजवून पावसाने**

वातानुकूलित काव्य आणि रणरणत्या उन्हात कष्टकऱ्यांच्या घामातून झरणारे काव्य, इंडिया आणि ग्रामीण भारतातील फरक स्पष्ट करून जाते. हा गजलसंग्रह त्या दृष्टीनेही महत्त्वपूर्ण वाटतो.

**तुझे तडाखे सोसून काया झिजून गेली सुकून गेली**
**तरी निसर्गा ! कुठे मनाने यत्किंचित मी खचून गेलो ?**

अशा या दुर्दम्य इच्छाशक्तीचा आधार घेत गंगाधर मुटेंची गजल उभी राहते आणि ती जगण्याचे बळही निर्माण करते. नव्हे बेसूर जीवनाला सुरात आणते.

**वृत्तात चालण्याचे शब्दांस ज्ञान झाले**
**कविते तुझ्या लयीने जगणे सुरात आले!!** वाह! क्या बात है!

खरे तर गंगाधरजींची गजल सर्वच मानवी भावनांना स्पर्श करताना दिसते. त्यांची गजल बेमालूमपणे एखादवेळी गजलप्रांताच्या मूळगावी सुद्धा लाजतमुरडत जाऊन येते आणि हळुवार यौवनसुलभ वंचनांचा ठाव घेते. मग हे वेगळेपणही रसिकमनाचा ठाव घेणारे ठरते. त्यांची प्रेमरसाने ओतप्रोत भरलेली एक गजल मला बरीच भावली.

**किती गोड ताज्या स्मृती त्या क्षणांच्या, तुझे ते बिथरणे वगैरे वगैरे**
**छुप्या पावलांनी हळुवार येणे, दुपट्टा घसरणे वगैरे वगैरे**

ही गजल शृंगार रसाने ओतप्रोत भरलेली तर आहेच शिवाय ती गंगाधर मुटेंच्या समर्थ लेखणीची साक्ष देणारीही आहे. बहोत बढिया, लाजवाब आणि जबरदस्त गजलियत असलेली गजल म्हणजे ही गजल. त्यानंतरचे शेर तर शायराला शब्दांची पकड मिळाल्याने लाभलेली समाधी अवस्थाच. अव्वल गजल आहे ही.

ही गजल वाचली की मला हसरत मोहनीच्या गजलेची आठवण होते... उर्दू मराठीची गजलियत समपातळीवर येत असल्याचे पाहून आनंदही वाटतो. तीच ती गजल जी गुलाम अली ने गायीली. चुपके चुपके रात दिन आँसू बहाना याद है। मधील हा शेर पहा -

**खेंच लेना वो तेरा परदे का कोना दफतन**
**और दुपट्टेसे तेरा वो मुँह छुपाना याद है!**

देशाचा पोशिंदा हा राजकारणात चेष्टेचा विषय होवून बसला आहे. शेतकरी संघटनेच्या शरद जोशींनी उभ्या महाराष्ट्रात कुचकामी व्यवस्थेविरुद्ध संघटनेच्या माध्यमातून एल्गार पुकारला तेव्हा मी अंबाजोगाईत महाविद्यालयीन शिक्षण घेत होतो. भाईंच्या त्या बोलबाल्याच्या लढ्यात माझ्या सख्या भावाला तेव्हा शिक्षण सोडून स्वत:ला झोकून द्यावे लागले होते. त्यांना प्रेरित करणारे आजही त्या सुखद क्षणांना जपतात, हा सत्याच्या जपणुकींसाठीचा आदर्श असावा. माझ्या तरुण मनाला तेव्हा वाटले होते माझा शेतकरी बाप आता युगानुयुगांच्या जोखडातून मुक्त होईल. परंतू दुर्दैवाने तो लढा पुढे कमजोर होत गेला. त्याला बळ देण्याचे काम गंगाधर मुटेंनी गजलेच्या माध्यमातून नक्कीच केले आहे. ही आशा पल्लवित करणारी 'अन्नधान्य स्वस्त आहे' ही गजल मनाचा ठाव घेणारी आहे...

**कोरडा दुष्काळ तेव्हा पांढरे पक्षी दिसेना**
**कंच पिकलेल्या सुगीला मात्र त्यांची गस्त आहे!**
वाह! किती सुंदर अभिव्यक्ती आणि किती सखोल आशयगर्भता!!

मिर्ज़ा गालिब आणि बहादूर शाह जफर यांचे जीवन आणि गजल वेगळे केले जाऊ शकत नाहीत. गजल जगावी लागते तेव्हाच निपजते. गंगाधरजींच्या बाबतीतही ही उक्ती मला योग्य वाटते. ज्यांना मातीच्या कळांची जाण नाही, ते या काळ्या आईवर काय लिहिणार? प्रत्यक्ष राबते हातच राबणाऱ्यांच्या जाणिवांची सशक्तपणे अभिव्यक्ती करू शकतात. गंगाधरजींचा हा मतला हे सिद्ध करण्यासाठी स्वयंसिद्ध आहे.

**कसा जोम यावा खुरटल्या पिकांना, नवे बीज ते अंकुरावे कसे?**
**तणांचाच जेथे असे बोलबाला, तिथे अन्य काही रुजावे कसे?**

वाह.....!! अगदी साक्षात कास्तकारच ही खंत व्यक्त करू शकतो!

अण्णा हजारेंनी निर्माण केलेली चळवळ भारतीय इतिहासात सुवर्णअक्षरांनी नक्कीच नोंदवली जाईल. 'गोरे गेले काळे आले ! देशाचे वाटोळे झाले !!' असे म्हणत दिल्लीच्या तख्ताला पळताभुई थोडी करणाऱ्या या आंदोलनाच्या प्रभावाखाली कोण येणार नाही? गंगाधरजींसारखे व्यक्तिमत्त्व, ज्याला अन्यायाची चीड व चाड आहे, ते तर न आले तर

नवलच! त्यांची 'वादळाची जात अण्णा' ही गजल म्हणजे ज्वलंत सामाजिक परिस्थितीवर जळजळीत प्रहार करण्याच्या प्रक्रियेतून साकारलेले एक सुंदर शिल्पच जणू-

**धर्म सत्तेचा कळेना, का असा सोकावलेला ?**
**भ्रष्ट नेते मोकळे अन् , कोठडीच्या आंत अण्णा !**

**भ्रष्ट आचारास सत्ता, मुख्य झाला स्त्रोत आहे,**
**घाव घाला केंद्रस्थानी, एकदा द्या मात अण्णा!**

**आस अण्णा श्वास अण्णा, 'अभय' तेचा ध्यास अण्णा.**
**अग्निलाही पोळणाऱ्या, वादळाची जात अण्णा !**

गजलेचे एक दिलखुलास रूप म्हणजे हजल. 'माझी गजल निराळी' मधील एकूण ? हजल अतिशय विनोदी तथा हजलविश्वाला समृद्ध करणाऱ्या अशाच आहेत. त्यातील मला अतिशय आवडलेले ? शेर मी इथे मुद्दाम अधोरेखीत करतो आहे-

**मारली मी मिठी त्या क्षणी वाटले**
**शेरणीच्याच जबड्यात गेला ससा**

**भोजनाचा लुटा स्वाद पंक्तीमध्ये**
**अक्षता टाकण्याला असा वा नसा**

**करा बंद कानात आकाशवाणी**
**अरे मच्छरांनो बघा पेंगतो मी**

**उगाच पिळतोस रे मिशा तू, कडमडणे हा विकार आहे**
**तिच्या खुंट्याला तुझ्याप्रमाणे, टुकार घोडे हजार आहे**

**बघा जरा हो बघा जरासे, कसा भामटा फुगून गेला**
**मुरूम-गिट्टी अमाप खातो, तरी न देतो डकार आहे..**

वाह वा! माझी हजल निराळी !!

गजलकाराचे व गजलेचे वय जसजसे वाढत जाते तसतसे ते दोघेही तरुण होत जातात असे माझे गुरु तथा सुरेश भटांचे शिष्य आदरणीय प्रा. सतीश देवपूरकर म्हणतात.

याचा प्रत्यय हा गजलसंग्रह वाचून येतो. गंगाधर मुटेंची गजल विविध खयालांना एकत्र घेऊन पुढे पुढे अधिकच संपन्न होत गेलेली आहे. गजल निर्मितीत चिंतनाला अतिशय महत्त्व आहे. शिवाय एखाद्या शेराच्या परिपूर्णतेसाठी तास न् तास चालणारा रियाज ही तेवढाच महत्त्वाचा असतो. वृत्तबद्ध रचनांची बांधणी म्हणावी तेवढी सोपी नाही परंतू रियाजाअंती ती सहज साध्य आहे मात्र कमीतकमी शब्दांत दांडगा विचार मांडणे तसे जिकिरीचेच काम आहे. वैचारिक प्रगल्भतेचे प्रतिबिंब तेव्हाच गजलांतून अगदी सहज उतरत जाते, जेव्हा एखादा गजलकार एखाद्या रचनेत रात्रंदिवस अडकून पडतो. दोन मिसरे एका सेकंदातही सुचू शकतात किंवा त्याला दोन दिवसही लागू शकतात. अशावेळी चिंतनाच्या विविधपैलुंची झलक एखाद्या शेरामध्ये एकाचवेळी दिसून येते. गंगाधरजींचा काही गजलांचा या अंगाने विचार केला तर त्यांची वैचारिक ठेवण गजलकार म्हणून प्रथम श्रेणीची वाटते. गजलकार हा प्रथम दर्जाचा विचारवंतही असायलाच हवा. त्यांचा हा मतला आणि काही शेर या बाबीची प्रचिती नक्कीच करून देतात. पहा -

**घमासान आधी महायुद्ध होते!**
**पुढे माणसांचे यशू-बुद्ध होते!**

किती सुंदर विचार मात्रांची कसलीही सूट न घेता मांडलेले आहेत! 'रूप सज्जनांचे' ही गजलसुद्धा तितकीच नितांत सुंदर झाली आहे. नमुन्यादाखल शेर

**लेऊन फार झाले, हे लेप चंदनाचे**
**भाळास लाव माती, संकेत बंधनाचे!**

असे सुंदर शेर सहज साध्य असत नाहीत. यासाठी करावा लागतो तास न् तास रियाज. यासाठी जगावी लागते गजल. याचसाठी शायर लिहीत राहतो तहयात. गजल साधनेत गंगाधरजी कुठेच कमी पडलेले नाहीत हेच यातून स्पष्ट होते.

'माझी गजल निराळी' च्या दुसऱ्या आवृत्तीत नवीन दोन गजलांची भर पडत आहे ही अतिशय आनंदाची बाब आहे. 'टिकले तुफान काही' आणि 'अमेठीची शेती' या दोन्ही गजला परत शेतकऱ्याच्या डोक्यावरील फाटक्या आभाळाची जाणीव करून देतात. खरे आहे आपले, गंगाधरजी, अपूर्णतेची खंत घेऊन पोशिंदा आजही हळहळतो आहे.

**ललकारण्या दिशांना, उठले तुफान काही!**
**त्यातील फार थोडे, टिकले तुफान काही!**

**निद्रिस्त चेतनेचे, सामर्थ्य जागवाया,**
**पोटात सागराच्या घुसले तुफान काही !**

या दोन्हीही गजलांतील एकूण एक शेर दर्जेदार आहेत. नवचैतन्य जागवणारे आहेत. न्याय्य हक्कांच्या लढ्याची तुतारी फुंकणारे आहेत. पिढ्या न् पिढ्या अंधारात खितपत पडलेल्यांना आशेचा किरण दाखवणारे आहेत. आपल्या लेखणीच्या ताकदीची चुणूक दाखवणारे आहेत. त्याच त्या राजकारणाचा वीट आलेल्या समाजाच्या डोळ्यात अंजन घालणाऱ्या आहेत. हा गजलसंग्रह वाचून ‘साये में धूप‘ या दुष्यंत कुमारांच्या गजलसंग्रहाची आठवण झाली. त्यांची एक गजल गंगाधर मुटेंच्या विचारांशी मिळती जुळती आहे, त्यातील दोन शेर येथे देणे मला क्रमप्राप्त वाटते.

**सिर्फ हंगामा खडा करना मेरा मकसद नही,**
**मेरी कोशिश है कि ये सूरत बदलनी चाहिए ।**

**मेरे सीने में नही तो तेरे सीने में सही,**
**हो कहीं भी आग, लेकीन आग जलनी चाहिए।**

यापुढेही पिढ्यानपिढ्यांच्या अबोल आवाजाला गंगाधरजींनी असेच बोलते करत राहावे. त्यांचे चळवळीतील कार्य यशस्वी व्हावे, यासाठी विधाता त्यांना सर्वतोपरी बळ तथा उदंड आयुष्य देवो हीच सदिच्छा ! ... गंगाधर मुटे यांना ‘माझी गजल निराळी‘ च्या दुसऱ्या आवृत्ती निमित्त मन:पूर्वक शुभेच्छा !!

**- राज पठाण**
अंबाजोगाई, जि. बीड.
दि. ०६ मार्च, २०१४

★★★

## पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना :
## कविते तुझ्या लयीने जगणे सुरात आले !

कोणताही साहित्यप्रकार हा त्या-त्या साहित्यिकाच्या स्वभावानुरूप आकार घेत असतो. मग ती कथा असो, कादंबरी असो, वा कोणताही काव्यप्रकार असो... कथा वाचूनही लेखकाच्या स्वभावाचे पैलू कळतात की हा लेखक कोणत्या धाटणीचा आहे आणि कवितेत तर त्या कवीचे अंतरंगच उलगडून ठेवलेले असतात. शिवाय कवी हा इतर कोणत्याही साहित्यिकाहून अधिक संवेदनशील असतो. अगदी झाडावरून गळणारं पिकलं पान पाहून सुद्धा त्याचं मन हेलावून जातं. केवळ कविता वाचूनच जातीवंत कविचा जीवनपट नजरेसमोर उभा ठाकतो.

गजल हा तसा तंत्रानुगामी काव्यप्रकार आहे... यात मात्रांचे, वृत्ताचे बंधन असल्यामुळे फार कमी कवी या प्रकाराकडे वळले आहेत. आणि या प्रकाराकडे वळलेल्यांमध्येही फार कमी लोकांनी चांगली गजल मराठी साहित्याला दिली आहे. गजलकारांचा आकडा शेकड्यांनी असला तरी सकस गजल लिहिणाऱ्यांची संख्या उणीपुरीच आहे.

गंगाधर मुटे हे असेच एक उल्लेखनीय नाव आहे. मातीचं गाणं लिहिणाऱ्या या कवीची नाळ मातीशी कायम जुळलेली आहे. रानमेवा हा त्यांचा काव्यसंग्रह आधीच प्रकाशित झाला आहे. मुळात शेतकरी असल्यामुळे मातीशी तसेही नाते जडलेले. शिवाय गंगाधर मुटे हे शेतकरी संघटनेचे खंदे कार्यकर्ते असल्यामुळे शेतकऱ्यांच्या अडी-अडचणींना, व्यथांना त्यांच्या लेखणीतून वाचा फुटलेली दिसते.

**सदैव पुसतोय आसवांना तो पदर भुमिचा ओला**
**आसू पुसता हळूच पुसतो, आली जाग शिवारा?**

अशी रचना त्यांच्या लेखणीतून सहज साकारते. अनेकदा त्यांची लेखणी पीक, पेरणी या विषयावर मार्मिक टीप्पणी करते. अशावेळी व्यथा सांगत असतानाच ते पुसटसे बंडखोर देखील होताना दिसतात... त्यांची ही एक गजल पहा...

**कसा जोम यावा खुरटल्या पिकांना, नवे बीज ते अंकुरावे कसे?**
**तणांचाच जेथे असे बोलबाला, तिथे अन्य काही रुजावे कसे?**

**पुन्हा आज होऊ नये तेच झाले, कशा थांबवाव्यात वाताहती?**
**हवेनेच केला जिथे कोंडमारा, तिथे प्राण जाणे टळावे कसे?**

**तुझा पिंड आहेच विश्वासघाती, तसा एक अंदाज आहे मला**
**तरी जीव गुंतून जातो तुझ्याशी, मनाचे पिसे कुस्करावे कसे?**

**जरी सत्य तू बोलशी मान्य आहे, परी त्यास आहे कुठे मान्यता?**
**सही आणि शिक्क्याविना व्यर्थ सारे, पुरावे तुझे मान्य व्हावे कसे?**

**कशी एकटी हिंडते रानमाळी, जरी अर्धवेडी भिते ना कुणा**
**तिला फक्त भीती जित्या माणसांची, पशूंना तिने घाबरावे कसे?**

**कसा व्यर्थ नाराज झालास आंब्या, वृथा खेद व्हावा असे काय ते**
**फळे चाखण्याचेच कौशल्य ज्याला, तया ओलणे ते जमावे कसे?**

**शिवारात काळ्या नि उत्क्रान्तलेल्या खुज्या माकडांचा धुमाकूळ तो**
**जिथे कुंपणे शेत खाऊन गेली, तिथे त्या पिकांनी लपावे कसे?**

**'अभय' काळजी त्या मृताची कशाला, स्मशानात जागा हवी तेवढी**
**समस्या इथे ग्रासते जीवितांना, विसावा कुठे अन् वसावे कसे..!**

कसा जोम यावा खुरटल्या पिकांना, नव्या पिकांची नवीन भाषा, मरणे कठीण झाले, भुईला दिली ओल नाही ढगाने, भाजून पीक सारे पाऊस तृप्त झाला, आत्महत्या बळीच्या तू रोख वामना, गहाणात हा सातबारा... या त्यांच्या रचना विशेषत्वाने शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणाऱ्या आहेत. पण गंगाधर मुटे हे कुठेही एकाच विषयात अडकून पडलेले दिसत नाहीत. मातीचं गाणं लिहिणारा हा कवी शृंगार देखील काव्यात तितक्याच खुबीने मांडताना दिसतो... आणि...

**ती बोलली तरी का शब्दास नाद येतो**
**त्या बोलक्या स्वरांचे झंकार चित्तवेधी**

असा एखादा शेर आपल्याला वाचायला मिळतो.

मक्ता या गजलेतील एका परंपरेची कास गंगाधर मुटे यांनी धरलेली दिसते. मक्ता म्हणजे कवीचे नाव अथवा टोपणनाव असलेला शेवटचा शेर... गंगाधर मुटे हे काव्यात आपले अभय हे टोपणनाव वापरतात. मक्ता लिहिताना एका गोष्टीची विशेष काळजी घ्यावी लागते. ती म्हणजे मक्त्यामध्ये आपले नाव लिहिताना तेथे एखाद्या मौल्यवान शब्दाची जागा वाया तर जाणार नाही ना ? किंवा हे नाव त्या शेराच्या अर्थाला पूरक आहे ना ? या गोष्टींची काळजी घेणे. आणि अशी काळजी गंगाधर मुटे यांनी घेतलेली दिसते... मक्ता असलेले त्यांचे काही शेर पहा...

**संचिताचे खेळ न्यारे... पायवाटा रोखती**
**चालता मी अभय रस्ता काळही भारावला**

**आता अभय जगावे अश्रू न पाझरावे**
**आशेवरी निघावे ही वाट चालताना**

**नको रत्न मोती, न पाचू हिरे ते**
**अभय ते खरे जे मिळाले श्रमाने**

**आत्महत्या बळीच्या तू रोख वामना**
**मी अभयदान इतुके मागून पाहिले**

**घे हा अभय पुरावा त्यांच्या परिश्रमाचा**
**ती माणसेच होती जी कोहिनूर झाली**

गंगाधर मुटे यांना कवितेच्या, गजलच्या रुपाने जगण्याचे संचित गवसले आहे. म्हणूनच तर ते म्हणतात...

**वृत्तात चालण्याचे शब्दास ज्ञान झाले**
**कविते तुझ्या लयीने जगणे सुरात आले**

खूप काही चांगले लिहिण्याची क्षमता असणाऱ्या गंगाधर मुटे यांना पुढील गजल लेखनासाठी शुभेच्छा...

**- सुधाकर कदम** : जेष्ठ गजलगायक, संगीतकार
सोमवार, १० जून २०१३,
जागतिक दृष्टिदान दिन

★★★

## परीक्षकांचीच परीक्षा घेणारा गजलसंग्रह

अलीकडेच प्रकाशित झालेली 'वांगे अमर रहे' व 'माझी गजल निराळी' ही दोनही पुस्तके वाचली. वाचकाला अस्वस्थ करण्याचे व विचार करायला भाग पाडण्याचे काम या लिखाणातून निश्चितपणे झाले आहे. कृषिप्रधान भारतातील, शेतात घाम गाळणाऱ्या शेतकरी समाजाचे दुर्दैवी भयाण वास्तव परिणामकारक शब्दांत या लिखाणात व्यक्त झाले आहे.

'वांगे अमर रहे' या लेखसंग्रहातील प्रत्येक लेखात व्यक्त झालेली व्यथा भारताच्या अर्थव्यवहारातील व्यंगांवर नेमकेपणाने बोट ठेवणारी आहेच आणि त्याचबरोबर 'शेतकऱ्याचा आसूड' ओढण्याची ताकदही त्यातून समर्थपणे प्रगट झाली आहे.

गणित विषयात पदवी घेतलेल्या श्री गंगाधर मुटे सारख्या शेतकरी कुटुंबातील तरुणाकडून या साहित्यकृतींची निर्मिती अधिकच अभिनंदनीय व परीक्षकाचीच परीक्षा घेणारी झाली आहे. दुसऱ्या बाजुने असेही म्हणता येईल की, शेतकरी संघटनेने मांडलेले अर्थशास्त्र कदाचित इतरांपेक्षा अधिक बारकाव्याने गंगाधर मुटेंना समजले व त्यामुळेही ते परिणामकारक शब्दांत त्यांच्या साहित्यात उतरले आहे. साहित्यनिर्मितीसाठी अनेक बाजू किंवा उद्देश्य असू शकतात. तथापि, सामाजिक अन्यायाविरुद्ध पोटतिडीकीने जी वेदना व्यक्त होते ती सामाजिक परिवर्तनाकडे नेमकेपणाने अंगुलिनिर्देश करणारी ठरते आणि म्हणूनच मूल्यवान ठरते. तेच मूल्य गंगाधर मुटेंच्या पुस्तकांतील या शब्दांना प्राप्त झाले आहे असे म्हणणे अतिशयोक्त ठरू नये. 'आनंदाचे डोहीं, आनंद तरंग' याप्रमाणे आनंदाच्या डोहात डुंबण्याचा अनुभव घेण्याचे सामर्थ्य या शब्दांत आणि अनुभूतीत नसेल तथापि, तुकारामांच्या अभिव्यक्तीतील 'नाठाळाचे माथां, हाणूं काठी' असा आत्मविश्वास त्यांतून व्यक्त झाला आहे. समाजातील कुप्रथा, जातीपातींच्या अतूट भिंती आणि लोककल्याणकारी राज्याच्या नावाने चाललेल्या भ्रष्ट कारभारातील विसंगतीवर वेगवेगळ्या कालखंडात अनेक समाजधुरीणांनी (उदा. गाडगेबाबा, महात्मा फुले इ. इ.) कठोर शब्दांत आवाज उठविला याची आठवण करून देणारा हा आक्रोश आहे असे वाटते.

या पुस्तकांच्या निमित्ताने तुलना करण्यासाठी मी जे लिहिले आहे त्यामुळे काहीना आश्चर्यही वाटेल. परंतु, ज्या देशात, आजच्या परिस्थितीत, घाम गाळणारा व कष्ट करणारा जगाचा पोशिंदा शेतकरी लाखोंच्या संख्येने आत्महत्या करतो आहे त्या परिस्थितीत कोणत्या

शब्दांचा प्रयोग करावा ? शरीराला महारोग झाला म्हणजे त्या शरीराची संवेदना नष्ट होते; तथापि, त्याच्यावरही उपचार करता येऊ शकतात. मात्र, आज समाजमनाला बधीरतेचा असा कोणता रोग झाला आहे की ज्याचा शोध घेऊन त्यावर उपचार करणे कठीण व्हावे, अशक्यप्राय व्हावे ? त्या व्यवस्थेचे वर्णन-विश्लेषण कोणत्या शब्दांत करावे ? अश्या परिस्थितीत गंगाधर मुटे सारखा तरूण आपल्या ठिकाणी असलेल्या प्रतिभेच्या माध्यमातून काही मांडतो आहे, लिहिण्यासाठी सुधारण्याच्या अपेक्षेने सतत धडपडतो आहे त्यामुळे अशा प्रकारे तुलनात्मक मांडण्याचा प्रयोग मी करतो आहे.

सन १९८० नंतरच्या दोन दशकांत महाराष्ट्रात शेतकरी संघटनेचे वादळ उठले. भूतकाळाचे अचूक विश्लेषण आणि भविष्यकाळाचा नेमका वेध घेणारे शरद जोशी यांचे नेतृत्व संघटनेला लाभले. संघटनेच्या भरतीचा हा काळ. या भरतीच्या लाटा छातीवर झेलण्यासाठी असंख्य तरूण यात उतरले. शतकानुशतके घाव झेलून वेदना मुकी झालेल्या व सदान् कदा मनं मारली जाऊन मुर्दाड झालेल्यांना नवी ऊर्मी, नवी प्रेरणा या विचाराने निश्चितपणे मिळाली. लाखोंच्या संख्येने शेतकरी भाऊबहिणी रस्त्यावर उतरले. शेतकऱ्याच्या व कष्टकऱ्याच्या स्वातंत्र्याची प्रेरणा घेतलेल्या आणि घरदार सोडून काम करण्यासाठी तयार झालेल्या तरूण संघटनापाईकंची फौज उभी राहिली. पारतंत्र्यानंतर प्रथमच शेतकरी भावांच्या बरोबरीने मायभगिनी तुरुंगात जाण्यासाठी घराबाहेर पडल्या. धास्तावलेल्या स्वकीयांच्या सरकारातील आमच्याच राज्यकर्त्या पोरांनी आपल्या भावांच्या छातीत गोळ्या घालून त्यांचे बळी घेतले, मायभगिनींना लाठ्याकाठ्यांनी सोलून काढले. महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर इतर राज्यांतही शेतकरी संघटनेच्या प्रभावाखाली शेतकऱ्याची एकजूट झाली. राज्य सरकारे आणि केंद्र सरकार यांना संघटनेच्या अर्थशास्त्रीय विचारांची दखल घेण्याशिवाय पर्याय उरला नाही. मात्र संघटनेच्या मागण्यांची पूर्तता अजूनही पूर्णत्वाने झालेली नाही. त्यामुळे चळवळीचे सामर्थ्य टिकविणे आणि वाढविणे आवश्यक असल्याचा गंगाधर मुटे यांनी मांडलेला आशावाद योग्यच आहे.

संघटनेचा विचार जितका मूलगामी आणि परिवर्तनवादी तितका तो समाजाच्या विविध थरांतून व विविधांगांतून खोलवर रुजतो. शेतकरी संघटनेला असे भाग्य लाभले. संघटनेच्या विचारांचा व आंदोलनांचा प्रभाव साहित्यक्षेत्रातही झालेला आहे. विशेष करून ग्रामीण साहित्यिक नव्याने लिहू लागले. एक नवीन साहित्यधारा तयार झाली. सकस आणि परिवर्तवादी साहित्यलेखकांची दमदार पिढी संघटनेच्या विचाराने प्रभावित होऊन लिहू लागली, बोलू लागली. आज ही यादी लक्षात घेण्याइतपत मोठी झाली आहे. संघटनेच्या या मंतरलेल्या

कालखंडात काम केलेल्यांची पिढी आता वृद्धत्वाकडे झुकली आहे. अनेकजण परलोक( !)वासी झाले आहेत. परंतु, हा वारसा समर्थपणे पुढे सुरू राहील याचा भरवसा गंगाधर मुटे सारख्या कार्यकर्त्यांकडे पाहून 'अभय' देणारा वाटतो.

**'घामाची कत्तल जेथे, होते सांजसकाळी**
**तुतारी फुंकते तेथे, माझी गजल निराळी'** आणि

**युगानुयुगे ते बोलले, ऐकत आलो आम्ही**
**आता माझ्या मतल्याची ऐकवण्याची पाळी**

ही गंगाधर मुटेंच्या गजलेमधली भूमिका केशवसुतांच्या 'तुतारी'ची आठवण जागविणारी आहे यात शंका नाही. सभोवतालचे भयाण वास्तव आणि उद्ध्वस्त ग्रामव्यवस्था यांचे चित्रण वेगवेगळ्या गजलांमध्ये टोकदार शब्दांत व्यक्त झाले आहे.

**बाभूळ, चिंच, आंबा; बागा भकास झाल्या**
**मातीत ओल नाही, तगणे कठीण झाले**

**शिवारात काळ्या, नि उत्क्रांतलेल्या खुज्या माकडांचा धुमाकूळ तो**
**जिथे कुंपणे शेत खाऊन गेली, तिथे त्या पिकांनी लपावे कसे?**

**टाळले होते फुलांनी, आयुष्यभर भेटायचे**
**आज मात्र सडा पडलाय, मस्त तिरडी सजवायला**

**दिसतात अभय येथे चकवे सभोवताली**
**रस्ताच जीवनाचा सुचणे कठीण झाले**

**विज्ञानाने हात टेकले अन् बुद्धीही हतबल झाली**
**पूजन-अर्चन, जंतर-मंतर, तमाम तेव्हा करून गेलो**

अश्या प्रकारच्या ओळींतून हे वास्तव स्वरूपात व्यक्त झाले आहे. जीवन जगण्यातील हतबलता आणि त्यामुळे होणारी आत्महत्या याची व्यथा -

**असे गैर ती आत्महत्या कधीही, म्हणे कास्तकारास समजावुनी**
**परी कारणांचा जरा शोध घ्यावा, अशी सुज्ञता दाखवेना कुणी**

अशया ओळींतून व्यक्त झाली आहे. तरीसुद्धा या प्रतिकूल परिस्थितीतून बाहेर पडण्याची जिद्द ठाम आहे.

**राजसत्ताच कोपली बघ, तुझ्या श्रमाच्या कमाईवर**
**तुझी शक्ती मनगटात तू, पूर्ण एकवटली पाहिजे**

**आता अभय जगावे अश्रू न पाझरावे**
**आशेवरी निघावे ही वाट चालताना**

या ओळींमधून संकटावर मात करण्याची लढावू वृत्ती व्यक्त झाली आहे. राजकारणी आणि एकूणच भ्रष्ट राजसत्ता यांचे विकृतिकरण नेमक्या शब्दांत गजलांमधून व्यक्त झाले आहे.

**घराणे उभे राहिले गावगावी, कुठे लोकशाहीस नेतो आम्ही ?**
**सग्यासोयऱ्यांचे अता राज्य आले, पदे भोगण्याला नवी वारसे**

**आम्हास नाही कुठेच सत्ता, कुठेच नाही अभय पदांचे**
**लबाड वंशात जन्म ज्यांचा, तमाम त्यांचा पुढार आहे**

**जरा गंध नाही मुळी झोपडीला, नव्या इंडियाच्या युगाचा नव्या**
**कुठे लुप्त झाले फुले-भीम-बापू, मिटवले कुणी पावलांचे ठसे**

**लोंढेच घोषणांचे, दिल्लीवरून आले**
**येणार वित्त आहे, बत्तीस तारखेला**

**भ्रष्ट आचारास सत्ता, मुख्य झाला स्त्रोत आहे**
**घाव घाला केंद्रस्थानी, एकदा द्या मात अण्णा**

या प्रकारच्या अनेक गजलांमधून या विकृतीचे चित्र मांडले गेले आहे ते निश्चितच विषण्ण करणारे तर आहेच आणि त्याच बरोबर विचार करायला लावणारे आहे. या सगळ्या विसंगतीत कवीची मातीशी असलेली अतूट नाळ

**अभय एक युक्ती तुला सांगतो मी करावे खरे प्रेम मातीवरी या**
**भुई संग जगणे, भुई संग मरणे, भुई संग झरणे वगैरे वगैरे**

या शब्दांमधून व्यक्त झाली आहे, ती खरोखरी भावणारी वाटली यात काही शंका नाही.

गजल या काव्यप्रकाराची हाताळणी गंगाधर मुटे यांनी अगदी अलीकडे सुरू केली. तथापि त्यात जे लिखाण केले त्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना दाद देणे भाग आहे. मात्र त्याच वेळी तंत्राच्या मार्गाने जाताना अंत:करणातल्या ऊर्मी व्यक्त करताना काही राहून तर जात नाही ना याचा विचार होण्याची आवश्यकता व्यक्त करावीशी वाटते.

'वांगे अमर रहे' या लेखसंग्रहातील शेवटचा 'असा आहे आमचा शेतकरी' हा लेख सर्वांनाच अंतर्मुख व्हायला लावणारा आहे. आणि 'शेतकरी समाजासाठी कार्य करणे हे तुलनेने अधिक कठीण काम असले तरी ऐतिहासिक आणि महान कार्य आहे याची खूणगाठ मनाशी पक्की बांधून घेणे गरजेचे आहे.' असा व्यक्त केलेला आशावाद बरेच काही सांगून जाणारा आहे. एकूणच सर्व लेखसंग्रह अभ्यासनीय झाला आहे.

पुस्तके वाचण्याची संधी जाणीवपूर्वक करून दिली याबद्दल मनापासून धन्यवाद आणि पुढील साहित्यिक वाटचालीसाठी अंत:करणपूर्वक शुभेच्छा.

**- श्री. श्याम पवार**

महाळुंगे (इंगळे), जि. पुणे

★★★

## तोंडी, लेखी व प्रयोगशाळेतही मेरीटचे गुण घेणारा गजलसंग्रह

हल्ली अनेक कवी गजल लेखनाकडे वळले आहेत. अरबी, फारशी, उर्दू अशी होत होत गजल मराठीत आली. मराठीपूर्वी ती हिंदी व गुजराथीत आली. पूर्वीची गजल ही शराब आणि शबाब ह्या विषयाभोवतीच घुटमळत होती. आता ती विविधांगी बनत चालली आहे. जनजीवनातील अनेक सत्ये परखडपणे गजलेमध्ये मांडली जात असताना गंगाधर मुटे सारखे मातब्बर, कर्तबगार, प्रॅक्टिकल अनुभवी कवी गजलेच्या प्रेमात पडले व त्यातून व्यक्तिगत अनुभव अवलोकन व चिंतन याद्वारे सृजनशील लेखणीतून सत्य मांडण्यात शतप्रतीशत यशस्वी झाले व साकारला गजलसंग्रह 'माझी गजल निराळी'.

आपल्या दैनंदिन जीवनातील अनुभवाचं चिंतन त्यांनी आपल्या गजलेत ओतलं तेव्हा वाचकाला त्यातील यथार्थता पटते. हेच मुटेंच्या यशस्वी गजलेचं गमक आहे. उदा.

**'गाळून घाम विणले मी वस्त्र स्वावलंबी**
**केल्यात पार चिंध्या खिजवून पावसाने'**

हा कृषकाच्या जीवनातील भयाण भेसूर असा अनुभव. या एकाच शेरात संपूर्ण कृषकाचे जीवनच समोर येते. अशा ताकदीचा यथार्थ शेर लिहिणारा गजलकार विरळाच. एक सच्चा शेतकरी, शेतकरी संघटनेचा कार्यकर्ता जेव्हा हे जाणतो की गजलेचे सहा शेर सहा स्वतंत्र कविता ठरू शकतात. वेगवेगळा आशय आनंद देऊ शकतात तेव्हा हा एक शेतकरी व्याकरणाचा अभ्यास करतो. गजल तंत्राचा अभ्यास करतो व यशस्वी गजल लिहितो. ही गोष्ट वाटती तेवढी सोपी नाही. मी एक रसिक या नात्याने त्याच्या चिंतनाला अभ्यासाला, अनुभवाला व त्यांच्या गजलांना वंदन करतो... म्हटलेच आहे की -

**'सिर्फ बंदीशे अल्फाज काफी नहीं गजल के लिये**
**जिगर का खूं भी चाहिये असर के लिये'**

आणि खरोखरच गंगाधर मुटे यानी आपल्या गजलांमध्ये प्रत्यक्ष प्राण ओतला म्हणून त्या परिणामकारक ठरल्या आहेत.

ज्यांच्या गजलांना सुधाकर कदमांची (पुणे) प्रस्तावना, भीमराव पांचाळेंचे पाठबळ, प्रदीप निफाडकर, प्रमोद देव (मुंबई), स्वामी निश्चलानंद(अरुणाचल प्रदेश) यांच्या कौतुकाची थाप मिळावी. त्या गजलांवर माझ्यासारख्या एका छोट्या व्यक्तीने तोंडी, लेखी व प्रयोगशाळेतही मेरीटचे गुण घेणाऱ्या ह्या गजलावर चार शब्द लिहिणे. ही केवळ औपचारिकताच. 'मरणे कठीण झाले' ह्या रचनेत आश्वासक भरवशाचं असं काहीच राहिलं नाही त्यामुळे माणूस भरकटत चालला. यदाकदाचित तो रस्त्यावर आला तरी त्याला चकवणारे असे खूप आहेत असा आशय व्यक्त होतो.

**दिसतात अभय येथे चकवे सभोवताली**
**रस्ताच जीवनाचा सुचणे कठिण झाले**

स्वलेखनाने स्वानंदा सोबत परमार्थही साधावा बघा हा शेर ...

**आनंद भोगताना परमार्थही साध्य व्हावा**
**असलेच कार्य कर तू दोहे मला म्हणाले**

कर्म और भाग्यका किताब है जिंदगी, पाप और पुण्य का हिसाब है, जिंदगी जेव्हा कर्म करताना भाग्य फळाला येते तेव्हा आपसूकच नशीब फळते.

**प्राक्तन फिदाच झाले यत्नास साधतांना**
**मोती पुढ्यात आले वाळूस गाळतांना**

भारतातील सद्य परिस्थितीचे वर्णन खालील शेरामध्ये बघा. सर्वांना नोकरी हवी मग शेती कुणी करायची असा काहीसा आशय.

**निघून गेलेत शहाणे सर्व साहेब बनायला**
**मूर्ख आम्ही येथे उरलो, मोफत अन्न पिकवायला**

आसवांची अनेक रूपे जसे बेजार आसवे, दिलदार आसवे, कलदार आसवे, हळुवार आसवे, अंगार आसवे, झुंजार आसवे रेखाटलेली आहेत 'भांडार हुंदक्यांचे' या रचनेत. दु:खांत सोबतीला नाही कुणी सवे, साथ ज्यांनी निभवली ती फक्त माझी आसवे, असा काहीसा आशय असणारा हा त्यातील एक शेर.

**धुत्कारले जगाने, नाकारले सख्यांनी**
**तेव्हा दिला मनाला आधार आसवांनी**

शेतकरी ग्रामीण जनतेची परिस्थिती खूपच वाईट आहे. त्याला सगळेच नाडवतात. जंगली श्वापदे, शहरी नागरिक, सहकार, सावकार, निसर्गासह सगळेच. वर्षानुवर्षे हेच सुरू आहे. म्हणून आता त्याच्या समस्या संपतील असं काहीतरी करायला हवं. वाचा 'शस्त्र घ्यायला हवे' ही गजलरचना.. नमुन्यादाखल एक शेर;

**श्वापदे पिसाळलीत शस्त्र घ्यायला हवे**
**झोपले असेल शेत जागवायला हवे**

गजलकार गंगाधर मुटे यांची शेती, शेतकरी, त्यांच्या समस्यांचा पूर्व अभ्यास व अनुभव. म्हणून बहुतेक सर्व गजलांमधून कळवळा, वास्तवता, गरिबी, त्याला छळणारे नेते, पुढारी, अधिकारी, उत्पन्न खर्च वगैरे सर्व शेती संबंधितच विषय आढळून येतो. आपमतलबी पुढारी, सत्ताधारी व विरोधकही सर्व नाटकी भाषा बोलतात. प्रलोभने पेरतात त्यांना त्यांची जागा दाखविली पाहिजे, याकडे अंगुलीनिर्देश करणारी 'नाटकी बोलतात साले' ही रचना. त्यातील एक शेर बघा.

**कोणीतरी यांची आता पडजीभ उपटली पाहिजे**
**नाटकी बोलतात साले की गरिबी हटली पाहिजे**

गंगाधर मुटेंच्या गजलांत सुंदर अशा प्रतिमा व प्रतीकांची वापरही दिसून येतो; जसे शुभ्र कावळे, पांढरे पक्षी, चकवे, बत्तीस तारीख, मेड इन चायना, वाचाळ राजसत्ता, रानहेला, राजकीय पहेलवान वगैरे वगैरे. बघा हा जबरदस्त शेर;

**लोंढेच घोषणांचे दिल्लीवरून आले**
**येणार वित्त आहे बत्तीस तारखेला**

**सोकावलेल्या अंधाराला इशारा आज कळला पाहिजे**
**वादळ येऊ दे कितीही पण दीप आज जळला पाहिजे**

वरील शेर वाचला की आठवतो, 'तुफानातील दिवे आम्ही तुफानातील दिवे, वादळवारा पाऊस धारा मुळी ना आम्हा शिवे' यूज अँड थ्रो च्या काळात माणसाचंही मन सुद्धा नाटकी झालं, बेभरवशाच झालं. असा आशयाचा हा शेर;

**चला वापरा एकदा आणि फेका हवी ती खरीदी नव्याने करा**
**इथे काळिजेही दिखाऊ-विकाऊ हृदय भासते मेड इन चायना**

पशू पक्षी ही किटके किती बघ मेळ करून राहती, आपत्ती येता कोणती अती संघटुनिया धावती, तू मानवाचा देह असुनी का न तुजही भावना, ऊठ आर्यपुत्रा झडकरी कर सामुदायिक प्रार्थना या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या सामुदायिक प्रार्थनेच्या आशयासी साम्य असणारा मुटे यांचा हा शेर वाचा;

**पाखरेही एकी करतात जरासे पंख फुटल्यावर**
**पण तुला कधी मिशा फुटणार ? सांग माणूस म्हटल्यावर ?**

शेती करणे म्हणजे कनिष्ठता, मूर्खता याउलट नोकरी करणे म्हणजे श्रेष्ठपणा असा जो सध्या सामाजिक समज रूढ झाला आहे त्यावर मार्मिक टिप्पणी करताना मुटे लिहितात,

**शेती करून मालक होणेच मूर्खता**
**सन्मान मोल आहे कर अभय चाकरी**

जास्तीत जास्त शरीर उघडे टाकून कमीतकमी वस्त्र वापरण्याच्या 'पॅशन'वर आसूड ओढताना मुटे म्हणतात

**ललना पाहून कपडे शरमले**
**मते पाहताच नेते नरमले**

भ्रष्टाचारावरही श्री मुटे आसूड ओढून लिहितात की, ही व्यवस्थाच किडली आहे.

**टाळूवरील लोणी खाण्यास गुंतला जो**
**सत्कारपात्र तोची मशहूर थोर झाला**

**सरकारी खजिन्यावर मारून घ्यावा हात**
**चिरीमिरी दिली तरी मिटून जाईन वाद**

एकंदरीत अशा ८० दालनांचा हा वैभवशाली खजिना आहे. याला हवा रत्नपारखीच. वाचकही भाग्यवान, हा खजिना वाचून आणि भाष्य करून मी धन्य झालो. पण यावरील हे भाष्य किंवा या समीक्षणात मावेल एवढी मुटेंची गजल लहान नाही. ती संग्रहीच असावी आणि वेळोवेळी वाचावी, अभ्यासावी अशी आहे. गजलकार श्री मुटे यांना पुढील साहित्य प्रवासासाठी शुभेच्छा.

**- तुळशीराम बोबडे** - अकोला

★★★

# शेतकऱ्याला अभय देणारी निराळी गजल

'ग्रंथ हेच गुरू' असे म्हटले गेले आहे. ग्रंथ असंख्य आहेत पण शेतकऱ्याच्या जीवनातील प्रश्न जाणून घेणारे, ते मांडणारे व त्यावर उपाय सांगणारे ग्रंथ दुर्मिळ आहेत. गजलकार कवी श्री गंगाधर मुटे यांचा 'माझी गजल निराळी' हा गजलसंग्रह अशा दुर्मिळ पुस्तकापैकीच एक आहे.

शेतकऱ्याच्या प्रश्नांसाठी संघर्ष करणारे सुप्रसिद्ध लेखक श्री अमर हबीब यांचे भेटीसाठी अंबेजोगाईला गेलो होतो. त्यांनी आवर्जून मला हा गजलसंग्रह दिला आणि म्हणाले 'सर, माझ्याकडे या गजलसंग्रहाच्या दोन प्रती आहेत. एक तुम्ही न्या, वाचा व कवीला तुमचा अभिप्राय कळवा' ... मी लातूरला आलो आणि रात्री वाचायला सुरुवात केली. पहाटे चार वाजेपर्यंत मी वाचतच राहिलो. त्यात गुंतत गेलो कारण वाचताना ओळी मनाला भिडू लागल्या. टिपण काढत गेलो. दुसऱ्याच दिवशी अमर हबीब यांना फोन केला. पुस्तक वाचल्याचे आणि त्यावर टिपण काढल्याचे सांगितले आणि अत्यंत चांगले पुस्तक भेट दिल्याबद्दल त्यांचे मनपूर्वक आभार मानले.

माणसाचे जगणे केवळ स्वत:च्या मनावर, मर्जीवर अवलंबून नाही. सभोवतालची परिस्थिती अशी कठीण होत आहे की जगणे काय मरणेही कठीण झाले आहे. एवढेच नव्हे तर हसणे किंवा रडणे या मानवी मनाच्या नैसर्गिक प्रक्रिया ही माणसाच्या अधीन राहिल्या नाहीत. या परिस्थितीला शासन, शासनकर्ते व नोकरदार हेच जबाबदार आहेत, कारण 'खाऊ लुटून मेवा' हे शासकांचे ब्रीद झालेले आहे. अर्थसंकल्पात असणारी जनसामान्यासाठीची तरतूद त्यांच्यापर्यंत पोहचतच नाही, त्याची विदारकता ..

**अर्थसंकल्पात होती खायसाठीची व्यवस्था**
**कागदावर आकडे अन् माल सारा फस्त आहे**

या ओळीतून ठळकपणे मांडली आहे. शासनकर्ते निधीचे वाटपही समान करत नाही. त्यातही नागरी व गावठी भेद करतात. वास्तविक लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेल्या लोकशाही राज्यात शासक हे सेवक आहेत पण तेच मालक म्हणून मिरवू लागले आहेत. जोपर्यंत समस्यांचे, प्रश्नांचे निदान नीट होणार नाही तोपर्यंत रोग नीट होणार नाही हे सत्य आहे.

**तेच तेच रोग आणि त्याच त्याच औषधी**
**एकदा तरी निदान नीट व्हायला हवे**

शेतकरी व त्यांचे प्रश्न याची जाण गजलकाराला आहे. प्रश्नाचे अचूक निदान कवीस आहे. हे प्रश्न का ? कशामुळे व कोणी निर्माण केले याचेही भान आहे. या प्रश्नाची उत्तरेही त्याला माहीत आहेत. पण ते सोडवणे मात्र त्याच्या हातात नाही. फक्त संघर्ष करणे, लढणे आहे. या अफाट देशाचे राज्य दिल्लीच्या तख्तावरून चालते व तेथील वास्तवातील विसंगती कवीकडून दाखवली जाते.

**लोंढेच घोषणांचे दिल्लीवरून आले**
**येणार वित्त आहे, बत्तीस तारखेला**

याचा दुष्परिणाम शेतकऱ्याच्या आत्महत्येत होत आहे कारण राज्यकर्ते भेकड आहेत. ते स्वत: भेकड आहेत ते जनतेला काय अभय देणार ? त्यामुळे मृत्यू सोकावलाय कारण त्याला शेतकऱ्याच्या रक्ताची चटक लागली आहे. निसर्गही शेतकऱ्याला साथ देत नाही कारण पाऊसही वेळेवर येत नाही. त्यामुळे कवी व्यथा मांडतो

**भाजून पीक सारे, पाऊस तृप्त झाला**
**उद्ध्वस्त शेत आधी, मागून थेंब आला**

शिवाय शेतकऱ्याला फक्त कोरडा उपदेशच केला जातो. आत्महत्या करणे चूक आहे, असे सांगितले जाते ते कवीलाही मान्य आहे. पण त्याचा प्रश्न आहे की,

**असे गैर ती आत्महत्या कधीही, म्हणे कास्तकारास समजावुनी**
**परी कारणांचा जरा शोध घ्यावा, अशी सुज्ञता दाखवेना कुणी**

शेतकऱ्याच्या दु:खाची भाषा सत्तेस कळेल असे ज्ञान कुणी दाखवत नाही कारण सत्तेमुळे नेते चळून गेले आहेत, ते धनवंतांना कुरवाळतात तर श्रमिकाला छळतात. अधिकारीही लाचखोरीला निर्ढावलेले आहेत त्यांमुळे ते ...

**अभय लाचखोरीत तो शिष्ट प्राणी**
**कुणाच्याच बापास ना घाबरे तो**

तर नेतेही मुजोर झालेत कारण

**नसतेच जे मिळाले केव्हाच सातजन्मी**
**ते सर्व प्राप्त होता नेता मुजोर झाला**

उलट सत्तेचा वापर जनतेवर अन्याय करण्यासाठीच करतात. शेती करून मालक होणे त्यामुळेच मूर्खता ठरते आणि लाचखोरी करता येणाऱ्या नोकरीला सन्मान मिळत आहे.

**शेती करून मालक होणेच मूर्खता**
**सन्मान मोल आहे कर 'अभय' चाकरी**

असे त्यामुळेच स्वत:ला बजावतो आहे. या नेत्यांना स्वार्थ मात्र कळतो. एरव्ही बेमुर्वत वागणारे नेते निवडणुकीच्या वेळी मात्र नरम होतात ते अगदी मोजक्या शब्दात व्यक्त करताना कवी म्हणतो ..

**मते पाहताच**
**नेते नरमले**

वास्तविक पैसा जनतेचा असतो पण नेते मात्र ते कसाही उधळतात.. नेते असे वागत असले तरी, सामान्य माणूस मात्र कष्टाने मिळणाऱ्या संपत्तीसच खरे धन मानतो.

**नको रत्न मोती, न पाचू हिरे ते**
**अभय ते खरे जे मिळाले श्रमाने**

सरकारी योजनांचे पैसे मिळवायचे तर चिरीमिरी द्यावी लागते तरच वाद होत नाही. नेते जनतेत परस्परात भांडणे लावतात. अशांचा जयजयकार करू नये असे आग्रहाने कवी सांगतो.

**छाया नरोत्तमाची, अभयास उब देते**
**त्यांचा उदो कशाला? जे कलह माजवीती**

शेतीच्या दुर्दशेचे वास्तव कवी मांडतो ते असे ...

**कायम गहाण सारे करण्यास सातबारा**
**बँकेसमोर झाले लाचार शेत आहे**

या देशाचे दुर्दैव की येथे ना समाजवाद रुजला ना साम्यवाद रुजला, भांडवलशाही मात्र प्रबळ झाली. भ्रष्टाचारी, कंत्राटदार कसे गर्वाने वागतात.

**बघा जरा हो बघा जरासे कसा भामटा फुगून गेला**
**मुरूम-गिट्टी अमाप खातो, तरी न देतो डकार आहे**

समाजाच्या वाटेला सत्तेचा अल्पसाही वारा मिळत नाही कारण येथे घराणेशाहीच जोपासली गेली आहे. लबाडांच्या वंशात जन्म मिळणाऱ्यांनाच तेथे वाव आहे.

**अम्हांस नाही कुठेच सत्ता, कुठेच नाही 'अभय' पदांचे**
**लबाडवंशात जन्म ज्यांचा, तमाम त्यांचा पुढार आहे**

तर कुठे लुप्त झाले फुले-भीम-बापू? या गजलेत कवी म्हणतो

**'घराणे' उभे राहिले गावगावी, कुठे लोकशाहीस नेतो अम्ही?**
**सग्यासोयऱ्यांचे अता राज्य आले, पदे भोगण्याला नवी वारसे**

कवीला प्रश्न पडतो

**का लोळतात पायी सिंहासने तयांच्या?**
**अद्भुत नवल कसले, त्यांच्या कुळात होते?**

सामान्यांच्या प्रश्नाबाबत पूर्वी पक्षांच्या चळवळी व्हायच्या त्या आता कमी झाल्या आहेत. म्हणून कवीला वाटते की

**वादंग वा दुरावा पंक्तीत उरला नाही**
**डावी उपाशी नव्हती, उजवी जेवली होती**

कारण सगळ्यांनीच आता कुठे ना कुठे काही काळ तरी सत्ता उपभोगल्या आहेत.

**घामचोरीची तक्रार दाखल केली तेव्हा**
**विरोधक प्रसन्न नव्हते, सत्ता कोपली होती**

अशी दोन्ही बाजूंनी सामान्यांची कुचंबणा होत आहे.

कवीची जातकुळी नारायण सुर्वे यांच्या व्यथांशी साम्य दाखवते. पूर्वी साहित्यात चंद्र, प्रेयसी यांची म्हणजेच प्रेमाची वर्णने प्रामुख्याने असायची. वास्तव जीवनापासून ती शेकडो मैल दूर असायची. कवी नारायण सुर्वेने एका कवितेत म्हटले आहे. भाकरीचा चंद्र शोधण्यातच आयुष्याचा खूप काळ गेला. गजलकार 'अभय' म्हणतात...

**शोधात भाकरीच्या निम्मी हयात गेली**
**स्वप्नेच वांझ झाली तारुण्य जाळताना**

शेतकऱ्याचे प्रश्न सुटले पाहिजेत असे केवळ शाब्दिक बुडबुडे उडविणारा हा कवी नाही. हा कृतिशील कवी आहे. प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी शेतकऱ्यात एकी पाहिजे असा

त्यांचा आग्रह आहे.

**शेतीत राबणाऱ्या खंबीर हो 'अभय' तू**
**एकीत चालण्याचा करूया सराव सस्ता**

शेतकऱ्याच्या प्रश्नाची फारशी गांभीर्याने चर्चा होत नाही. आक्रांताची दखल घेतली जात नाही पण नको त्या प्रश्नांची मात्र चर्चा होते,

**आक्रांत बेदखल का अमुचे जगात होते?**
**ते शिंकले तरीही चर्चा नभात होते**

शेतकऱ्याने आंदोलन केले तर त्यांना लाठीमार, गोळीबाराला सामोरे जावे लागते

**लाठी उगारताना, बंदूक रोखताना**
**का वाटला तुला रे माझा उठाव सस्ता?**

असा रोकठोक प्रश्न शासनकर्त्यांस विचारतात अन शेतकऱ्याला आपल्या बचावासाठी क्रांतीचा नवा उग्र मार्ग अवलंबावा लागेल असेही ठासून सांगतात. कवी म्हणतात ...

**सत्याग्रहास आता रक्तात माखवावे**
**शिकवू चला नव्याने क्रांतीस डाव सस्ता**

या क्रांतीला शब्दांच्या माध्यमाची जोड हवी. रशियातील क्रांतीच्या वातावरण निर्मितीला मॅक्झिमा गॉर्कीच्या 'आई' या कादंबरीची मदत झाली होती. म्हणूनच कवी आत्मविश्वासाने म्हणतात

**घामाची कत्तल जेथे, होते सांज सकाळी**
**तुतारी फुंकते तेथे, माझी गजल निराळी**

**गजल माझी बंड आणि अन्यायाला दंडही**
**शेतकऱ्याच्या मुक्तिसाठी आयुधांची थाळी**

कवी केवळ संघर्ष करणारा नाही.त्याला विधायकतेच्या निर्मितीचा ध्यासही आहे.

**चेतनेला पेरून देते अभयतेची खते**
**संघर्षाला पिकवताना प्रतिभा बनते माळी**

मानवी जीवनात प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी प्रसंगी युद्धाचा मार्ग अवलंबावा लागतो. पण मानवी जीवन केवळ संघर्षासाठी नाही. त्याला सुख, शांती व समाधानाची नैसर्गिक आस असते. त्यामुळेच कवी मार्मिक शब्दांतून ते व्यक्त करतो.

**घमासान आधी महायुद्ध होते**
**पुढे माणसांचे यशू-बुद्ध होते**

शासनकर्त्यांना स्वत:च्या सावलीचीही भिती वाटते. त्यामुळे त्यांना शस्त्राच्या क्रांतीची भीती वाटतेच वाटते. पण शब्दाच्या शस्त्राचीही वाटते. हा कवी नारायण सुर्वे प्रमाणेच संत तुकाराम महाराजांचाही मागोवा घेत चालणारा आहे. त्यामुळेच तो शब्दांना शस्त्राइतके सामर्थ्यवान मानतो. तुकोबाराय म्हणतात,

**आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।। शब्दांचीच शस्त्रे यत्ने करू**

कवीही शब्दाला शस्त्र बनवतो पण शासनकर्त्याला त्याची भिती वाटते. त्यामुळे

**मी म्हणालो फक्त इतुके 'शब्द माझे शस्त्र आहे'**
**चक्क माझ्या भोवताली चोख बंदोबस्त आहे**

कारण आजवरच्या लेखकांनी कधीही ही नोंद केली नाही की,

**पुस्तकाने कोणत्याही नोंद नाही घेतली की**
**कष्ट आणिक भाग्य-लक्ष्मी हाच रेशो व्यस्त आहे**

शासनकर्ते समाजावर सवलतीचा वर्षाव करून त्याला कामापासून दूर करत आहे. तर काहींना साहेब बनण्यात भूषण वाटते. कष्ट करणारा शेतकरी मात्र मूर्ख ठरत आहे.

**सारे काही सवलतीत; धान्य, इंधन, साखर, तेल**
**कोण तयार होईल मग, इथे हाडे झिजवायला**

**निघून गेलेत शहाणे, सर्व 'साहेब' बनायला**
**मूर्ख आम्ही उरलो इथे, मोफत अन्न पिकवायला**

पण हे फार काळ चालणार नाही कारण जनतेला आता कळू लागले आहे, म्हणून कवी निर्धाराने-निश्चयाने म्हणतो,

**श्रमास मातीत गाडण्याला, नव्या दमाचा विरोध आहे**
**नवीन शाई, नवे मनसुबे, अभय जनांची नवीन भाषा**

एवढेच नव्हे बळीराजाला पाताळात घालणाऱ्या वामनाची सत्ता उलथून टाकण्याची ईर्ष्या मनात आहे

**मामला तीन पद भूमीचा, तुझ्या सिंगावर घेच तू**
**त्या बटू वामनाची सत्ता, 'अभय' पालटली पाहिजे**

गजल म्हटली की त्याग, प्रेम, शृंगार, यांचाच प्रामुख्याने समावेश असतो. पण गंगाधर मुटे उर्फ 'अभय' या गजलकाराच्या गजलांमध्ये शेतकऱ्याचे जीवन, त्यांचे प्रश्न, त्या प्रश्नांची कारणे, त्याची जबाबदारी कोणाची व ते प्रश्न सोडविण्यासाठी काय करायला हवे, हे सर्व त्यांनी 'गजल माझी निराळी' मधून समर्पक व यथार्थपणे मांडली आहे. ही गजल खरोखरच नावाप्रमाणे इतरांपेक्षा निराळी आहे. ती शेतकऱ्याचे दु:ख सांगणारी आहे. ती केवळ शेतकऱ्याचे दु:ख, व्यथा मांडत नाही तर शेतकऱ्याला साथ, अभय देणारी आहे. ताज्या गारपिठीच्या तडाख्यानंतर शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतकऱ्याना धीर देणाऱ्या संघर्षाला व जगण्याला प्रवृत्त करणाऱ्या या गजला खरोखरच कौतुकास व धन्यवादास पात्र आहेत.

**- विजय शंकरराव चव्हाण**
पद्मावती अपार्टमेंट
पद्मनगर, लातूर

★★★

# परिघाबाहेरची गजल

आनंदऋतू ई-मॅगझिनच्या निमित्ताने दर्जेदार कविता आणि गजल शोधता शोधता गंगाधर मुटे साहेबांची कविता नजरेस पडली. कविता, व्यंग, नागपुरी तडका आणि गजल अशा विविध माध्यमातून चौफेर स्वैर साहित्य भ्रमंती करणाऱ्या एका संवेदनशील आणि ऋजू व्यक्तिमत्वाशी ओळख होण्याचा योग जुळून आला. आनंदऋतू ई-मॅगझिनमध्ये दर महिना कविता आणि गजल प्रकाशित करण्याची मुटे साहेबांनी परवानगी दिल्याने नव्याने झालेली ओळख परिचयात बदलली. तशी प्रथमदर्शनीच वेगळी वाटणारी त्यांची गजल पण परिचयाची वाटू लागली.

सुरेश भट साहेबांनंतर काही काळापुरती गजल ही चार लोकात आणि चार गावात कैद झाली होती. तेच तेच, त्याच त्याच भाषेत आणि शैलीत लिहणारे लोक स्वत:ला गजलकार समजू लागल्याने, गजल त्याच त्याच साच्यात गुदमरली होती. कल्पना करून वृत्तांमध्ये बसवलेली कपोलकल्पित दु:खे ! वास्तवाशी सुतराम सोयरसुतक नसलेल्या स्वप्नाळू प्रतिमा आणि अलंकारांनी गजल गुदमरली होती. शहरी भागाचा आणि एका ठराविक वर्ग समाजाचा गजलेवर ठसा स्पष्टपणे दिसू लागला होता. काही काळापुरती तर गजल एका ठराविक समाज विशेषाची मत्तेदारी बनून गेली होती. एका ठराविक समाज विशेषाबाहेरचं किंवा ठराविक परिघा आणि भूगोला बाहेरचं काही लिहणं किंवा मांडणं हे गजलेला वर्ज्य मानलं गेलं होतं. कोणी तसा प्रयत्न केलाच, तर त्याला गजलेच्या व्याकरणात रक्तबंबाळ करून, शाब्दिक कसोट्यांमध्ये जेर करून स्वत: होऊन गजल लेखानातून बहिष्कृत करण्यासाठी भाग पाडलं जाऊ लागल्याने, गजलेमध्ये तोच तोच पणा आला. त्यामुळे साहजिकच सुरेश भटांनी नावारुपाला आणलेली आणि लोकाश्रय मिळवून दिलेली गजल लोकांपासून दुरावली आणि एका आम्ही म्हणजे मैफिल मानणाऱ्या एका वर्तुळात सिमटली गेली.

हे सर्व सांगण्याचे प्रयोजन म्हणजे गंगाधर मुटे साहेबांची गजल. ती वाचता क्षणीच, परिघाबाहेरची वाटते. तिच्यामध्ये कदाचित ती गजलेची नजाकत नसेलही, पण जी गजलेची रग आहे, ती मात्र सोळा आणे अस्सल आहे. प्राचार्य प्र. के. अत्रेंनी उत्कृष्ट आणि सकस साहित्य कसं असावं ? यासंबंधी एका ठिकाणी असं म्हटलं होतं की, 'ऊस जसा ज्या जमिनीत रुजून येतो, त्या जमिनीची त्याला गोडी येते. तसं खरं साहित्य ज्या जमिनीतून फुलून येतं,

तिचा त्याला गंध यावा.' गंगाधर मुटे साहेबांची गजल या परिमाणाला पुरेपूर उतरते. त्यांची कोणतीही गजल वाचली, तरी तिच्यामध्ये प्रथमच जाणवतो तो तिचा अस्सल गावरान बाज आणि शेतकरी साज! या गजलेमध्ये एक बंडखोरपणा आहे. पण त्यात उर्मटपणाचा लवलेशही नाही हे या गजलेचं मोठं वैशिष्ट्य आहे. वाचकाना या गजलेमध्ये चंद्र तारे, ऊन वारे, प्रेमाचे शिडकावे आणि प्रियकर प्रेयसीचे शृंगारमय बारकावे कमीच सापडतील, पण शेतकऱ्यांचा आक्रोश आणि पीडितांच्या व्यथा मात्र भरभरून मिळतील. कारण ही गजलच लिहली गेली आहे, शोषितांच्या आणि श्रमकऱ्यांच्या ऊपेक्षेला वाट करून द्यायला! श्रमिकांची दु:खे कधी गजलेमध्ये सांडलेली दिसत नाहीत, कारण गजलेमध्ये मांडण्याइतकी ती सुवासिक आणि अलंकारिक नसतात, असा एक अघोषित वृथा समज पसरवण्यात आला आहे. गंगाधर मुटे साहेबांची वास्तववादी गजल या गैरसमजाला छेद देण्याएवढी पूर्ण सक्षम नक्कीच आहे.

'माझी गजल निराळी' या गंगाधर मुटे साहेबांच्या गजल संग्रहास मन:पूर्वक शुभेच्छा!

**किमंतु ओंबळे**

संपादक

आनंदऋतूई-मॅगझिन, ठाणे

दिनांक: ५ मे २०१३

★★★

## समकालीन गजलेत वेगळेपण दाखविणारी गजल

'माझी गजल निराळी' हे अगदी तंतोतंत पटावे असेच शीर्षक आहे. खरोखर आपली गजल निराळी आहे. तिच्यात संवेदने सोबतच सामूहिक वेदना आहेत आणि त्यांचे स्वरूप पराकोटीचे प्रामाणिक आणि कळकळीचे आहे.

सूर्य, चंद्र, चांदण्या, बहरलेली फुले, उमलता पारिजात, नदी, तलाव, रंगीत शहर इत्यादी बहुप्रसवं विषय ती सर्वश्रुत पद्धतीने न मांडता खरेखुरे ८० टक्के लोकांचे दैन्यघटीत जीवन अभिव्यक्त करते. हाडाचा शेतकरी ( दोन्हीही अर्थाने ) जेव्हा एक कवीही असतो तेव्हाच तो फुलांचं दु:ख शब्दातून सांडू शकतो. कळ्यांची काळजी अर्थातुन वाहू शकतो.

गजलेला कुठलाही आशय-विषय अमान्य नाही. नसावाही.. निर्मिती अवस्थेत कुठलीही गोष्ट (कलासुद्धा) अपरिपक्व आणि संस्कारप्रतिक्षच असते. सातत्यपूर्ण प्रयोगशीलता व अभ्यासू संस्कार पुढे स्थिरमान्यता आणते. मला वाटतं गजल हे मुळात एक काव्य आहे, पण ते तंत्रबद्ध असल्यानेच ती विधा आहे. तंत्रमागणीच्या निकषावर पूर्ण उतरली आणि आशयाची संपुर्त्तता-प्रासादिकता-गरजेनुरूप चमकृती या व इतर सर्व आंतरिक मागण्यासह जर ती अभिव्यक्त होत असेल तर तिला गजल मानायला हरकत नसावीच. विषयाचे तर बंधन नाहीतच. अगदी अरब-इराण-फारसी-रेख्ता-उर्दू असा प्रवास करताना गजलेचा हा आशय, विषय आणि अभिव्यक्तीबदलाचा प्रवास सतत चालूच राहिला, पुढेही राहीलच.

शेवटी सृजनशीलता आणि साहित्य विषयक सर्जनाला परिमाणांचा परिणाम लागू होत नसतो. 'अजं जनाना गुफ्तन' या स्त्रियांशी बोलणे, या अर्थाचाही पुढे स्त्रियांविषयी बोलणे हा बदल झालाच. आता त्या एकल्या प्रेमाची जागा जागतिक प्रेमव्याप्तीत बदलली. अहमद फराज म्हणतात,

**गमें दुनियामे गमेयार भी शामिल कर लो**
**नश्शा बढ़ता है शराबे जो शराबो में मिले**

तात्पर्य, जर संपूर्ण जग कवेत घेणारी विधा उपलब्ध असेल तर तिच्यावर आशय-विषयाचे बंधने लादण्याचा कोतकरंटेपणा आम्ही का करावा ? आणि कशासाठी ?.. परंतु

कलेसाठी कला, जीवनासाठी कला की जगवण्यासाठी कला ?.. हा त्या कलावंताच्या चिंतनाचा विषय असतो. तुमच्यासाठी तो जगणे आणि जगवणे असा असावा. मला तो खचितच वास्तववादी वाटतो. आशावादी; स्फूर्तिकाव्य गैर नाहीच; मात्र वास्तव - निराशा याकडे डोळेझाक करणे कसे शक्य आहे ? इत्यादी बाबत विचार करिता आपली गजल, आपले काव्य, आपले लेख निराळे आहेतच. तुमच्यातला सोशल कवी अलाहिदा म्हणायला तयार नाही आणि कार्यकर्ता तर डोळेझाक का करावी ? हा प्रश्न नेहमीच स्व:ताला विचारताना दिसतो. डोळेझाक करूच नये हे उत्तर तो कवीला देऊन तसं करण्यास बाध्यच करीत असावा.

शेती, शेती समस्या, त्यावर काय व्हावं त्यासाठी चिंतन प्रपंच या करिता जळणारा आणि लेखनी जाळणारा कवी कदाचित तुमच्या शेतकरी चळवळीचे फलित असावा. रूढार्थाने आणि काव्यार्थाने वेगळी वाट जोखणारा हा कवी; गजलकार निष्ठुर शासन, शासकीय धोरण आणि यंत्रणेसोबतच कृषिप्रधान देशात होणारी शेतकऱ्याची कुचंबणा, अमानवीय मुस्कटदाबी इत्यादीवर धाडसी भाष्य करतो. 'कांदा मुळा भाजी' म्हणणारी सश्रद्ध संत कविता तत्कालीन समृद्धी बयाण करते तर तुमची धाडसी गजल शासकीय अनिच्छेने आलेली बकाली कथन करते. अश्या अर्थाने ती परंपरा नाते विशद करीत जाते. मानवी मनाची सूक्ष्मातिसूक्ष्म मनोचिकित्सा न करिता मानवी समूहाच्या दु:खाची सूक्ष्म चिकित्सा तिला अधिक जरूरीची वाटते हे समकालीन काव्याहून तिचे (गजलेचे) वेगळेपण होय.

अशी ही आगळीवेगळी 'माझी गजल निराळी' निश्चितच निराळी आहे. जी समकालीन कवितेत/ गजलेत वेगळेपण दाखवते. तिसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने 'माझी गजल निराळी' ला माझ्या अनंत शुभेच्छा आणि आपले मनाच्या गाभाऱ्यातून मनपूर्वक अभिनंदन !..

आपला गजलकार स्नेही

**अनंत नांदुरकर 'खलिश'**

नागपूर

★★★

## मनाला थेट भिडणारी गजल

'माझी गजल निराळी' हा अत्यंत देखणा, उत्तम बांधणी, मांडणी आणि मुखपृष्ठ असलेला हा संग्रह नक्कीच निराळा वाटतो. आपल्या गजलचा मीपण एक पॅन आहे. लगेच वाचून ही टाकला... आजवर मायबोली व फेसबूकवर आबांकडून नेहमीच तुमच्या गजल व त्याविषयी वाचत होतो. या गजल संग्रहातही नेहमीसारखीच मनाला थेट भिडणारी गजल वाचून आनंद वाटला. मला आपली गजल का आवडते हे आबांना सांगताना मी म्हटले की 'त्यांची गजल ही कल्पनेच्या विश्वात भरकटण्यापेक्षा वास्तव जगण्याचा जो ठाव घेते त्यामुळे ती जास्त भावते. काल जेव्हा मी गजल वाचत होतो तेव्हा हातात पेन्सिल होती आणि आवडत्या शेरांवर टिकमार्क करत होतो पण बघता बघता सगळ्या पुस्तकावरच टिकमार्क झालेत.

सामान्य कष्टकरी, शेतकरी हा मला जगातला सगळ्यात मोठा सृजक वाटतो. आपल्या रक्तात ती सृजनशिलता आहे. आणि तीच गजलेत उतरली आहे म्हणून गजल जीवंत वाटते. जब गजल का इतिहास लिखा जायेगा. तेव्हा गजल कल्पनेच्या कोषातून बाहेर काढण्यात आपल्यासारख्या गजलकाराचे योगदान फार मोठे आहे, याची नोंद इतिहासाला घ्यावीच लागेल. खरं तर मी आत्ताच गजल प्रकाराशी परिचित होतो आहे. त्यामुळे माझं रसग्रहण कदाचित बालिश वाटेलही परंतु आपल्या गजला मला मनापासून आवडल्यात इतकंच!

**तुषार देसले**

झोडगा (माळेगाव)

★★★

जीवनातली विसंगती आणि जगण्यातले भीषण वास्तव ह्यांचे यथोचित चित्र म्हणजे..मुटे साहेबांची गजल.

**- प्रमोद देव**

मुंबई

★★★

कवितेचे माध्यम हाताळणे काहीसे कठीण असले तरी निवडक काव्यपंक्तीतून योग्य तो आशयघन वाचकापर्यंत पोहचविण्याचे सामर्थ्य त्यात नक्कीच आहे. याचे भान आपण राखलेत आणि म्हणूनच आपल्या कवितांना वास्तवाचा परिसस्पर्श लाभला आहे. कविता वाचनीय झाल्या आहेत. वास्तव कितीही भडक असले, बोचणारे सत्य असले तरी ते कसे मांडायचे हा ज्या त्या लेखकाचा अधिकार आहे. आपण जे लिहितोय ते वाचण्यायोग्य असावे, त्यातून निखळणाऱ्या भावना प्रामाणिक असाव्यात.... एवढेच! एक खरे की आपल्या बहुतांशी कवितांना अनुभवाची किनार लाभलेली आहे, उत्तम बाज साधलेला आहे.

आमच्या आनंदवन वाचनालयात ठेवण्यात आलेले हे संग्रह इथे येणाऱ्या वाचकांच्या पसंतीस उतरतील अशी आशा बाळगावयास हरकत नाही.

सानंद आभार! आनंदवनी सदैव स्वागत. सुमंगल शुभकामनासह....!

आपले शुभाकांक्षी

**डॉ.विकास आमटे - भारती आमटे**

महारोगी सेवा समिती, वरोरा

★★★

अतिशय आकर्षक मुखपृष्ठ आणि आशयगर्भ गजलांनी 'माझी गजल निराळी' हा संग्रह दखलपात्र बनला आहे. ग्रामिणतेचे अस्तर फार सुरेख आहे. 'वांगे अमर रहे' हा चिंतनशील आणि कृषी-ग्राम निर्भर लोकसांस्कृतिक लेखांचा संग्रहसुद्धा अतिशय आवडला. या संग्रहातील अनेक लेखामागे तुमच्या व्यथावेदनांची संवेदनशीलता आहे. 'भोंडला, हादगा, भुलाबाईची गाणी, महिलंच्या व्यथा' आणि 'भुलाबाईची गाणी : ग्रामीण संस्कृतीचे वास्तवदर्शन' हे लेख अतिशय आवडले. 'गजल : सुरेश भटानंतर' या संग्रहात तुमच्या तीन गजलांचा समावेश हा तुमच्या प्रतिभेचा सन्मान आहे. आपले हार्दिक अभिनंदन!

**डॉ. मधुकर वाकोडे**

अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

★★★

आपली दोन्ही पुस्तके दोन दिवसात वाचून काढली. समाधान वाटले.

गजल संग्रहातील 'दुपट्टा घसरणे वगैरे वगैरे, कुठे लुप्त झाले फुले-भीम-बापू, ते शिंकले तरीही' या गजल खूप उत्तम झाल्या आहेत. कवीचे तरल संवेदनाक्षम मनाचे प्रतिबिंब या रचनांतून उमटले आहे. 'माझी ललाट रेषा, मजला फितूर झाली' ही एक अप्रतिम गजल. पुन:पुन्हा ही गजल वाचतांना कै. सुरेश भटांचा वसा चालवणारा कुणी एक भेटल्याचा आनंद वाटला. तुम्ही भटांची नक्कल करता, असे नव्हे पण त्यांच्या रचना वाचतांना येणाऱ्या तरल अनुभूती, मोजक्या शब्दयोजनेतून मिळणारी चपखल अभिव्यक्ती आणि जगावेगळी फकिरीवृती तुमच्या साहित्यकृतीत सम्यकपणे आढळतात.

तुमचा हात असाच लिहीता राहो, हि सदिच्छा व्यक्त करून हा लेखनप्रपंच थांबवतो.

**प्रमोद गुळवेलकर**
स्टेट बँक ऑफ हैदराबाद
शहाजंग शाखा, औरंगाबाद

★★★

'रानमेवा' व 'माझी गजल निराळी' मधील काही गजला वाचल्या. श्री शरद जोशी व किंमतु ओंबळे यांनी अतिशय सुयोग्य शब्दात तुमचे मुल्यांकन केले आहे असे वाटले. वर्ध्याच्या मातीत या गजला उगवल्या असल्याने अजूनच आपुलकी वाटली.

शुभेच्छांसह

**- डॉ. अभय बंग**
SEARCH
Society for Education,
Action & Research in Community Health

★★★

**कसा जोम यावा खुरटल्या पिकांना, नवे बीज ते अंकुरावे कसे ?**
**तणांचाच जेथे असे बोलबाला, तिथे अन्य काही रुजावे कसे ?**

गंगाधर मुटे यांच्या या ओळी गजल प्रांतालाही लागू पडतात. तणांचाच बोलबाला झाल्याने खरी गजल हरवेल की काय असे वाटते, पण पुन्हा एखाद्या मैफलीत खऱ्या गजलेला रसिक उचलून धरतात आणि आशा तेवत राहते, फक्त होते एवढेच मधल्या काळात तणालाच पीक समजून नवे कवी लिहिते होतात, त्यांचे नुकसान होते, ते 'पाहवे ना डोळा' असे होते म्हणून आजकाल गजल प्रांतात शांतता आहे, अशावेळीच मुटे यांचा गजलसंग्रह येत आहे.

'माझी गजल निराळी'ला माझ्या शुभेच्छा !

**- प्रदीप निफाडकर**
पुणे (ज्येष्ठ गजलकार)

★★★

शेती-मातीशी मनाने एकरूप असलेला श्री गंगाधर मुटे यांच्यासारखा कृषीवल हातात लेखणी घेतो तेंव्हा ती सुद्धा नांगराच्या फाळासारखी भुईला चिरत जाते... कुळवासारखी समोर येणाऱ्या ढेकळांचा चुरा करत जाते.... पाभरीप्रमाणे नव्या आक्रमक आणि बलशाली विचारांचे बी रुजवत जाते...!

साहजिकच या सगळ्यातून निर्माण होणाऱ्या रचना नक्कीच 9काहीतरी वेगळं9सांगतात.... भावनांच्या नव्या आविष्काराने साहित्याची कणगी भरून जातात...!

अशा सार्थक लेखनास मनापासून शुभेच्छा !

**- स्वामी निश्चलानंद**
अरुणाचल प्रदेश

★★★

## निमित्त तिसऱ्या आवृत्तीचे...
## यशाची हॅट्रीक...

आपला कविता अथवा गजलसंग्रह प्रकाशित असावा, ही कोणत्याही कविसाठी अभिमानाची बाब असते. अगदी आधीचे संग्रह प्रकाशित असले, तरी नव्या संग्रहाचे अप्रूप पहिल्या संग्रहाएवढेच ताजे असते. अशात कविता संग्रहाची आवृत्ती संपून नव्याने पुढची आवृत्ती येणे, हा कोणत्याही कवीच्या आयुष्यातील पुरस्काराचा क्षण असतो. गंगाधर मुटे यांच्या **माझी गजल निराळी** या गजलसंग्रहाला हा पुरस्कार अवघ्या तीन वर्षात दुसऱ्यांदा मिळतो आहे.

संग्रहाची पहिली आवृत्ती सुदैवाने मला प्रकाशनापूर्वी वाचायला मिळाली होती. त्याआधी त्यांचे लेखन मी विविध माध्यमातून वाचत असे. गंगाधर मुटे यांच्यातला कवी बहुआयामी आहे. मुक्तछंद, गजल, विडंबन, लावणी असे काव्याचे विविध प्रकार त्यांनी हाताळले आहेत. त्यांच्या लेखनाचा अधिकतर भाग शेती हा विषय घेऊन विविध वळणांनी सामाजिकतेकडे प्रवास करतो. याला कारण त्यांचा शेती विषयक प्रश्नांसाठीचा गेल्या ३५ वर्षांपासूनचा सक्रीय लढा. गंगाधर मुटे यांच्या कवितेविषयी बोलताना अनेकदा सकारात्मकतेने त्यांच्या व्यक्तीमत्वाचा आढावा आपसूक घेतला जातो. एका विधायक भूमिकेला वाहून घेतल्यावरही प्रत्येक क्षेत्रात अभ्यास म्हणून, कुतूहल म्हणून आणि आवश्यकता म्हणून समानतेने, सलोख्याने वावरणारा समन्वित स्वभावाचा त्यांच्यातील कार्यकर्ता आपल्याला अवाक करतो.

भारत हा शेतीप्रधान / कृषीप्रधान देश आहे. मात्र येथील राजकीय इच्छाशक्ती या प्रधानतेस प्राधान्य देताना अभावानेच दिसते. त्यामुळेच शेतकरी संघटनेसारखी समांतर व्यवस्था उभी राहते. आणि आपले सातत्यपूर्ण योगदान देते. अशा कार्यात मिसळलेल्या गंगाधर मुटे यांच्यातील साहित्यिक आणि कार्यकर्ता वेगळा काढता येत नाही. ते इतक्या वर्षात त्यांना स्वत:लाही जमलेलं नाही. पण, ते दोन्ही भूमिकांना सारखाच न्याय देतात. ज्या प्रश्नांवरती सरकारने परिषदा भरवाव्यात त्याच प्रश्नांसाठी गंगाधर मुटे यांनी अखिल भारतीय स्तरावरील तीन शेतकरी साहित्य संमेलने यशस्वी करून दाखवली आहेत. मराठी भाषेत शेती या विषयासाठी समर्पित लेखन करणाऱ्या लेखकांच्या, कवीच्या यादीत गंगाधर मुटे यांचे नाव

अग्रणी आहे. साहित्य जगताला, शासनाला या संवेदनशील विषयाची तीव्रता आणि मुटेंसारखा साहित्यिक अद्याप कळू नये, हे केवळ दुर्दैव म्हणावे लागेल.

गंगाधर मुटे यांची गजल किंवा कविता निव्वळ मनोरंजन किंवा त्यांनी त्यांच्या छंदासाठी लिहिलेली नाही. त्यांची कविता निश्चितपणे वैचारिक गटात मोडणारी आहे. काव्यविधेवर घट्ट पकड असलेला त्यांच्यातील पारंगत कवी आज गजल या एका विधेवर लिहिलेल्या संग्रहाच्या तिसऱ्या आवृत्तीचे लोकार्पण करत आहे. यशाची ही हॅट्रीक त्यांची कविता लोकाभिमुख होण्याची सर्वात मोठी पावती आहे.

गंगाधर मुटे यांच्या गजल साकल्याने अभ्यासल्यास त्यांच्या काव्यवैभवाची प्रचिती आपल्याला येते. सामान्यता प्रचलित नसलेले परंतु मराठी भाषेत रुढ असलेले शब्द तसेच बोली भाषा, तेथील वाक्पचार, म्हणी यांचा चपखल वापर ते आपल्या गजलेत, कवितेत करतात. त्यायोगे ते भाषा समृद्धीस / संवर्धनास सहाय्यच करत आहेत. त्यांच्या गजलेतील, कवितेतील थेट उदाहरणांवर भाष्य न करता त्यांच्या समग्र काव्याशयावर बोलणे अधिक सयुक्तिक ठरावे. कारण कवितेतील प्रत्येक फॉर्म त्यांनी तो तो आकृतीबंध सांभाळून हाताळला आहेच. गजलचे तंत्र आणि आशयाचा मंत्र असा समांतर प्रवास गंगाधर मुटे यांची गजल करते. त्यामुळेच त्यांनी गजलेत वापरलेली वृत्त कोणती आहेत ?.. कशी हाताळली आहेत ?.. हे अभ्यासण्यासोबत त्यांनी गजलेत मांडलेले विषय, जाणीवा आणि भूमिका कोणत्या आहेत ?.. याकडेही वाचकांनी गांभीर्यानेच पहावे. याचे कारण, छंदोबद्ध कवितेतील अधिकतर वृत्ते मुटे यांना अवगत आहेत. वृत्त आणि तंत्रात ते लीलया सामावून आशयाला उचित न्याय देतात. आकृतीबंधाची परीक्षा ते अव्वल गुणांनी केव्हाच पास झाले आहेत. अनेकदा काही गजलकार मात्रावृत्तात यतीचे भान राखत नाहीत. जमेची बाजू म्हणजे, ही गोष्ट (हा दोष) गंगाधर मुटे यांच्या गजलेत आढळत नाही. जिथे तंत्र आशयावर हावी होते, तिथे रचना अमूक एका वृत्तात बांधून ती गजल झालीच पाहिजे, असा अट्टाहास ते ठेवत नाहीत. म्हणून त्यांच्या लेखनातून काव्य आणि आशय हरवत नाही. (गंगाधर मुटे यांनी हाताळलेले अन्य काव्यप्रकार वाचण्यासाठी, अभ्यासण्यासाठी त्यांचे रानमेवा, वांगे अमर रहे, नागपुरी तडका इ. संग्रहदेखील रसिकांनी जरूर वाचावेत.)

सेवावृत्तीने प्रत्येक वाट चालणारा हा संवेदनशील कार्यकर्ता आपल्या प्रत्येक भूमिकेशी तितकाच प्रामाणिक असतो. लेखणीची तीव्रता किती धारदार असते. याचे मर्म गंगाधर मुटे यांना समजले आहे. शेतीविषयक महत्वाच्या प्रश्नांवर त्यांनी अनेकांना लिहितं केलं आहे.

समाजमाध्यमांतूनही ते अशाच प्रकारचे लेखन सातत्याने करत असतात. यासाठी स्वतंत्र असे बळीराजा डॉट कॉम नावाचे संकेतस्थळ सुरू करून त्यामाध्यमातून शेतीसाहित्य व साहित्य विषयक विविध उपक्रम ते सातत्याने राबवित असतात. (येथील नोंदीची जरी शासनाने दखल घेतली, तरी शेतीविषयक अनेक प्रश्न मार्गी लागू शकतील.)

प्रस्तुत संग्रहात ९० रचना आहेत. यामाध्ये ६ कविता आणि ६ हजल (विडंबन कविता) देखील समाविष्ट आहेत. जिथे काही (जाणती ?) मंडळी गजलला कवितेहून निराळी मानतात. कवितासंग्रह म्हटल्यावर तिथे गजल समाविष्ट करणं टाळतात. तिथे मुटे यांनी गजलसंग्रहात कविता समाविष्ट करून नवा सकारात्मक पायंडा पाडला आहे. मराठी गजलचे खलिफा सुरेश भट यांनी गजल आणि कविता ही एकाच बागेतील फुले असण्यावर भर दिला आहे. त्यांचे (त्यांच्या हयातीतील) संग्रह कविता, गजल, गीत, मुक्तछंद, अभंग असे संमिश्र आहेत.मुटे यांनी हाताळलेले हे विषय अधिकतर शेती आणि आसपासच्या घटनांची नोंद ठेवणारे असले, तरीही गंगाधर मुटे यांचे लेखन एकसुरी होताना आढळत नाही. मिष्किलता, नर्मविनोदीपणा, गांभीर्य हे सगळेच गुण त्यांच्या आणि त्यांच्या कवितेच्या ठायी आहेत. सामाजिकतेसोबत प्रेम, विरह, श्रृंगार हे विषयदेखील आपल्या कवितेत ते नजाकतीने हाताळतात.

आकृतीबंधात लिहिली जाऊनही त्यांची गजल आपली पारंपारिक चौकट मोडतना दिसते. त्यांची नाळ भूकेच्या वैश्विक प्रश्नांशी त्यांनी स्वेच्छेने जोडून घेतली असल्यामुळे त्यांची कविता आपोआपच आपबिती - जगबिती चे सूत्र सांभाळून भाष्य करते. भाषेला प्रांताच्या मर्यादा असू शकतात. केवळ हा घटक वगळला तर त्यांचा काव्याशय वैश्विकतेच्या दिशेनेच प्रवास करतो. देशावरील परकीय संकटांची नोंदही ते आपल्या संवेदनशील लेखनातून घेतात. दु:ख, वेदना मांडताना हळवी असणारी त्यांची लेखणी व्यवस्थेच्या विरोधात उभी ठाकताना आपला संयम हरवू देत नाही. त्याचप्रमाणे आंदोलनाची भाषा करणाऱ्या त्यांच्या गजल भाषेची संयतरेषा ओलांडत नाहीत. हे त्यांच्यातल्या कवीच्या प्रगल्भतेचे लक्षण ठरते.

गंगाधर मुटे यांच्या गजलेत, कवितेत काव्य जितके उलगडते तितकेच अनेक प्रश्न आपल्या पुढे उभे ठाकतात, काही सहज उलगडतात, तर काही संदर्भनिहाय वेगवेगळ्या छटा दाखवतात. त्यांचा जाणीवपूर्वक अभ्यास करून प्रश्नोत्तरांना सामोरे जावे लागते. शेतकऱ्यांच्या समस्यांवर आजवर विविध स्तरांमधून लेखन झालेले आहे. प्रश्नोत्तरांचे स्वरूप बदललेले असते इतकेच... पण, मुटेंची आशावादी लेखणी उत्तराची शाई घेऊनच लिहिती होते. त्यामुळेच त्यांची कविता बहरत असते. ज्यात संवेदना दडलेल्या असतात, अशा कविता

मनावर कायम कोरल्या जातात. त्यांनी निवडलेल्या विषयाची संवेदना थेट ही जगण्याशीच निगडीत असल्यामुळे ती अधिक भावते. त्यामुळेच चिरकाल जाणवत राहते.

शीर्षकाप्रमाणेच अनेक अर्थाने त्यांची गजल निराळी आहे. समकालीनांमध्ये त्यांची गजल निश्चितपणे आपले अस्तित्व नोंदवण्यात यशस्वी होते. अनेकदा गजल रचनेस कविता संबोधल्यावर काही गजलकार नाराजीचा सूर काढतात. खरंतर असं होऊ नये. कवितेचा कुठलाही फॉर्म ही मुळात कविताच असते. गजल, अभंग, लावणी, रूबाई हे नंतर ठरलेले वर्ग असतात. गजलला कविता संबोधणे, हा खरेतर तिच्यातील काव्यगुणांचा सन्मान असतो. याची जाणीव अनेकदा कवींना होत नसते. गंगाधर मुटे यांना यातले सत्य उमगलेले आहे. त्यांना गजल आणि कवितेमधली धूसर रेषा स्पष्ट दिसली आहे.

गंगाधर मुटे यांच्या कवितेत, गजलेत जीवनानुभूतीचे सर्व रंग आढळतात. कविता आणि गजल यांच्यामध्ये एक धूसर सीमारेषा असते. तिच्या जवळ राहूनच चांगली गजल जन्माला येत असते. तसे नसेल तर तो आकृतीबंधाचा नमुना म्हणूनच उरतो. वृत्त आणि वृत्ती हातात हात घालून मिरवले पाहिजेत. समकालीन उत्तम गजलकारांमध्ये गंगाधर मुटे यांच्या गजलेत हा गुण जाणवतो. सोपी, ओघवती भाषा आणि शैली.. ही त्यांच्या कवितेची, गजलची जमेची बाजू आहे. प्रसंगानुरूप वापरलेले बोली भाषेतील शब्द काव्यार्थ विचारात घेता ते क्लिष्ट वाटत नाहीत. जे अगदीच क्लिष्ट असावेत वा ठरावेत, अशा शब्दांची सूची गंगाधर मुटे यांनी त्या त्या गजलखाली उपलब्ध करून दिलेली आहे. - हा संग्रह किंवा यातील गजल / कविता अभ्यासक्रमात याव्यात / असाव्यात. काव्याच्या मुख्य प्रवाहात त्या कायम असल्या पाहिजेत, असे मनापासून वाटते आहे. त्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत आणि आपण ते करूया.. यशाच्या या हॅट्रीकनानंतरही या संग्रहाने विजयाचे चौकार आणि षटकार खेचावेत, ही अपेक्षा आणि या शुभेच्छा कायम सोबतीला आहेतच...

**भुईला दिली ओल नाही, ढगाने**
**कसे अंकुरावे अता ते बियाणे ?**

या अशा अनेक शेरातून संवेदना जिवंत राखून जगण्याच्या प्रश्नांचा लढा जागरूक ठेवणाऱ्या गंगाधर मुटे यांना पुढील वाटचालीसाठी अनेकानेक शुभेच्छा...

## - जनार्दन केशव म्हात्रे

janardankmhatre@gmail.com

**भूमिका...**

घामाची कत्तल जेथे, होते सांज सकाळी
तुतारी फुंकते तेथे, माझी गजल निराळी

शब्दांची गुळणी नोहे, नव्हेच शब्द धुराडा
निद्रिस्थी जागवण्याला, गातो शेर भुपाळी

एकेका आरोपीची उला पकडतो गच्ची
सानीच्या लाथडण्यावर पिटती मिसरे टाळी

लढवैय्या आशय माझा करतो तांडव तेथे
जन्माला येते जेथे, ती काळरात्र काळी

युगानुयुगे ते बोलले, ऐकत आलो आम्ही
आता माझ्या मतल्याची ऐकवण्याची पाळी

गजल माझी बंड आणि अन्यायाला दंडही
शेतकऱ्याच्या मुक्तिसाठी आयुधांची थाळी

चैतन्याला पेरून देते अभयतेची खते
संघर्षाला पिकवताना प्रतिभा बनते माळी

लयीत नाही कुणीही, बेसूर सत्ताधारी
अर्थशिस्त शिकवी त्यांना लिहिते वृत्त कपाळी

पोशिंद्याच्या रक्षणाचा 'अभय' घेतो 'मक्ता'
ओतप्रोत भरतो आहे... शेरास्त्रांनी हाळी

**- गंगाधर मुटे 'अभय'**

हेच माझे मनोगत

## लेखणीने लढाईस सज्ज व्हावे...

आता तयार व्हावे लढण्यास लेखणीने
रक्षण अबोलतेचे करण्यास लेखणीने

अभ्यास चिंतनाला शास्त्रात घोळवावे
कसदार शब्दशेती फुलण्यास लेखणीने

वास्तव चितारण्याची अवगत कला करावी
भक्कम नवीन पाया रचण्यास लेखणीने

नवज्ञान निर्मितेला... जेथे उभार तेथे
आशय हळूच न्यावा भिजण्यास लेखणीने

भाकड-वृथा कथांच्या कक्षेपल्याड जावे
अभिजात सृजनाला पुजण्यास लेखणीने

लटकी-पुचाट वाणी शिरजोर होत आहे
यावे रणात गच्ची धरण्यास लेखणीने

जेव्हा चहूदिशांनी वादळ विराट तेव्हा
द्यावे अभय दिव्याला जळण्यास लेखणीने

**मढे मोजण्याला...**

लपेटून ... फासामधी ... कायद्याला
ससे वाकुल्या दावती पारध्याला

नको पाडसा आज कळपास सोडू
चुल्हा तप्त टपला तुला रांधण्याला

जवानीत होता उतावीळ श्रावण
अता फागही ना विचारीत त्याला

तुझी आत्मग्लानी वृथा-व्यर्थ आहे
कुणी येत नाही मढे मोजण्याला

करा की नका काम कोणी पुसेना
बिले चोख ठेवा; लुटा आंधळ्याला

इथे देवळाच्या चिखल भोवताली
स्मशाने चकाचक 'अभय' तालुक्याला

## दुपट्टा घसरणे वगैरे वगैरे ...

किती गोड ताज्या स्मृती त्या क्षणांच्या, तुझे ते बिथरणें वगैरे वगैरे
छुप्या पावलांनी हळूवार येणे, दुपट्टा घसरणे वगैरे वगैरे

तुझा शब्द एकेक वेचायचो मी, उतावीळ होतो तुला ऐकण्याला
तुझे मात्र मिथ्या अती भाव खाणे, अबोलाच धरणे वगैरे वगैरे

तुझा केशशृंगार न्याहाळतांना, उभा फक्त होतो तुझ्या पायशाला
तरी लाजुनी तू; खळी लाल होणे, मुरकणे, इतरणे वगैरे वगैरे

कुणालाच नव्हती खबरबात काही, कुठे वाच्यता ना कुठे बोलबाला
तुझ्या आणि माझ्यात एकत्व येणे, स्वत:ला विसरणे वगैरे वगैरे

अनासक्त मी! हे तिला मानवेना, कसे डाव लटकेच खेळायची ती
वृथा आळ घेणे, मनस्ताप देणे, रुजूवात करणे वगैरे वगैरे

कधी द्यायची ती दुटप्पी दुजोरा, मुळी थांग पत्ता मनाचा न येई
मला पेच हा की पुढे काय होणे! मनाशी कचरणे वगैरे वगैरे

मुसळधार होती तुझी प्रेमवर्षा, किती चिंबलो ते कळालेच नाही
जणू थेंब प्रत्येक मकरंद धारा, मधाचे पखरणें वगैरे वगैरे

तुझी ठेव अस्पर्श तू रक्षिलेली, मिळाली मला; ते ठसे आज ताजे
स्मरे त्या क्षणांचे मदोन्मत्त होणे, कराग्रे विहरणे वगैरे वगैरे

'अभय' एक युक्ती तुला सांगतो मी, करावे खरे प्रेम मातीवरी या
भुई संग जगणे, भुई संग मरणे, भुई संग झरणे वगैरे वगैरे

## शब्दबेवडा ...

आयुष्याच्या वळणावरती जेव्हा पुरता दमून गेलो
पोट बांधले पायाशी अन् हात हवेचा धरून गेलो

हळवे अंतर खुणवत होते, 'संपव जगणे' सांगत होते
मग्रुरीच्या पोटासंगे दडून गेलो; जगून गेलो!

ऐश्वर्याला दिपून इथल्या बघता बघता 'बटीक' झालो
सीतेला शोधणे विसरलो! लंकेमध्ये रमून गेलो!!

अनुभूतीचा सुसाट वारू शब्दामधुनी उधळत गेलो
व्यवस्थेशी 'भिडणे' सोडून शब्दबेवडा बनून गेलो

आस्तिक मी की नास्तिक आहे जेव्हा कोडे मला सुटेना
परमार्थाशी नाळ जोडुनी मानवतेला भजून गेलो

तुझे तडाखे सोसून काया झिजून गेली, सुकून गेली
तरी निसर्गा! कुठे मनाने यत्किंचित मी खचून गेलो?

विज्ञानाने हात टेकले अन् बुद्धीही हतबल झाली
पूजन-अर्चन, जंतर-मंतर तमाम तेव्हा करून गेलो

देण्यासाठी घाव सुगंधी टपून होती फुले गुलाबी
दुरून टा-टा करून त्यांना 'अभय' जरासा हसून गेलो

## जगणे सुरात आले ...

वृत्तात चालण्याचे शब्दास ज्ञान झाले
कविते तुझ्या लयीने जगणे सुरात आले

आनंद भोगताना परमार्थ साध्य व्हावा
'असलेच कार्य कर तू' दोहे मला म्हणाले

चिरडू नये कधीही हकनाक जीवजंतू
हे सार वर्तनाचे, भजनातुनी मिळाले

दुखवू नये कधीही मनभावना कुणाची
सुविचार मर्म हेची, ओव्यातुनी निघाले

पद्यात काय गोडी, शब्दात काय सांगू
ठाऊक फक्त त्यांना, गाण्यात जे बुडाले

मतला, रदीफ, यमके, शब्दात गुंफताना
झालेत ते यशस्वी, उत्तुंग जे उडाले

का पाठलाग त्यांचा, निष्कारणे करावा?
एकेकटेच मिसरे, निसटून जे पळाले

कसला 'अभय' कवी तू? रचलेस हे मनोरे
जे ना तुला कळाले! जे ना मला कळाले!

## वरुणदेवाने फालतू त्याची जात दावू नये ... (कविता)

वरुणदेवाने फालतू त्याची, जात दावू नये
गाभुळलेल्या शिवारास यंदा, आग लावू नये

एवढ्यासाठीच जोपासतात, 'ते' येथे गरिबी
की महान परंपरेला त्यांच्या, तडा जाऊ नये

कुत्रा चावो, विंचू चावो वा, सापही चालेल
हे परमेशा ! या मेंदूस मात्र, अहं चावू नये

जन्माने असेल की कर्माने, कशाने शूद्र मी ?
की; माझ्या नांगराला एक पण, देव पावू नये ?

कुणी आणली असेल अशी वेळ, या सारस्वतांवर
की उंदीरही ज्ञानपीठाचे, पीठ खाऊ नये ?

तू कोसळ एकदाची डोळ्यात, अथवा कशातही
आसमंतामध्ये आज माझे, श्वास मावू नये

बाकी सर्व विसर 'अभय' पण एक, लक्षात ठेव तू
गाढवाच्या मागे, एडक्याच्या पुढे धावू नये

## पाहून घे महात्म्या...

पाहून घे महात्म्या, इथली शिवार राने
केला भकास भारत, शोषून इंडियाने

तुमचे विचार बापू, गाडून पूर्ण केला
तुमचा बघा पराभव, तुमच्याच वारसाने

चाकू - सुऱ्या प्रमाणे, हातात पेन त्यांच्या
जितके लुटायचे ते, लुटतात कायद्याने

संपूर्ण सातबारा, कोरा करू म्हणाले
भुललेत भाडखाऊ, दिल्लीत पोचल्याने

आसुड उगारणारा, माझा स्वभाव नाही
पण; वेळ आणली या, मग्रूर लांडग्याने

वृद्धाश्रमात आई, गोतावळ्यास झुरते
गायीस मात्र माता, म्हणतात गौरवाने

इतुकेच शोध उत्तर, मातीत राबणाऱ्या
बदलेल भाग्य निव्वळ, तू घाम गाळल्याने?

मुर्दाड शासकांना, सोयरसुतूक नाही
हकनाक तूच मरशिल, गळफास घेतल्याने

शेती कसून दाखव, विद्याप्रचूर तज्ज्ञा
सुटणार प्रश्न नाही, बुद्धी उगाळण्याने

लक्ष्मीस आणखी मी, सांगा किती पुजावे?
नांदूच देत नाही, ही अवदसा सुखाने!

डोक्यास ताण दे तू , अन सोड आत्मग्लानी
काही तरी 'अभय' कर; मुक्ती मिळेल ज्याने

## एक केवळ बाप तो...

तापणारा तापतो... अन मजवरी संतापतो
मी खुबीने ताप त्याचा धस्कटाने मापतो

तापल्या मातीकुतीला या ढगांची ओढणी
ओढताना ओढणीला सूर्यही मग धापतो

अंतरात्म्याचा दुरावा... वाढला जर फार तर
अंतराला... अंतराच्या... अंतराने कापतो

वाचणारा वाचतो पण का, कशाला, जाणतो?
वाढवाया 'आत्मगौरव' छापणारा छापतो?

आसवांच्या आसवांना धीर द्याया धावतो निर्भयाला
'अभय' ज्याचे एक केवळ बाप तो

## वैश्विक खाज नाही...

शृंगारल्या मनाला, वैश्विक खाज नाही
भोगत्व सोडले तर, कसलाच माज नाही

निष्णात सैन्य माझे; पण हारणार नक्की
मोफत लढावयाचा, यांना रिवाज नाही

त्यांच्या कपटनितीला, चिरडून टाकतो मी
धर्मास जागणारा, मी धर्मराज नाही

खाणार काय घंटा? सोने पितळ नि तांबे?
शेतीमधे उद्या जर पिकले अनाज नाही

गावे बकाल आणिक, शहरे सुजून आली
आम्हांस मात्र त्याची, अजिबात लाज नाही

शालेय पुस्तकांनी, मेंदू बधीर केला
बुद्धी भ्रमिष्टतेवर, उरला इलाज नाही

स्वातंत्र्य देवते तू ... ये भारतात थोडी
जेथे 'अभय' कुणाला, कुठलेच आज नाही

## नाटक वाटू नये...

थुंकली थुंकी पुन्हा पुन्हा, उगीच चाटू नये
नाटक सुद्धा असेच वठव की, नाटक वाटू नये

लाख उमटू दे देहावरती, आपुलकीची चरे
पण इवलेसे काळीज माझे, तितुके फाटू नये

नकोस दाखवू दिव्य धबधबे, अत्तरवर्णी झरे
मी मागत नाही फार परंतु; पाझर आटू नये

वरून सांत्वन, आतून चिमटा; नाद तुझा वेगळा
जाणीव इतकी तरी असू दे, मैतर बाटू नये

सपाट टक्कल चमचमी माझे, लोभसवाणे जरी
संधी मिळाली म्हणून त्यावर, पोळी लाटू नये

पिकल्या फळांनी लदबदलेले, रान जरी मोकळे
हवे तेवढे भरपूर खावे, फुटवे छाटू नये

सगे-सोबती गाळून घे तू, 'अभय' घप्प मनाने
बिनकाम्यांची अवतीभावती, गर्दी दाटू नये

**खट्याळ रसातली आध्यात्मिक गजल...**

हसण्यात जन्म घ्यावा उरकून माणसाने
प्रज्ञा, कला, प्रितीवर भाळून माणसाने

दोन्ही मुठी रिकाम्या घेऊन जन्म-मृत्यू
तृप्तीसवे करावा हनिमून माणसाने

रागिष्ट रागिणीला देऊन सोडचिठ्ठी
शांतीसही बघावे बिलगून माणसाने

माया, तृषा, मनीषा नेईल आडमार्गा
लागू नयेच नादी उमजून माणसाने

करपाश घट्ट द्याया अथवा विलीन व्हाया
सुमतीस वश करावे रिझवून माणसाने

आसक्त कामिनीची छाया पडू न द्यावी
दीप्तीसमेत ज्योती विझवून माणसाने

रति-काम-मोह-मत्सर वरचढ अभय न व्हावे
मुक्तीकडे निघावे हरखून माणसाने

(मराठी मातीला खट्याळरसाचे वावगे नाही नास्तिकांना आवडेल अशी भाषाशैली वापरून आस्तिकभाव त्यांचेपर्यंत पोचवण्यासाठी संतांनी खट्याळरसाचा उपयोग खुबीने केलेला आहे त्याचे पुरावे संतसाहित्यात सापडतात गजल या विदेशीसंस्कृतीचा पदर लाभलेल्या काव्यप्रकाराला मराठी मातीचा सुगंध देण्याचा हा एक प्रयत्न)

## कळली तर कळवा ...      (कविता)

दुष्काळाच्या ज्वाळांमध्ये, जपून ठेव नर
गोठवलेल्या बर्फाखाली, अप्सरांचे घर

जबरदस्तीने घुसतो काय, साप कधी सांग
तूच आपल्याच बिळावरती, झाकण नीट धर

यंदा मुद्दल मागू नकोस, फुकट केळी ने
कामात येईल कधी काळी, गरज पडली जर

भिडाच एकदा निग्रहाने, बाकी बघू मग
कोण लोळणार खाली आणि, कोण चढेल वर

स्मशानातल्या मसन्याउदास, कुठे काय वर्ज्य
मेल्यावरती मर नाहीतर, जिवंतपणी मर

किती उपडणार आहेस तू, बस इतके ठरव
रोज वाढणाऱ्या धस्कटास, ‘अभय‘ असेल तर

## अमेठीची शेती ...

सांगा कशी फुलावी, तोऱ्यात कास्तकारी
वाह्यात कायद्यांच्या लोच्यात कास्तकारी

देशात जा कुठेही, भागात कोणत्याही
सर्वत्र सत्य एकच; तोट्यात कास्तकारी!

झिजतात रोज येथे, तिन्ही पिढ्या तरी पण;
दारिद्र्य-अवदसेच्या विळख्यात कास्तकारी

कांदा हवा गुलाबी, स्वस्तात इंडियाला
जावो जरी भले मग, ढोड्यात कास्तकारी

पोसून राजबिंडे; आलू समान नेते
उत्पादकास नेते, खड्ड्यात कास्तकारी

डॉलर सुकाळ शेती, बारामती-अमेठी
ती तांबड्या दिव्याची, अज्ञात कास्तकारी

हे बोलणेच आता, हा नाइलाज उरला
की सोड 'अभय' एका झटक्यात कास्तकारी

## अस्थी कृषीवलांच्या...

पाया रचून गेले कर्तव्य जागणारे
होते तसेच आहे नुसतेच बोलणारे

होऊ नकोस कष्टी चिंतातुराप्रमाणे
जालिम इलाज कर तू विध्वंस रोखणारे

माजून तर्र काही दिसतात कर्मचारी
प्रत्येक कागदाला पैशात घोळणारे

देणार साथ काया नाही मनाप्रमाणे
उडत्या मनास छळते हे शल्य बोचणारे

रस्ता नवीन नवखा दुर्गम-दरी-पहाडी
संगे हवे कशाला वाटेत धापणारे?

धर्मांध शोषकांच्या झुंडी तयार झाल्या
जातीत पांगलेले अन्याय सोसणारे

अस्थी कृषीवलांच्या पुसतात संसदेला
करतात आत्महत्त्या का देश पोसणारे?

मस्तीत चालतो मी तुडवीत कूप-काट्या
करतील आमरस्ता मागून चालणारे

देतो 'अभय' कशाला भगवंत या पिलांना
शेतीस काळ ठरती, शेतीत जन्मणारे

## मरणे कठीण झाले...

जगणे कठीण झाले, मरणे कठीण झाले
शोधात सावलीच्या, पळणे कठीण झाले

ना राहिले जराही विश्वासपात्र डोळे
झुळझूळ आसवांचे झरणे कठीण झाले

हंगाम अन ऋतूही विसरून स्वत्व गेले
हा ग्रीष्म की हिवाळा, कळणे कठीण झाले

कलमा, बडींग, संकर; आले नवे बियाणे
पंचांग गावराणी पिकणे कठीण झाले

बाभूळ, चिंच, आंबा; बागा भकास झाल्या
मातीत ओल नाही, तगणे कठीण झाले

सोंगे निभावताना मुखडा थिजून गेला
ओळख मलाच माझी पटणे कठीण झाले

एकाच वादळाने उद्ध्वस्त पार केले
आयुष्य हे नव्याने रचणे कठीण झाले

दिसतात 'अभय' येथे चकवे सभोवताली
रस्ताच जीवनाचा सुचणे कठीण झाले

## आडदांड पाऊस...

अडदांड बेत ओला शिजवून पावसाने
केला शिवार खच्ची भिजवून पावसाने

गाळून घाम विणले मी वस्त्र स्वावलंबी
केल्यात पार चिंध्या खिजवून पावसाने

आले मनात जेव्हा तेव्हाच निग्रहाने
केले सपाट डोंगर झिजवून पावसाने

खाण्या-पिण्यात झाला पाऊसही अधाशी
हंगाम फस्त केला निजवून पावसाने

नाही दिले कुणाला थोडे ‘अभय‘ परंतू
खरडून दैव नेले ... थिजवून पावसाने

## प्राक्तन फिदाच झाले...

प्राक्तन फिदाच झाले यत्नास साधताना
मोती पुढ्यात आले वाळूस गाळताना

शोधात भाकरीच्या निम्मी हयात गेली
स्वप्नेच वांझ झाली तारुण्य जळताना

हलक्याच त्या हवेने का कोसळून जावा?
हेका उगीच होता तो स्तंभ बांधताना

पिकल्या फळास नाही चिंता मुळी मुळीची
दिसलेच ना कधीही हितगूज सांगताना

द्रव्यापुढे द्रवीतो का कायदा म्हणावा?
नेमस्त गांजलेले कानून पाळताना

आता 'अभय' जगावे अश्रू न पाझरावे
आशेवरी निघावे ही वाट चालताना

## कुठे लुप्त झाले फुले-भीम-बापू?...

किती ज्येष्ठ आहे किती श्रेष्ठ आहे किती सभ्य आहेत ही माणसे
परी माणसासारखी वागताहे, असे चित्र नाही दिसे फारसे

कधी भाट होई सख्या चेहऱ्यांची, कधी घोटती लाळ द्रव्यापुढे
खरे रूप दावी असे धैर्य नाही, किती भ्रष्ट झालेत हे आरसे?

'घराणे' उभे राहिले गावगावी, कुठे लोकशाहीस नेतो अम्ही?
सग्यासोयऱ्यांचे अता राज्य आले, पदे भोगण्याला नवी वारसे

जरा गंध नाही मुळी झोपडीला, नव्या इंडियाच्या युगाचा नव्या
कुठे लुप्त झाले फुले-भीम-बापू, मिटवले कुणी पावलांचे ठसे?

कुणी एक वेडा म्हणे जागवावी, 'अभय' झोपलेली इथे माणसे
परी घेतले सोंग ज्याने निजेचे, कळेना तया जागवावे कसे...!

## अन्नधान्य स्वस्त आहे...

अन्नदाता या युगाचा जाहला उद्ध्वस्त आहे
फक्त कारण एवढे की अन्नधान्यं स्वस्त आहे

मी म्हणालो फक्त इतुके 'शब्द माझे शस्त्र आहे'
चक्क माझ्या भोवताली चोख बंदोबस्त आहे

अर्थसंकल्पात होती खायसाठीची व्यवस्था
कागदावर आकडे अन् माल सारा फस्त आहे

कोण गेले, कोण मेले, कोण पुसतो काळजीला
झोपली सद्भावना अन यादवी आश्वस्त आहे

पुस्तकाने कोणत्याही नोंद नाही घेतली की
कष्ट आणिक भाग्य-लक्ष्मी हाच रेशो व्यस्त आहे

कोरडा दुष्काळ तेव्हा पांढरे पक्षी दिसेना
कंच पिकलेल्या सुगीला मात्र त्यांची गस्त आहे

नापिकीच्या पावलाने काळ हा सोकावलेला
या शिवाराचा जणू तो नेमला विश्वस्त आहे

कोरडे जेव्हा भगोणे, पीठ-मिरची सापडेना
मीच माझी भूक तेव्हा, रोज केली ध्वस्त आहे

तो म्हणाला, काव्य कसले अभय गजला फालतू या
(लेखणीच्या पाभरीने जीवजंतू त्रस्त आहे)

## पुढे माणसांचे यशू-बुद्ध होते...

घमासान आधी महायुद्ध होते
पुढे माणसांचे यशू-बुद्ध होते

प्रणयवासनेला सिमा ना वयाची
न तो वृद्ध होतो, न ती वृद्ध होते

जुने देत जावे, नवे घेत यावे
दिल्याघेतल्याने मती शुद्ध होते

किती साचुदे गाळ-कचरा तळाशी
तरी धार नाहीच अवरुद्ध होते

जसा बाज गजलेस येतो मराठी
तशी मायबोलीच समृद्ध होते

कशाला 'अभय' काल गेलास तेथे
जिथे वागणे आणखी व्रुद्ध होते

## रक्त आटते जनतेचे... (कविता)

रक्त आटते जनतेचे, देश सुंदर घडवायला
एकटा रावण पुरेसा, राज्य धुळीत मिळवायला

सारे काही सवलतीत; धान्य, इंधन, साखर, तेल
कोण तयार होईल मग, इथे हाडे झिजवायला

निघून गेलेत शहाणे, सर्व 'साहेब' बनायला
मूर्ख आम्ही उरलो इथे, मोफत अन्न पिकवायला

टाळले होते फुलांनी, आयुष्यभर भेटायचे
आज मात्र सडा पडलाय, मस्त तिरडी सजवायला

दार गेले, धुरा गेला अन कर्जापायी कुंकू
दोन्ही हात उरले मात्र, दररोज उर बडवायला

किती सीता पळवायच्या, तुम्ही लागा पळवायला
श्री बजरंग येत आहे, 'अभय' लंका तुडवायला

## आत्महत्या बळीच्या तू रोख वामना..

लाजुनी पाहिले ना रोखून पाहिले
तूज ग्रंथाप्रमाणे वाचून पाहिले

वाढला हा दुरावा स्नेहात का तुझ्या
लाख गुन्हे तरी मी झाकून पाहिले

साथ देण्यास माझे मी हात जोडले
मख्ख मुद्रेत त्याने त्रासून पाहिले

क्रोध ताब्यात माझ्या मी आणतो म्हणे
चांदणे मस्तकाला घासून पाहिले

नम्रता रोमरोमी भिनते म्हणून मी
गाढवांच्या पुढेही वाकून पाहिले

काल अग्नीपरीक्षा त्यांनीच घेतली
कोंबड्यासारखे मज भाजून पाहिले

पूर्ण झाले उणे मी मातीत मिसळता
हातचे मी तरी ना राखून पाहिले

सोंग केलेय त्याने ना ऐकले जणू
प्रश्न भाग्यास जेव्हा टाकून पाहिले

आत्महत्या बळीच्या तू रोख वामना
मी ‘अभय‘दान इतुके मागून पाहिले

## भांडार हुंदक्यांचे....!

ना दाविला जगाला... बाजार आसवांनी
एकांत मात्र केला... बेजार आसवांनी

धुत्कारले जगाने... नाकारले सख्यांनी
तेव्हा दिला मनाला... आधार आसवांनी

संतप्त भावनांना हृदयात कोंबले पण;
केलाच पंचनामा दिलदार आसवांनी

वंध्यत्व पावसाचे नडले पिकांस जेव्हा
बरसून पाजली मग जलधार आसवांनी

होतो पराभवांनी पुरता खचून गेलो
पण रोवल्या उमेदी झुंजार आसवांनी

जेव्हा विजयपताका पहिलीच रोवली मी
जल्लोष धन्य केला साभार आसवांनी

खस्ताच जीवनाचा पाया रचून गेल्या
आयुष्य ठोस केले कलदार आसवांनी

अश्रू कठोर-जिद्दी होताच निग्रहाने
भिरकावली निराशा तडिपार आसवांनी

बाबा तुझ्या स्मृतींचा केला पुन्हा उजाळा
फोडून हुंदक्यांचे भांडार आसवांनी

जे द्यायचे ते दे, जादा नकोच काही
छळणे नकोच नशिबा हळुवार आसवांनी

जा सांग अभय त्याला की त्याग आत्मग्लानी
बरसून दे म्हणावे अंगार आसवांनी

## टिकले तुफान काही...

ललकारण्या दिशांना,  उठले तुफान काही
त्यातील फार थोडे, टिकले तुफान काही

निद्रिस्त चेतनेचे सामर्थ्य जागवाया
पोटात सागराच्या घुसले तुफान काही

देण्यास अंधुकांना संधीप्रकाश थोडा
किरणासमान चर्या जगले तुफान काही

संसार ध्वस्त झाला,  हटलेच ना तरीही
झुंजून निश्चयाने लढले तुफान काही

उडत्या धुळीकणांना पदरात घेत ज्यांनी
आभाळ झेलले ते उरले तुफान काही

तू रोवलेस येथे बी अर्थकारणाचे
पैकीच माळरानी रुजले तुफान काही

कमतोल पाइकांचे सेनापती जरी ते
चेतून आत्मशक्ती तपले तुफान काही

तापून षड-रिपुंनी पेटून पाहिले पण;
भट्टीतही जरा ना जळले तुफान काही

घेरून मध्यभागी केलाय कोंडमारा
नाहीच डोंगरांना नमले तुफान काही

होते तिथेच आहे थिजल्या समान काही
लोळून पायथ्याला निजले तुफान काही

खेळून धूर्त खेळी,  स्वामित्व भोगणारे
सत्ता रवंथताना विरले तुफान काही

कक्षेत यौवनाच्या येताच प्रेमभावे
सौख्यात नांदताना दिसले तुफान काही

विकण्यास आत्मसत्ता जेव्हा लिलाव झाला
बोंबीलच्या दराने खपले तुफान काही

भाषेत गर्जनेच्या आवेश मांडला पण;
किरकोळ आमिषाला फसले तुफान काही

दिसण्यात शेर होते, दाढीमिशी करारी
निर्बुद्ध वागण्याने, मिटले तुफान काही

आश्वासने उधळली, सूं-सूं सुसाटतेने
वचने निभावताना नटले तुफान काही

मोठ्या महालमाड्या शाबूत राखल्या अन्
उचलून झोपडीला उडले तुफान काही

ना पाळताच आला आचारधर्म ज्यांना
गर्तेत लोळताना बुजले तुफान काही

हकनाक व्यस्त झाले चिंतातुराप्रमाणे
आव्हान पेलताना दमले तुफान काही

गल्लीकडून काही दिल्लीकडे निघाले
मध्येच मुद्रिकेला भुलले तुफान काही

बसताच एक चटका सोकावल्या उन्हाचा
पोटात सावलीच्या दडले तुफान काही

भोगात यज्ञ आणिक कामात मोक्षप्राप्ती
संतत्व लंघताना चळले तुफान काही

पूर्वेकडून आले, गेलेत दक्षिणेला
फुसकाच बार त्यांचा, कसले तुफान काही?

सत्तारुपी बयेचा न्याराच स्वाद भारी
आकंठ चाखण्याला झुरले तुफान काही

आरंभशूर योद्धे दिसले जरी 'अभय' ते
गोंजारताच अख्खे निवले तुफान काही

## रंग आणखी मळतो आहे...

रंग सुगीचा छळतो आहे
वसंतही हळहळतो आहे

गारपिटीचे गुलाबजामुन
डोळ्यामध्ये तळतो आहे

मावळतीचा तवा तांबडा
भातुकलीला जळतो आहे

पडतो आहे, झडतो आहे
तरी न मी ढासळतो आहे !

भोळसटांच्या वस्तीमध्ये
घाम फुकाचा गळतो आहे

बेरंगाच्या रंगामध्ये
रंग आणखी मळतो आहे

ऐलथडीच्या सुप्तभयाने
पैलथडीने पळतो आहे

'अभय'पणाचा वाण तरी पण;
पाय बावळा वळतो आहे

**नव्या यमांची नवीन भाषा...**

मला कळाली पुन्हा नव्याने, नव्या पिकांची नवीन भाषा
कठीण मातीत रूजणाऱ्या, नव्या बियांची नवीन भाषा

पुन्हा नव्याने नवीन फुटली, अबोलतेला नवीन वाचा
नवीन दृष्टी, नवे इरादे, निरक्षरांची नवीन भाषा

नभात झेपावण्यास देती, ढगांस टक्कर, विजेस चटके
नवीन किलबिल नवीन कुजबुज नव्या पिलांची नवीन भाषा

नशीब आहे विचित्र मोठे, कुणास रुजण्यास खडक-धोंडे
कठोर पाषाण भेदणाऱ्या, नव्या मुळांची नवीन भाषा

अता मुखातून शोषितांच्या, ज्वलंत हुंकार बोलताहे
नवीन शस्त्रे, नव्या मशाली, अहिंसकांची नवीन भाषा

कुणास बाहूत घेत मृत्यू, विभागतो देह चिंधड्यांनी
यमास थोडी दया न उरली, नव्या यमांची नवीन भाषा

श्रमास मातीत गाडण्याला, नव्या दमाचा विरोध आहे
नवीन शाई, नवे मनसुबे, 'अभय' जनांची नवीन भाषा

## शस्त्र घ्यायला हवे...

श्वापदे पिसाळलीत शस्त्र घ्यायला हवे
झोपले असेल शेत जागवायला हवे

ठाकली टपून चोच टोचण्यास पाखरे
टोचल्या फळास ठीक सावरायला हवे

शीग येइना कधीच पायलीस का इथे?
कोण लाटतोय रास आकळायला हवे

भेद शासका कशास नागरी व गावठी?
वाटणे निधी समान हे शिकायला हवे

लोकराज्य कल्पनेत शासकास चाकरी
सेवकासमान त्यांस वागवायला हवे

कालचे तुफानग्रस्त सज्ज होतसे पुन्हा
झेप घेत उंच-उंच बागडायला हवे

तेच तेच रोग आणि त्याच त्याच औषधी
एकदा तरी निदान नीट व्हायला हवे

वाटते मनास फक्त एवढेच जीवना
की तुझ्यात एकमुस्त चिंब न्हायला हवे

पेरले 'अभय' अनेक बीज जाणतोस तू
हे प्रभो! निदान एक अंकुरायला हवे

## नाटकी बोलतात साले!... (कविता)

कोणीतरी यांची आता, पडजीभ उपटली पाहिजे
नाटकी बोलतात साले, की गरिबी हटली पाहिजे

भुकेचा प्रश्न सुटणारा नाही, तुझ्या भाषणाने, पण;
तू वाचाळ नाहीस अशी, खात्री तर पटली पाहिजे!

राजसत्ताच कोपली बघ, तुझ्या श्रमाच्या कमाईवर
तुझी शक्ती मनगटात तू, पूर्ण एकवटली पाहिजे

रावणांच्या राज्यात पुन्हा, सीता एकाकी पडलीय
भूमीच्या मुक्तीसाठी, तुझी काया झटली पाहिजे

देच तुतारी फुंकून तू, इथेच, याच स्थळी, अशी की;
क्रिया येथे आणि प्रतिक्रिया दिल्लीत उमटली पाहिजे

मामला तीन पद भूमीचा, तुझ्या सिंगावर घेच तू
त्या बटू वामनाची सत्ता, 'अभय' पालटली पाहिजे

## स्वातंत्र्य का नासले ? ...

भारताला कुणी ग्रासले ?
सांग स्वातंत्र्य का नासले ?

विंचवाच्या... विषासारखे
बोलणे का तुझे भासले ?

पिंड माझा पळपुटा नव्हे
मस्तकाला निवे घासले

प्रश्न साधाच मी मांडता
सर्व ज्ञानी मला त्रासले

मार्ग माझाच मी चाललो
तोंड त्याने जरी वासले

त्यागले काल जे तेच तू
अभय का आज जोपासले

**गहाणात हा सातबारा...**

गहाणात हा सातबारा वगैरे
तरी वाढतो शेतसारा वगैरे

जिथे ढेप-सरकी तिथे थांबते ही
घरी खात नाहीच चारा वगैरे

रुबाबात लक्ष्मी पुसे शारदेला
हवी काय खुर्ची, निवारा वगैरे?

अता अन्य काहीच पर्याय नाही
करावाच लागेल ‘मारा‘ वगैरे

बढाई असूदे तुझी तूजपाशी
कुणी ना इथे ऐकणारा वगैरे

कशाला अशी सांग दर्पोक्तवाणी?
तुला कोण येथे भिणारा वगैरे?

खुले नेत्र ठेऊन गिळतो नशेला
खरा तोच असतो पिणारा वगैरे

कधी झोप मोडेल सुस्तावल्यांची?
किती वाजवावा नगारा वगैरे

इथे पावलोपावली लाचखोरी
कुणाचाच नाही दरारा वगैरे

‘अभय‘ भोवती घे लपेटून धारा
प्रवाहास नसतो किनारा वगैरे

## ते शिंकले तरीही...

आकांत बेदखल का अमुचे जगात होते?
ते शिंकले तरीही चर्चा नभात होते

सोकावलाय येथे काळोख माजलेला
घनघोर रात्र कोठे, कोठे प्रभात होते

का लोळतात पायी सिंहासने तयांच्या?
अद्भुत नवल कसले त्यांच्या कुळात होते?

आक्रोश शोषितांचे ना उग्र रूप घेते
आक्रंदणे तयांची घरट्यात आत होते

जुळली सतार नव्हती बेसूर जीवनाशी
कसली स्मशानयात्रा तालासुरात होते?

दारिद्र्य पोसताना, गरिबीस राखताना
वाट्यात तज्ज्ञ अभये का एकजात होते?

## त्यांचाच जीव घे तू ...

हा लावतो पुढारी घामास भाव सस्ता
म्हणुनी यमास झाला गिळण्यास गाव सस्ता

मातीत राबताना इतके कळून आले
फुकटात ठोस जखमा! प्रत्येक घाव सस्ता

पर्जन्य, पीकपाणी, दुष्काळ, कर्ज, देणी
शांती महागडी अन केवळ तणाव सस्ता

मरतोय अन्नदाता पर्वा न शासकांना
करतात भाषणे ते आणून आव सस्ता

लाठी उगारताना, बंदूक रोखताना
का वाटला तुला रे माझा उठाव सस्ता?

सत्याग्रहास आता रक्तात माखवावेह
शिकवू चला नव्याने क्रांतीस डाव सस्ता

शोधून शोषकांना तू लाव फास त्यांना
त्यांचाच जीव घेणे उरला बचाव सस्ता

शेतीत राबणाऱ्या खंबीर हो 'अभय' तू
एकीत चालण्याचा करूया सराव सस्ता

## अस्तित्व दान केले...

असणेच आज माझे, नसण्यासमान केले
माझ्याच सावलीने अस्तित्व दान केले

मस्तीत टाकलेल्या, एकाच पावलाने
पावित्र्य आज माझे, दोलायमान केले

हळवा नकोस होऊ, अश्रू मला म्हणाले
संतप्त हुंदक्यांनी, माझे निदान केले

चंचूप्रवेश ज्यांचा हळुवार पावलांनी
त्या शुभ्र कावळ्यांनी उद्ध्वस्त रान केले

वाचाळ वल्गनांना वैतागलो पुरेसा
कानास वेधणारे, रस्ते किमान केले

इवल्या जगात माझ्या, मी रांगतो अजूनी
निष्कपट भावनेला दैदिप्यमान केले

जळले न रोज जेव्हा, चुल्ह्यातले निखारे
तेव्हा 'अभय' भुकेला, धारिष्ट्यवान केले

## हुलकडूबी नाव...

यांव आहे, त्यांव आहे
फेकण्याची हाव आहे

हालल्याने डोलणारी
हुलकडूबी नाव आहे

दूध-पाणी एक होता
एक त्यांचा भाव आहे

मध्यभागी घाण-गोधी
भोवताली गाव आहे

जीवनाने नोंद घ्यावी
जिंकलो मी डाव आहे

भ्रष्ट, लंपट, चोरटा पण;
बोलताना साव आहे

पेटलो मी पूर्ण कोठे?
अंतरंगी वाव आहे

फुंकताना धाप कसली
'अभय' झाले घाव आहे!

**ढोबळमानाने शब्दांचे रूढार्थ**
**फेकणे** : अतिरंजित बढाया मारणे
**हुलकडूबी** : अती हुरळून जाणारी

## माझी ललाटरेषा...

धुंदीत वैभवाच्या... मस्तीत चूर झाली
माझी ललाटरेषा, मजला फितूर झाली

तब्बेत माणसाची, आहे जटील कोडे
जी काल भ्याड होती, ती आज शूर झाली

ते वीर स्वाभिमानी, जे झुंजले रणाला
औलाद आज त्यांची का 'जी हुजूर' झाली

घे घट्ट आवळूनी, करपाश रेशमाचे
भासेलसे जसे की, दमछाक दूर झाली

घे हा 'अभय' पुरावा, त्यांच्या परिश्रमाचा
ती माणसेच होती, जी कोहिनूर झाली

## बत्तीस तारखेला...

भलत्याच ऐनवेळी, हटकून तोल गेला
नादान सद्गुणांनी अवसानघात केला

जागून रात्र सारी, उपयोग काय झाला?
सावज रणात येता, कुत्रा पळून गेला

सांगू नकोस भलते सलतेच तू बहाणे
उरलाय शब्द केवळ, का ओल आटलेला?

नेमून लक्ष्य केले साधेपणास माझ्या
झालीय तीच राणी, माझा गुलाम केला

समजायला हवे ते, समजून आज आले
काही इलाज नाही, पोटातल्या भुकेला

लोंढेच घोषणांचे दिल्लीवरून आले
येणार वित्त आहे, बत्तीस तारखेला

त्याचे रडून झाले, रडतोय मी अजूनी
हिसकून का बरे मग, माझा रुमाल नेला?

राज्यात भेकडांच्या, जनतेस 'अभय' नाही
सोकावलाय मृत्यू तो रक्त चाखलेला

## मरण्यात अर्थ नाही...

संवेदनेत आता जगण्यात अर्थ नाही
जाळून या मनाला, सजण्यात अर्थ नाही

आहे दिले तुला मी, आयुष्य दान माझे
आता वळून मागे, बघण्यात अर्थ नाही

ते भाग्यवंत थोडे, शिखरास गाठती जे
आता पुढेच जावे, हटण्यात अर्थ नाही

ही खिंड राखताना, मृत्यूसवे लढावे
जखमांस घाबरोनी, पळण्यात अर्थ नाही

हो 'अभय' एकदाचा, निश्चिंत निश्चयाने
ऐसे क्षणाक्षणाला, मरण्यात अर्थ नाही

## सोकावलेल्या अंधाराला इशारा…

सोकावलेल्या अंधाराला, इशारा आज कळला पाहिजे
वादळ येऊ दे कितीही पण, हा दीप आज जळला पाहिजे

आंब्याला मानायचे कांदा, किती काळ असेच चालायचे?
डोळे उघडून तू वाग जरा, नकोसा वाद टळला पाहिजे

गाय इकडे आणि कास तिकडे, चारा मी घालायचा कुठवर
कधीतरी इकडे; या बाजूस, दुधाचा थेंब वळला पाहिजे

प्रवेशदाराचा ताबा घेत, का उभा ठाकला आहेस तू?
माझा प्रवेश नाकारणारा, इरादा तुझा ढळला पाहिजे

आता थोडे बोलू दे मला, ऐकणे तुही शिकायला हवे
हे आवश्यक नाही की तूच, दरवेळेस बरळला पाहिजे

निर्भीडतेने 'अभय' असा तू, यज्ञकार्य असेच चालू ठेव
ग्रहणापायी झाकोळलेला, चंद्र आता उजळला पाहिजे

## भारी पडली जात... (कविता)

पोळून गेले तरी कधीच मी, आखडले ना हात
तुझे जिंकणे असे भावले, की खात राहिलो मात

बोलत होती ती अशी की, मी गुंतून गेलो पार
जरा न कळले केव्हा कशी ती, उलटून गेली रात

वाटेवरती काटे बोचरे, पसरून होते दाट
आता पोचलो कसाबसा मी, कित्येक खस्ता खात

एकच गुन्हा समान झाला, परी सजा वेगळी त्यात
आतंकवादी मजेत बाहेर, साध्वी सडते आत

सूर बोबडे ऐकून माझे, मुरडून घेती नाक
नसेल जर का आवड माझी, मी बसू कशाला गात

नारळ फुटला, प्रसाद वाटू, बोलून गेलेत काल
वाट पाहतोय इथे अजूनी, घासून बसलो दात

गुणवत्तेचा गळा दाबुनी, हा निकाल आला आज
कर्तृत्वाचा बोर्‍या वाजला, नि भारी पडली जात

भिती मनातील आता तरी तू, पुरुनी दे वा जाळ
'अभय' जगावे, कसे जगावे, तू घ्यावे करुनी ज्ञात

## ‘पाकनिष्ठ‘ कांदा, लुडबूडतो कशाला ?

भाजून पीक सारे, पाऊस तृप्त झाला
उध्वस्त शेत आधी, मागून थेंब आला

कांदा पुसे रडूनी, कांद्यास अक्कलेच्या
तो पाकनिष्ठ कांदा, लुडबूडतो कशाला ?

चेचून वेदनांना, पायात गाडले; पण
स्वप्नात भूत त्यांचे, रेंगाळते उशाला

दचकून जाग येते, निद्रा लयास जाते
ते घाव प्राक्तनाचे, छळती क्षणाक्षणाला

सोडून भूतळाला, ती दैत्य जात गेली
देऊन दान वृत्ती, या सभ्य माणसाला

ना झाकते कधी ती, वस्त्रात अंग सारे
मिळणार भाव कैसा, शेतीत कापसाला ?

समजून घे ‘अभय‘ तू नाहीत भ्याड सारे
निपजेल शूर येथे, विश्वास दे उद्याला

## गाव ब्रम्हांड माझे...

सांगताना अवेळीच सांगू कसे?
पोळलेल्या मनाचे असे हे हसे!

काल गर्दी किती; रांग होती इथे
आटतांना कुणी सोबतीला नसे

हात घेताच हातात का वाटले?
तप्त अग्नीत जळलेय मोती जसे

शिक्षणाने मिळालाय विश्वास की;
चंद्र तारे अता दूर ना फारसे

पिंजरा तोडुनी मी सिमा लांघल्या
गाव ब्रम्हांड माझे 'अभय' छानसे

## वादळाची जात अण्णा...

माणसे खंबीरतेने, टाकतेया कात अण्णा
इंडियाला भावला हा, एक झंझावात अण्णा

धर्म सत्तेचा कळेना, का असा सोकावलेला?
भ्रष्ट नेते मोकळे अन, कोठडीच्या आत अण्णा

भ्रष्ट आचारास सत्ता, मुख्य झाला स्रोत आहे
घाव घाला केंद्रस्थानी, एकदा द्या मात अण्णा

एक आशेचा उमाळा, शोधताहे देशवासी
चेतना चिंतामणीची, भासते बरसात अण्णा

आस अण्णा श्वास अण्णा अभयतेचा ध्यास अण्णा
अग्निलाही पोळणाऱ्या, वादळाची जात अण्णा

## कापला रेशमाच्या सुताने गळा...

जाणवू ना दिल्या वेदना ना कळा
कापला रेशमाच्या सुताने गळा

घेतला आळ नाही निसर्गावरी
भोगुनी सोसले मी तडाखे-झळा

साथ नाही सुखाचा खरे हे जरी
का तुझ्या वाचुनी मी लुळापांगळा?

राहतो मी कुठे, नेमका कोण मी?
सापडेना खुणा, मी कसा बावळा?

भाग ओसाड का घाम गळतो जिथे?
वाट चुकलाय पैसा-टका आंधळा

झोप घेण्यास तू वेळ लावू नये
मांडला आज आहे इथे सापळा

रंग खात्रीस पक्का, फिका ना पडे
वर्ण भाग्यात माझ्या निळासावळा

मार्ग सारेच धुंडाळतो कैकदा
चालण्याला तरी शोधतो वेगळा

चित्त शाबूत असणे 'अभय' चांगले
पोळलेला जरी भावनांचा मळा

## तरी हुंदक्यांना गिळावे किती ?...

झणी झोत येती तुझ्या आठवांचे, सयेचे उमाळे छिपावे किती ?
बळे रोखतो मी जरी आसवांना, तरी हुंदक्यांना गिळावे किती ?

कधी चाललो मी तुझ्या पावलांनी, कधी बोट हातात होते तुझे
तशी सांज येणार परतून कैसी, मनी प्राक्तनाने झुरावे किती ?

जरी देह-काया चिरंजीव नाही, तळे भावनांचे तरी साचते
जरी घालतो बांध मी या तळ्यांना, हृदय फाटतांना तुणावे किती ?

जगी जीव अब्जो जरी नांदताती फुलांच्या-फळांच्या डहाळ्या दिसे
परी शोधताहे नजर का तुला बा! स्मृतींचे खुमारे भुलावे किती ?

'अभय' विरह येतो नशीबी कुणाच्या, कुणाचेच दुर्भाग्य तैसे नसो
शिरी छत्रछाया अखंडीत लाभो, विधात्या तुला मी पुजावे किती ?

## काळजाची खुळी आस तू ...

भास तू, ध्यास तू, श्वास तू
काळजाची खुळी आस तू

आसवांना दिसू दे जरा
की निघालास जाण्यास तू

फार होतेय लडिवाळणे
खूप घेतोस रे त्रास तू

गुंतता मी गळाला तुझ्या
प्राक्तनाला मिळालास तू

दागिने अन्य काही नको
श्लेष, दृष्टांत, अनुप्रास तू

ओढ डोळ्यास का लागते
का मला वाटतो खास तू

कोण आहेस तू सांगना
धावते बोल प्राणास तू

चूक माझी अशी कोणती
'अभय' घेतोस वनवास तू

## स्वप्नरंजन फार झाले...

स्वप्नरंजन फार झाले
सौख्यही बेजार झाले

झोपलेले ते निखारे
जाग येता गार झाले

झुंजण्याची वेळ येता
शौर्य-धैर्य बिमार झाले

झुंजणारे वीर खंदे
आरशांचे हार झाले

खेळ येथे माकडांचे
या भुईला भार झाले

पान कोरे अक्षरांना
सांगते आचार झाले

बांधलेली भोवताली
भिंत होती दार झाले

उत्तरांना पेलताना
प्रश्नकोडे ठार झाले

अभयतेच्या त्या नशेचे
बंद सारे बार झाले

## सुप्तनाते...

तुझे आणि माझे मुळी सख्य नाही, तरी ओढ का वाटते या मना
कुणी निर्मिले हे असे सुप्तनाते, जरा तू खुलासा मला सांगना

तुला मान्य नाहीच अस्तित्व माझे, हिशेबी तुझ्या मी किडामाकुडा
तुझे वागणे तूज लखलाभ मित्रा, तुला मोक्ष देवो अहंभावना

तुला जाण नाही, मला भान नाही, भटकलाय संसारगाडा कुठे?
धुरा ताणलेले जसे बैल दोन्ही, कुणीही कुणाला जुमानेचना

चला वापरा एकदा आणि फेका, हवी ती खरेदी नव्याने करा
इथे काळिजेही दिखाऊ-विकाऊ, हृदय भासते 'मेड इन चायना'

किती ग्रंथ वाचून मुखपाठ केले, किती ऐकतो रोज पारायणे
जुमानेच नाही कशालाच थोडी, नियंत्रीत होईचना वासना

कसा आज रस्ता दिशाभूल झालो, निघालो कुठे अन् कुठे पोचलो
कसोटीत उद्दिष्ट हरवून गेले, 'अभय' व्यर्थ गेली तुझी साधना

## स्मशानात जागा हवी तेवढी...

कसा जोम यावा खुरटल्या पिकांना, नवे बीज ते अंकुरावे कसे?
तणांचाच जेथे असे बोलबाला, तिथे अन्य काही रुजावे कसे?

पुन्हा आज होऊ नये तेच झाले, कशा थांबवाव्यात वाताहती?
हवेनेच केला जिथे कोंडमारा, तिथे प्राण जाणे टळावे कसे?

तुझा पिंड आहेच विश्वासघाती, तसा एक अंदाज आहे मला
तरी जीव गुंतून जातो तुझ्याशी, मनाचे पिसे कुस्करावे कसे?

जरी सत्य तू बोलशी मान्य आहे, परी त्यास आहे कुठे मान्यता?
सही आणि शिक्क्याविना व्यर्थ सारे, पुरावे तुझे मान्य व्हावे कसे?

कशी एकटी हिंडते रानमाळी, जरी अर्धवेडी भिते ना कुणा
तिला फक्त भीती जित्या माणसांची, पशूंना तिने घाबरावे कसे?

कसा व्यर्थ नाराज झालास आंब्या, वृथा खेद व्हावा असे काय ते
फळे चाखण्याचेच कौशल्य ज्याला, तया ओलणे ते जमावे कसे?

शिवारात काळ्या नि उत्क्रान्तलेल्या खुज्या माकडांचा धुमाकूळ तो
जिथे कुंपणे शेत खाऊन गेली, तिथे त्या पिकांनी लपावे कसे?

'अभय' काळजी त्या मृताची कशाला, स्मशानात जागा हवी तेवढी
समस्या इथे ग्रासते जीवितांना, विसावा कुठे अन् वसावे कसे..!

**काही शेती संबधीत शब्दांचे ढोबळमानाने अर्थ**

**खुरटणे** : वाढ खुंटणे

**तण** : पिकांत वाढणारे अनावश्यक गवत

**ओलणे** : ओलीत करणे,पाणी देणे

## हात घसरतो आहे...

अल्याड डोंगर पल्याड खाई डचमळतो मी मधात आहे
रुतेचना ही नखे कुठेही, सदा घसरतोच हात आहे

कुटाळकीच्या समोर सज्जन समाज सारा हरून गेला
तसाच मीही क्रमाक्रमाने सदैव खातोच मात आहे

बरेच काही लिहून गेलो, कुठे दखल घेतलीय माझी?
जरी तयांनी जरा खरडले, तुफान चर्चा जगात आहे

खुशाल करती टवाळखोरी बघून कोणास पाठमोरा
समोर येता मुखावरी मुख हसून हॅलो प्रघात आहे

किती शहाणे, किती दयाळू, घडीव आहेत राज्यकर्ते
विरोधकांनो बघा जरासे हवेवरी का जकात आहे?

'अभय' पुन्हा तू नकोच देऊ, तुझे असूदे तुझेच पाशी
मुळीच नाही गरज कुणाला समस्तजन हे सुखात आहे

## तुला कधी मिशा फुटणार ?... (कविता)

पाखरेही एकी करतात जरासे पंख फुटल्यावर
पण तुला कधी मिशा फुटणार ? सांग माणूस म्हटल्यावर

पंचम स्वरात बोलणे तुझे, गैरवाजवी नसेलही
पण; मुजोरीची किंमत काय ? पुरेसे नाक कटल्यावर

काही औषध उरले नाही, मित्रा तुझ्या स्वभावाला
मिळणार केव्हा शांती तुल ! माझे डोळे मिटल्यावर ?

राखेशिवाय दुसरे आता अन्य काय उरले येथे ?
अवश्य धावून तू आलास खरा; पण आग विझल्यावर

तुझ्याशी वाद घालणे असा माझा उद्देश नसतोच
तरी वेळ येते कधीकधी, डोक्यात भूत शिरल्यावर

तुमची चर्चा चालू ठेवा, अशी, जशी वाटेल तशी
मी मात्र शब्दांना माळेत गुंफतो मला स्फुरल्यावर

निष्कारण वार केलास तू म्हणून फणा उचलला, पण;
जा तुला मी 'अभय' देतो तू आता मागे हटल्यावर

## सूडाग्नीच्या वाटेवर... (कविता)

माझी गजल ऐकण्यास गर्दी लोटली होती
काही जागीच नव्हती, बाकी झोपली होती

वादंगाचा दुरावा... पंक्तीत उरला नाही
डावी उपाशी नव्हती, उजवी जेवली होती

घामचोरीची तक्रार दाखल केली तेव्हा
विरोधक प्रसन्न नव्हते, सत्ता कोपली होती

सूडाग्नीच्या वाटेवर गतीरोधक नसतात
सलवार विझली नव्हती, पगडी पेटली होती

नियतीचे सारे घाव निग्रहाने पेललेत
संधी दवडली नव्हती, अभये वेचली होती

## घट अमृताचा...

लपेटून चिंध्यांत घट अमृताचा, न देखे कुणीही, शिवेना कुणी
लपेटून चिंध्यांस रेशीमवस्त्रे, अशी होय गर्दी, हटेना कुणी

किती वाटले छान हे गाव तेव्हा, जरासा उडालो विमानातुनी
इथे मात्र मेले कुणीही दिसेना, तरी का तजेला दिसेना कुणी ?

असे गैर ती आत्महत्या कधीही, म्हणे कास्तकारास समजावुनी
परी कारणांचा जरा शोध घ्यावा, अशी सुज्ञता दाखवेना कुणी

समाजात या हिंस्त्र भाषा नसावी नसो स्थान लाठी नि काठीस त्या
परी या मुक्यांची कळे भाव-भाषा, असे ज्ञान सत्तेस दे ना कुणी

भरारीस उत्तुंग झेपावतो मी, कवी कल्पनेला 'अभय' गाठतो
परी वास्तवाने घरंगळत येता, उरे एक भूमी दुजे ना कुणी

## कान पिळलेच नाही... (कविता)

उपदेशाने कान कसे पिळलेच नाही
माझे बहिरेपण त्याला कळलेच नाही

निग्रहाचे धडे दिले विपरीत दशेने
पानगळीतही मग पान गळलेच नाही

वेदनांचा काढा मग गटागटा प्यालो
तेव्हापासून व्यथांनी छळलेच नाही

चिरंतन असती बोल संत साहित्याचे
अनीतीच्या शेकोटीत जळलेच नाही

श्रावणात घननिळे जरा पिघळले होते
पुन्हा त्यांचे थेंब कसे वळलेच नाही

जनसेवेचा प्रताप आणि 'अभय' पुरेसे
शुभ्रकापड घाणीतही मळलेच नाही

## सत्ते तुझ्या चवीने...

सत्ते तुझ्या चवीने... नेते चळून गेले
कुरवाळती कुणाला, कोणा छळून गेले

सारे मिळून भेदू, हा व्यूह ते म्हणाले
लढतोय एकटा मी, सारे पळून गेले

कित्येक चाळण्यांनी, स्वत्वास गाळले मी
उरलीय चित्तशुद्धी, हेवे गळून गेले

समजू नको मला तू विश्वासघातकी मी
पाऊल सरळ होते, रस्ते वळून गेले

आता इलाज नाही, नाहीत मलमपट्ट्या
मजला कळून आले, तुजला कळून गेले

वणव्यात कालच्या त्या, काही उडून गेले
काही बिळात घुसले, बाकी जळून गेले

का सांगतोस बाबा 'अभयास' कर्मगाथा
द्रवलेत कोण येथे, कोण वितळून गेले?

## कान पकडू नये...

आता कुणी कुणाचे 'कान पकडू' नये
वादात या कुणीही सहसा पडू नये

ते दान का मिळाले? जे टाळले सदा
असले पुन्हा नव्याने सहसा घडू नये

शोधेन मीच माझा, रस्ता पुन्हा नवा
त्या मूक दर्शकांनी सहसा रडू नये

निद्रिस्त मीच केल्या माझ्याच जाणिवा
संवेदनेवरी या मीठ रगडू नये

कोणास कोण प्याले, कळतेच ना कधी
नातेच बाटलीशी सहसा जडू नये

म्हणतात वाहवा, व्वा! स्त्रीरम्य वेड ते
सच्चा विचार सहसा का आवडू नये?

सजतात रोज येथे कित्येक मैफिली
कोणास न्याय्य मुद्दा का सापडू नये?

झाले अता पुरेसे, ते बोलले बहू
बाळंत होत ना ती, चर्चा झडू नये

सोसून ऊन वारा, अंकूरतो अता
कोंबेजण्याच आधी सहसा सडू नये

आता कुठे जरासा झालोय मुक्त मी
पायास साखळ्यांनी परत जखडू नये

माझ्याकडे मुळीही किल्ल्या न शिल्लकी
माझ्याविना कुणाचे सहसा अडू नये

हे अन्न सात्त्विकाचे ये 'अभय' भोजना
मंगल अशा प्रसंगी सहसा दडू नये

**पांढरा किडा...**

तुझी सांग येथे दखल कोण घेतो
कशाला घशाला उगा त्रास देतो

असामान्य विश्लेषकांच्या भितीने
गजल घप्प कपड्यात झाकून नेतो

नवे रोप लावत पुढे चालताना
कुणी सांड मागून तुडवीत येतो

पिके फस्त केली फळे पोखरूनी
कुठूनी किडा पांढरा जन्म घेतो

'अभय' लाचखोरीत तो शिष्ट प्राणी
कुणाच्याच बापास ना घाबरे तो

## अय्याशखोर...

मेंदू उगाळतांना माणूस थोर झाला
पंडीत कायद्याचा बाजारखोर झाला

कंकाल हा नराचा जाणीव लोपलेला
सोडून लाजलज्जा मुद्राचकोर झाला

माणूस धर्म ज्याने खुंटीस टांगलेला
भंगार तो तनाचा अय्याशखोर झाला

का ग्रासते मनाला झंकार कंकणाचे
फंदात मोहिनीच्या साधू छचोर झाला

नसतेच जे मिळाले केव्हाच सातजन्मी
ते सर्व प्राप्त होता नेता मुजोर झाला

'कैवार गांजल्याचा' तो डावपेच होता
अधिकार प्राप्त होता अन्यायखोर झाला

का पारखा मनुष्या, मानव्यतेस तू रे
त्यागून कर्मधर्मा, अभये अघोर झाला

## ती स्वप्नसुंदरी...

‘सात‘ खिडक्या पुरेशा मी झाकतो तरी
शिरते कशी कळेना ती स्वप्नसुंदरी

जोपासतो अशी ही आम्ही समानता
राधा,टिना,करीना बाजूस श्रीहरी

जोडे सजावटीला एसी-कपाट ते
भाजी-फळांस जागा, मात्र उघड्यावरी

मंगळ कह्यांत आला, कक्षेत तारका
भैरू अजून खातो कांदा नि भाकरी

जिंकून मीच हरतो, ना जिंकतो कधी
तुमचा लवाद आहे, पंच तुमचे घरी

खेड्याकडून जावे शहराकडे जसे
आकार घटत चोळी, जाते सरासरी

शेती करून मालक होणेच मूर्खता
सन्मान मोल आहे कर ‘अभय‘ चाकरी

## एकदा तरी...

सकाम कर्म त्यागुनी निदान एकदा तरी
ठरेन या जगात मी महान एकदा तरी

नसेल आपले तरी कशास हक्क सांगणे?
समानतेस न्याय दे किमान एकदा तरी

महान, थोर, श्रेष्ठ हे बिरूद फार मिरवले
जगून दाव माणसासमान एकदा तरी

स्वराशिवाय रेकलो असाच मी बरेचदा
निघेल सूर कोकिळे समान एकदा तरी?

उदास चेहरा असा कसा मलूल जाहला?
हसा बघू जरा हळूच छान एकदा तरी

खरीदण्यास पाहतोस स्वाभिमान आमचा
करेन बंद मी तुझे दुकान एकदा तरी

सजा सुनावणे अभय कठीण काय त्यात पण
बघा धरून आपलेच कान एकदा तरी

## आभास मीलनाचा...

केव्हा तरी कशाचा हलकेच भास झाला
आभास मीलनाचा पळभर मनास झाला

शून्यात पाहताना हळुवार लाजली ती
दृश्यात मी असावा, माझा कयास झाला

तू लांब दूरदेशी, ना रूप जाणतो मी
मूर्ती मनी तरळली, कलिजा खलास झाला

पाडातल्या फळांना का आस पाखरांची ?
येता थवे निवासा, मग मेळ खास झाला

विरहात वृक्षवल्ली निघुनी वसंत जाता
बघता तया विलापा पक्षी उदास झाला

प्रेमा सदा भुकेली अभये सजीव माया
निष्काम ज्या उमाळा तो प्रेमदास झाला

## हे खेळ संचिताचे ...

काजळील्या सांजवाती, चंद्रही काळोखला
का असा रे तू समुद्रा निर्विकारे झोपला

सर्वसाक्षी तू म्हणाला 'सर्वमय आहेस तू'
हस्त माझा रेखतांना का असा भांबावला

हंबरूनी वासराने हंबरावे ते किती
आज गायीने पुन्हा तो मुक्त पान्हा चोरला

तृप्त झाल्या व्रुद्ध वाटा, पावले रक्ताळूनी
का कशाला धोंड कोणी जागजागी मांडला?

पाठराखा का मिळेना, का मिळेना सोबती
झुंजताना एकला मी, श्वासही सुस्तावला

साठले कंठात होते, सप्तकाचे सूर मी
साद ती बेसूर गेली, नाद ही मंदावला

संचिताचे खेळ न्यारे, पायवाटा रोखती
चालता मी 'अभय' रस्ता, काळही भारावला

## घुटमळते मन अधांतरी...

अधांतरी घुटमळण्यामध्ये जन्म उरकला सारा
खूप उभारी उडण्याची पण असुया धरतो वारा

पुसतो सदा आसवांना तो पदर भूमिचा ओला
आसू पुसता हळूच पुसतो 'आली जाग शिवारा?'

रांजण भरता थकतो खांदा पण तो रिताच उरतो
पाणी मुरते कुठे कळेना, खेळ कसा हा न्यारा?

मोरपिसाचे रंग लेवुनी, ढगांस तू उधळावे
ढगाळुनी या काळजासही यावा भावपिसारा

शब्दामध्ये परके शब्द बेमालूम ते घुसती
मायबोलीच्या सुंदरतेला काळिमा तो सारा

कालपरत्वे अनहित बुद्धी, तोल तरी ना जावा
मानवतेचा पाठपुरावा... अभये अंगीकारा

## नेते नरमले... (कविता)

मोठे गरजले
छोटे बरसले

रेती वाहतच
गोटे अडकले

मते पाहताच
नेते नरमले

ललना पाहून
कपडे शरमले

चकवेही आज
रस्ता भटकले

शिपाई मजेत
कैदी सटकले

बिल्डर म्हणताच
मंत्री दचकले

काजवे रात्री
'अभय' चकाकले

## वाघास दात नाही...

गायीस अभय देण्या, वाघास दात नाही
रजनीस जोजवीण्या, सूर्यास हात नाही

फुलल्या फुलास नाही थोडी तमा कळीची
एका स्वरात गाणे, साथीत गात नाही

रंगात तू गुलाबी, रूपात का भुलावे
वांग्या तुझ्या चवीला, मुंगूस खात नाही

खांद्यास नांगराचा का भार सोसवेना?
प्राशू नको विषा रे... देहास कात नाही

अभयात वाढलेली... वाचाळ राजसत्ता
राजा पहूडलेला... राजत्व ज्ञात नाही.

## हिमालयाची निधडी छाती... (कविता)

चंद्र मेघात झाकलेला अन, नदीस पूर होता
भटकल्या होडीत 'ती अन मी' किनारा दूर होता

ढळलेल्या सांज समयासी, खुपच लांब बगीचा तो
धोतऱ्याचे फूल तिला दिले मी, काय कसूर होता

ती मला गवसलीच नाही, हृदय जळतच राहिले
बर्फात लपेटले हृदया, तरी निघत धूर होता..

झेलली किती आक्रमणे, माय मराठीने माझ्या
ना डगमगली कदापि, जो तीचा शब्द शूर होता..

धडकले ते रक्तबंबाळ झाले, युद्धखोर ते
टक्कर दिली ! हा हिमालयाचा निधडा ऊर होता

## कसे अंकुरावे अता ते बियाणे ?

भुईला दिली ओल नाही ढगाने
कसे अंकुरावे अता ते बियाणे ?

दशा लोंबताना तिच्या लक्तरांच्या
कुणी का हसावे ? कुबेराप्रमाणे

दगाबाज झाले तुझे शब्द सारे
अता हे फुकाचे कशाला बहाणे ?

निखारे विझूनी कशी राख झाली ?
अता चेतवू मी मशाली कशाने ?

तिजोरी कुणाची उधळतो कुणी तो
अमर्याद झाली तयांची दुकाने

नको रत्न मोती न पाचू हिरे ते
'अभय'ते खरे जे मिळाले श्रमाने

## कुटिलतेचा जन्म...

मत्सराची ज्योत जेथे शीलगाया लागली
नेमकी तेथे 'कुटिलता' जन्म घ्याया लागली

जळफळ्या वृत्तीवर दवा,औषध तरी कोठले ?
आमरस्त्यावरच कांटे पसरवाया लागली

कालपावेतो भुतावळ मी म्हणत होतो तिला
चेटकी होऊन आता ती फिराया लागली

वरणभात जुनाट झाला वेगळे खावे म्हणे
कुंठलेली नीतिमत्ता शेण खाया लागली

थांबवा फाजील चेष्टा बांडगूळांनो अता
वेदना सोसून काने, छी:! पिकाया लागली

ह्या खडूसांची खुशामत अभय केली ना कधी
सावजासम घेरती मज डाफराया लागली

## अंगार चित्तवेधी...

दे तू मनास माझ्या आकार चित्तवेधी
नजरेत गुंतणारा आजार चित्तवेधी

ती बोलली तरी का शब्दास नाद येतो?
त्या बोलक्या स्वरांचे झंकार चित्तवेधी

नाहीच राग येतो, वाटे हवाहवासा
कानास पीळणारा फणकार चित्तवेधी

आभाळ गाठण्याची वेलीस हौस आहे
मिळतो कधीकधी तो आधार चित्तवेधी

दु:खास मांडणारे बाजार फार झाले
दु:ख्खा खरीदणारा बाजार चित्तवेधी

आप्तास कौतुकाचा वर्षाव ही प्रथाची
इतरांस गौरवे तो आचार चित्तवेधी

आगीत खेळतांना, सूर्यास छेडतो मी
कोळून पी 'अभय' तो अंगार चित्तवेधी

## गोचिडांची मौजमस्ती... (कविता)

चौखूर उधळे दाहीदिशा, गवसणी मग घालणार कशी ?
नसते नाकही या मनाला, वेसण तरी टोचणार कशी ?

खूप करती निश्चय-इरादे, मुक्त होण्यास जोखडातुनी
चूल-तव्याने बंधक केले, कंबर आता कसणार कशी ?

जग बदलले, नाणे बदलले, बदलले ते सारे शिरस्ते
नाणी रुप्याची राणीछाप, पण ती इथे चालणार कशी ?

उकर तू तुला हवे तेवढे, हव्या तितक्या लाथाही घाल
पण तुझ्या एकट्या हाताने, जरठ गढी ढासळणार कशी ?

रक्तापेक्षा गोचीड जास्त, झालेत तिच्या अंगोअंगी
गोचिडांची मौजमस्ती पण, अता ती गाय जगणार कशी ?

‘अभय‘ तू असाच चालत रहा, रस्ता मिळेल कधी ना कधी
चालल्याविना खाचाखोचा, आडवाट ती कळणार कशी ?

## रूप सज्जनाचे...

लेवून फार झाले, हे लेप चंदनाचे
भाळास लाव माती, संकेत बंधनाचे

का हाकतोस बाबा, उंटावरून मेंढ्या
सत्यास मान्यता दे, घे स्पर्श स्पंदनाचे

दातास शुभ्र केले, घासून घे मनाला
जे दे मनास शुद्धी, घे शोध मंजनाचे

आमरण का तनाला भोगात गुंतवावे?
सोडून दे असे हे, उन्माद वर्तनाचे

अभये चराचराला, संचार मुक्त आहे
शत्रूसही निवारा, हे रूप सज्जनाचे

**भक्तीविभोर...**

चंद्रास ग्रासताना अंधार घोर झाला
संधी चिकार येता तारा मुजोर झाला

आमंत्रणे मिळाली त्या सर्व मूषकांना
पंक्तीस साह्य व्हावे बोक्यास पोर झाला

आता दह्यादुधाला कान्हा नशीब नाही
हंडी कवेत ज्यांच्या बाहूत जोर झाला

टाळूवरील लोणी खायांस गुंतला जो
सत्कार पात्र तोची मशहूर थोर झाला

प्रेमात वारसाच्या स्वहिता भुलून गेला
नात्यास भार होता स्वजनात चोर झाला

यावे तसेच जावे ना 'अभय'दान कोणा
मृत्यू समीप येता भक्तीविभोर झाला

## मुकी असेल वाचा… (कविता)

कसा वाजवू टाळी, मी देऊ कशी दाद ?
पहिला चेंडू छक्का, दुसऱ्या चेंडूत बाद

तुझे-माझे जमले कसे, करतो मी विचार
भाषा तुझी तहाची, मला लढायचा नाद

विसरभोळा असे मी सांगतो वारंवार
भूल पडते देणींची, घेणे असते याद

सरकारी खजिन्यावर मारून घ्यावा हात
चिरीमिरी दिली तरी मिटून जाईन वाद

अभय तुझे ऐकुनिया तो चिडला असेल पण
मुकी असेल वाचा तर देणार कशी साद ?

## कविता म्हणू प्रियेला...

कविता म्हणू प्रियेला की काव्यगीत मी
‘साहित्यचोर न टपो‘ या काळजीत मी

अपराध काय माझा ते तूच सांग ना
लेखी तुझ्या उरावा माझा अतीत मी

अवहेलनेस भिक्षा नाकारतो अता
जगणे अवखळ माझे अन टवटवीत मी

धावायचे किती रे मी सांग जीवना
तू टाकलीस गुगली अन पायचीत मी

‘अभयास‘ अभ्रकाचे छप्पर नसे जरी
नक्षत्र पांघरुनी या झोपडीत मी

## कुंडलीने घात केला..

कसा कुंडलीने असा घात केला
दिशा शोधण्यातच उभा जन्म गेला

असे वाटले की शिखर गाठतो मी
अकस्मात रस्ता तिथे खुंटलेला

विचारात होतो अता झेप घ्यावी
तसा पाय मागे कुणी खेचलेला

खुली एकही का, इथे वाट नाही
हरेक पथ येथे कुणी हडपलेला?

पटू संसदेचा, तरी दांडगाई
म्हणू का नये रे तुला रानहेला?

दिशा दर्शवेना, मती वाढवेना
कसा मी स्वीकारू तुझ्या ज्येष्ठतेला

'अभय' चेव यावा अता झोपल्यांना
असे साध्य व्हावे तुझ्या साधनेला

## पुढे चला रे....

चेतलेल्या तेलवाती शांत नाही
चालताना वाट ही विश्रांत नाही

नेमलेले लक्ष्य आवाक्यात आहे
ना तमा वा सावजाची भ्रांत नाही

वेदनांची पायमल्ली फार झाली
झुंज शौर्याने अर्जी आकांत नाही

आजमावुन एकदा घे तू लढाई
सोक्षमोक्षाविन अता मध्यांत नाही

घे भरूनी पोतडी दोन्ही कराने
हा विरक्ती साधकांचा प्रांत नाही

## चंद्रवदना...

मृदगंध पसरला, घुमली शीळ लाघवी ती
पळते खिदळत सर की चंद्रवदना नवी ती

रुतले सदैव काटे, गजऱ्यास गुंफताना
ती कमनशीब पुष्पे, वेणीस लाजवीती

कित्येकदा झऱ्यांना, लाटा गिळून घेती
घेणार जन्म तेथे, कल्लोळ,यादवी ती

बोलायचे तुला जे, ते बोल निश्चयाने
शंका कदाचित तुझी, असणार वाजवी ती

छाया नरोत्तमाची, अभयास उब देते
त्यांचा उदो कशाला? जे कलह माजवीती

## हे रान निर्भय अता...

हे रान निर्भय अता, वाघास दात नाही
त्या बोळक्या मुखाने, काहीच खात नाही

नुसत्याच थयथयाटी, कल्लोळ हो सुरांचा
झंकारणे सुराने, त्या घुंगरात नाही

वणव्यात त्या तरूचे, अर्धांग भस्म झाले
तेही वसंतवेडे ऋतु, गीत गात नाही

लादू नये अपेक्षा भरपूर पालकांनी
आनंदही अताशा, त्या शैशवात नाही

बाणा कसा जपावा, लवचीक जो कणा ना
अभिमान 'मी मराठी' मुळचा घरात नाही

चौफेर वेढलो मी, फासेच मांडती ते
समरांगणा भिणारी, माझी जमात नाही

छळले मला कितीही, लखलाभ हो तयांना
अभयात नांदतो मी, किल्मिष मनात नाही

## हिशेबाची माय मेली ?...

कशी झोपडी हीच अंधारलेली ?
कुण्या उंदराने दिवावात नेली ?

पुजारी पुसे एकमेकांस आता
नटी कोणती आज नावाजलेली ?

तिला घाबरावे असे काय आहे
अशी काय ती तोफ लागून गेली ?

किती नाडती आडदांडे तराजू
कशी रे हिशेबा, तुझी माय मेली ?

कुणी हासला तो कळ्या कुस्करोनी
कशी दरवळावीत चंपा चमेली ?

म्हणाले ‘अभय‘ ‘ते‘ तुरुंगात डांबू
‘जरी आमुची तूच तक्रार केली..!‘

## क्षण एक पुरे जगण्यास खरा...

जगणे कसले शतवर्ष नरा?
क्षण एक पुरे जगण्यास खरा

लपवून व्यथा रडतोय मनी
दिसतोच सदा मुखडा हसरा

जगणेच नको असले तसले
परसात पडून जणू कचरा

मरणास इथे नच घाबरतो
असते जगणेच कठीण जरा

श्रमतो, दमतो, शिणतो पुरता
परिहार जणू जुळता नजरा

दिसतात इथे जन सज्जन हे
अपुलाच स्वभाव नसेल बरा

रुळताच मनी भलतेसलते
पुसतात कशास हवा नवरा

वरदान मिळो अभयात जगा
दररोज घरात जणू दसरा

## शेत लाचार झाले...

आळस-तणाव-चिंता वाहून नेत आहे
हृदयात चेतनेचा बघ पूर येत आहे

पडताच वीज लखलख थरकापता भयाने
निर्जन शिवार मजला पदरात घेत आहे

कायम गहाण सारे करण्यास सातबारा
बँकेसमोर झाले लाचार शेत आहे

छाटून पंख आधी केलेय जायबंदी
आता पुन्हा शुभेच्छा उडण्यास देत आहे

अस्फूट जाणिवेला मी शेंदले तरीही
थोडी सचेत झाली, थोडी अचेत आहे

नसतोस सोबतीला तू व्यूह भेदताना
पुसतोस मग कशाला की काय बेत आहे ?

दावा मला कुणीही कुठलाय एक मंत्री
निर्मोह-त्याग-करुणा ज्याच्या कथेत आहे

घे 'अभय' दांडगाई सोसून लांडग्यांची
झोपून वाघ असली जोवर गुहेत आहे

## चीन विश्वासपात्र नाही..

सारे जुनेच आहे, काही नवीन नाही
विश्वासपात्र उरला तो मात्र चीन नाही

उत्तुंग झेप घे पण दमने नको कधीही
सांभाळण्यास बाळा वरती जमीन नाही

समजू नका कुणीही त्याला गरीब निर्धन
झाले अजून त्याचे पावित्र्य दीन नाही

आहे जरी घमंडी, उद्धट जरा जरासा
पण तो तुझ्याप्रमाणे, मित्रा कमीन नाही

'खावू लुटून मेवा' हे ब्रीद शासकांचे
क्लुप्ती जमेच ना ते सत्ताधुरीन नाही

तोडीस तोड उत्तर जमले बघा मलाही
आता पुढील चर्चा मुद्देविहीन नाही

स्वातंत्र्ययुद्ध अथवा संग्राम कोणताही
लढतात तेच जे-जे हुजरेकुलीन नाही

अख्त्यार भावनेच्या जगतो अभय असा मी
हसणे अधीन नाही, रडणे अधीन नाही

## शेरनीच्या जबड्यात ससा... (हजल)

मी तुझी साथ सोडून गाऊ कसा?
तूच माझा गळा, कंठ, नरडी, घसा

वाटले मोगऱ्याला तुला पाहुनी
पालखीला मिळालाय भोई जसा

मारली मी मिठी त्या क्षणी वाटले
शेरनीच्याच जबड्यात गेला ससा

झोप पाण्यात घेतोय मासा कसा?
प्रश्न हा फालतू; फक्त खावा रसा

कार्य बाकी किती ते उद्याला बघू
मंडळींनो चला भोजनाला बसा

भोजनाचा लुटा स्वाद पंक्तीमध्ये
अक्षता टाकण्याला असा वा नसा

टक्कलाला तुझ्या तूप मी लावते
दे मला एकदा तू 'अभय' राजसा

## राखेमधे लोळतो मी (हजल)

मलिंदा मिळावा असे भाकतो मी
जगावेगळे मागणे मागतो मी

कशाला गडे रोज येतेस स्वप्नी ?
असा काय आमिर तुला वाटतो मी

जसे गुंग व्हावे नशीले पिताना
तुला पाहताना तसा झिंगतो मी

मला नेमक्या टाळती अप्सरा त्या
बहूतेक त्यांना कवी भासतो मी !

दिलेली फुले तू जमा खूप झाली
अता गूळ, साखर, डबा शोधतो मी

करा बंद कानात आकाशवाणी
अरे मच्छरांनो बघा पेंगतो मी

समाजात चर्चेमधे राहण्याला
'अभय' मस्त राखेमधे लोळतो मी

## लगान एकदा तरी..... (हजल)

चरेन शासकीय कुरण-रान एकदा तरी
ठरेन या जगात मी महान एकदा तरी

हरूनही रणांगणात लाभते विरत्वश्री
बनेन राजकीय पहिलवान एकदा तरी

क्षणाक्षणास भेटण्यास फालतू विलंब का ?
तुझ्या समोर बांधतो मकान एकदा तरी

शिकून घे धडे लढायचे हिरोकडे अता
बघून थेटरात घे लगान एकदा तरी

कधी विचारतेय का 'अभय' इथे कुणी तुला
जरा गप बसणार का ? गुमान एकदा तरी

## उद्दामपणाचा कळस (हजल)

भिणार नाही तुला कुणीही, फुसकी खळबळ म्हणजे तू
पेल्यामध्येच खळवळणारे पुचाट वादळ म्हणजे तू

पराकोटिचा बेशरम तू, लाचार तू, येडपट तू
शेणामधल्या किड्यासारखी, अविरत वळवळ म्हणजे तू

नको तिथे नाक खुपसण्याचे, प्यायलास तू बाळकडू
उथळ पाण्यासारखी खळखळणारी खळखळ म्हणजे तू

ओंगळ तू, वंगाळ तू, जसा मल सांडव्याचा गाळ तू
साचलेल्या डबक्यामधील कुंठलेले जळ म्हणजे तू

राहू-केतू तू ... असुरांचे दृष्ट हेवे-दावे तूच
स्मशानभूमीत पिशाच्चांची अशांत वर्दळ म्हणजे तू

छल-कट शिरोमणी शकुनी तू, कळीचा नारद मुनी तू
दुनियेस हैराण करणारी चुगलखोर कळ म्हणजे तू

वात्रट तू, वाह्यात तू, असतो इंद्रियांच्या कह्यात तू
उद्दामपणाच्या वृक्षाला आलेले फळ म्हणजे तू

ना नर तू, ना नारायण तू, दहा मुखाचा रावण तू
सर्व विकारास ‘अभय‘दाते, सोयीचे तळ म्हणजे तू

## पराक्रमी असा मी (हजल)

माझ्या मनात नाही, कसलाच भेद येतो
पोटात भूक त्याच्या, जेवून मीच घेतो

ना लोभ, मोह, माया, नाहीच लालसाही
उष्टे, जुने-पुराणे वाटून दान देतो

प्रेमात सावलीच्या सूर्यास पारखा मी
अंधारही अताशा संगे मलाच नेतो

फिर्याद ही जरासी घेऊन आज येता
कैवार रक्षणाचा खुर्चीत का दडे तो?

उच्चांक गाठताना बेबंद धूर्ततेचा
उंटीणिला शिडीने चंगून चुंबते तो

ना साम्यवाद रुजला, नाही समाजवादी
बस धन्यवाद केवळ का अभय आवडे तो

## टुकारघोडे !.. (हजल)

उगाच पिळतोस रे मिशा तू, कडमडणे हा विकार आहे
तिच्या खुट्याला तुझ्याप्रमाणे टुकारघोडे हजार आहे

कशी बघा चालते कचेरी, अशी जशी की दुकानदारी
अनाथ सोडून कायद्याला, विधानमंडळ फरार आहे

बघा जरा हो बघा जरासे कसा भामटा फुगून गेला
मुरूम-गिट्टी अमाप खातो, तरी न देतो डकार आहे

गमावतो ना कधीच संधी हपापलेला विचित्र प्राणी
डसून लचकेच तोडण्याचा ठरून त्याला 'पगार' आहे

कुठून आणू नवीन गजरा, दुकान शोधू कुठे नव्याने ?
सरून पर्याय सर्व गेले, जुनीच देणी उधार आहे

नकोस मित्रा मला जळू तू, अता न सामान्य राहिलो मी
कितीतरी जाड पुस्तकांचे, लिखाण माझे तयार आहे

अम्हांस नाही कुठेच सत्ता, कुठेच नाही 'अभय' पदांचे
लबाडवंशात जन्म ज्यांचा, तमाम त्यांचा पुढार आहे

## खुळ्या स्मृतींना जपण्यासाठी

आधी खाते भाव जराशी
मग ती घेते नाव जराशी

तू नसण्याने भिकार झाले
बघून ये तू गाव जराशी

चाल रडी पण; लोभसवाणी
खेळ आणखी डाव जराशी

आढे वेढे हवे कशाला
थेटच दे ना ठाव जराशी

खुळ्या स्मृतींना जपण्यासाठी
निदान दे तू घाव जराशी

उत स्वप्नांचा पाडा आला
लगबग ये चल धाव जराशी

मम श्वासाची कपोलभाती
ओठावरती लाव जराशी

अभय नशेची सोज्वळ मदिरा
दे चढण्याला वाव जराशी

## प्रकाशात, शिरायासाठी

ओढते रात, अमावास, फिरायासाठी
दे जरा हात, प्रकाशात, शिरायासाठी

काढली स्वत्व, बघायास, स्वतःची सेल्फी
टाक फाडून, अहंभाव, जिरायासाठी

तूज दिसणार, कशा सांग, सुगंधी जखमा
तूच ये आज, उभे ह्रदय, चिरायासाठी

ही कडा सर्द, तरी गर्द, फुलांची वस्ती
ठाकते ताठ, तुफानास, विरायासाठी

तामसी ताज, दगाबाज, निघाला म्हणुनी
काढतो रोज, अभय पोट, किरायासाठी

## जिंकावया जगाला...

जिंकावया जगाला ऐटीत तो निघाला
मुलखात मुद्रिकेच्या अलगद शिकार झाला

मज रानटी समजला तेही बरेच झाले
कसदार रानमेवा मी चारतोच त्याला

ना घाम गाळला अन ना रक्त आटविले
कोणी कुणा पुसेना पैसा कुठून आला ?

मी मेघ बाष्पधारी वणव्याकडे निघालो
लांबी-परीघ-रुंदी मोजत बसू कशाला ?

धनवान इंडियाची बलवान लोकशाही
होतो प्रधानमंत्री सामान्य चायवाला

शिर्षस्थ पाखरांच्या चोची चरून झाल्या
की धाडतील नक्की आमंत्रणे तुम्हाला

ज्यांचे अभय पहारे ते मारतात बाजी
पुसणार कोण येथे निद्रिस्त झोपऱ्यांना ?

# संक्षिप्त परिचय

**नाव** : **गंगाधर महादेवराव मुटे**

**जन्म** : २७ फेब्रुवारी १९६२

**शिक्षण** : बी. एससी (गणित)

**व्यवसाय** : मुक्त पत्रकार, शेती, शेतीविषयक संशोधन
बिजोत्पादन आणि विपणन, कापसाच्या अनेक संकरित वाणांची निर्मिती

## : प्रकाशित साहित्य :

१) 'रानमेवा' (काव्यसंग्रह) नोव्हेंबर २०१

२) 'वांगे अमर रहे' (ललित लेख संग्रह) जुलै २०१२

३) 'नागपुरी तडका' E-book (काव्यसंग्रह) फेब्रुवारी २०१३

४) 'माझी गजल निराळी' (गजलसंग्रह) नोव्हेंबर २०१३

५) 'नागपुरी तडका' (काव्यसंग्रह) फेब्रुवारी २०१६

## अवांतर लेखन

१) महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, पुण्यनगरी, तरुण भारत, सकाळ, लोकसत्ता, देशोन्नती व अन्य विविध वृत्तपत्रातून सातत्याने लेखन. विविध नामांकित दिवाळी अंकातून अनेक कविता व लेख प्रकाशीत.

२) पुणे, नाशिक व औरंगाबाद येथून प्रकाशित होणाऱ्या शेतकरी संघटनेचे मुखपत्र असलेल्या पाक्षिक 'शेतकरी संघटक' मध्ये २०१४ पर्यंत 'वाङ्‌मयशेती' हे सदर लेखन.

## पुरस्कार

१) स्टार माझा / ए. बी. पी माझा या लोकप्रिय मराठी TV वृत्तवाहिनीतर्फे आयोजित 'ब्लॉग माझा' या जागतिक पातळीवरील स्पर्धेत २०१० आणि २०१२ मध्ये gangadharmute.wordpress.com या ब्लॉगला सलग दोनदा पुरस्कार

२) मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मी मराठी डॉट नेट संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरजालीय स्पर्धेत 'वांगे अमर रहे' या ललितलेखाला पारितोषिक

३) मी मराठी डॉट नेट, व्दारा आयोजित आंतरराष्ट्रीय पातळीवरील कविता स्पर्धा - २०११ या स्पर्धेत 'कुठे लुप्त झाले फुले भिम बापू' या कवितेस प्रथम पुरस्कार

४) २०१३ मध्ये दर्यापूर येथे भरलेल्या ५२ व्या अ.भा. अंकूर मराठी साहित्य संमेलनात साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'अंकूर वैभव' पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरव...

५) 'माझी गजल निराळी' या गजलसंग्रहाला अंकूर वाङ्मय पुरस्कार - सन २०१३ चा अ. भा. अंकूर साहित्य संघाचा स्व. सुरेश भट स्मृती गजल पुरस्कार

६) शेतकरी चळवळीमध्ये ३५ वर्षे सर्वंकष व बहुआयामी योगदान देऊन शेतकऱ्याच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी अविरत प्रयत्न करून शेतीक्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल ठाणे येथील दै. जनादेशच्यावतिने 'जनादेश गौरव-२०१६' पुरस्कार

## सामाजिक कार्य

१) १९८२ पासून शेतकरी चळवळीत सक्रीय सहभाग. अनेकदा तुरूंगवास.
२) १०जुलै २०१४पासून स्वतंत्र भारत पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश महासचिव पदावर कार्यरत
३) जुलै २०१० पासून शेतकरी संघटनेचे वर्धा जिल्हा अध्यक्ष म्हणून कार्यरत
४) नोव्हेंबर २०१४ पासून अ.भा.शेतकरी मराठी साहित्य चळवळीच्या संस्थापक अध्यक्षपदी
५) २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी वर्धा येथे आयोजित पहिल्या व २१,२२ फेब्रुवारी २०१६ रोजी नागपूर येथे आयोजित दुसऱ्या अ.भा.शेतकरी साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यभार.
६) ABP माझाच्या अनेक चर्चासत्रात लाईव्ह सहभाग
७) आकाशवाणीवर कवीसंमेलन आणि गजल मुशायर्यात काव्यवाचन

## संपादकीय कार्य

१) १२ व्या शेतकरी संघटनेच्या संयुक्त अधिवेशानिमित्ताने प्रकाशीत करण्यात आलेल्या 'पुन्हा एकदा उत्तम शेती' या स्मरणिकेसाठी कार्यकारी संपादक म्हणून कार्यभाग.
२) वर्धा येथे आयोजित पहिल्या अ.भा.शेतकरी साहित्य संमेलनानिमित्त प्रकाशित 'सारस्वताचा एल्गार' स्मरणिकेचे संपादन.

३) नागपूर येथे आयोजित दुसऱ्या अ.भा.शेतकरी साहित्य संमेलनानिमित्त प्रकाशित 'शेतकऱ्याचा स्वातंत्र्यसूर्य' युगात्मा शरद जोशी गौरवविशेषांकाचे आणि 9कणसातली माणसं9 या प्रातिनिधीक शेतकरी काव्यसंग्रहाचे संपादन.

४) त्रैमसिक 'अंगारमळा'चे संस्थापक संपादक.

## ई-लेखन

१)www.sharadjoshi.in

२) www.baliraja.com

३) www.gangadharmute.com

४) www.shetkari.in

५) gangadharmute.wordpress.com

६) gangadharmute.blogspot.com

या सर्व संकेतस्थळांची निर्मिती आणि त्यावर सातत्यपूर्ण लेखन.

## सामाजिक संजालांवरील लेखन

**फेसबूक** : www.facebook.com/gangadharmute

## फेसबूक पान व समूह

www.facebook.com/my.net.farming (माझी वाङ्मयशेती)
www.facebook.com/sharadjoshi.in (शेतकरी संघटना)
www.facebook.com/jai.vidaRha.rajya (विदर्भराज्य)
www.facebook.com/groups/baliraja (बळीराजा)
www.facebook.com/groups/kawita (काव्यगुंजन)
You Tube : www.youtube.com/gangadharmute

**संपर्क पत्ता** : मु. पो. आर्वी (छोटी) ता. हिंगणघाट जि. वर्धा - ४४२ ३०७
**भ्रमणध्वनी** : ९७३०५८२००४, ९ ७३०७८६००४
**ईमेल** : gangadharmute@gmail.com

भुईला दिली ओल नाही, ढगाने
कसे अंकुरावे अता ते बियाणे ?

**- गंगाधर मुटे 'अभय'**

★★★